Regd-No. N 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ४९ ] आकोला--सोमवार तारीख ५ माहे जुलै सन १९१५ ई० [ अंक २६

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस.......१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहि वाट आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सूचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पावुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

हा बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } J. G. Ridland. एजंट
नो. नं २

## अस्सल अंगूरी.

## हींग

केवळ एक आणा तो. पवित्र केसर ।||= ता. शुद्ध शिलाजीत. -।|- तो. खालिस कस्तूरी रु. २५ तो. तिबती ममीरा रु. ३ तो.

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ५
नो० नं० ८

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागले आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तावडतोब दूर होतात. किं रु. १०८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ०४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

DR. H. L Batliwala. Sons & Co Ltd
N. N. 5 Dadar Bombay.

## चांदीचीं भांडीं.

### विकावयाचीं आहेत.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारची सुबक व वाटदार भांडी आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवू मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ.

**पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन**
**रविवार पेठ नाशिक सिटी.**
नो. नं. ४

### ब्रह्मविद्या ग्रंथ रत्नमाला

या मासिकाचा वर्षारंभ माघ शु० १ तिसऱ्या वर्षापासून ७२ पानांचें मासिक. वा० व० ट० खर्चासह तीन रुपये. यांत **श्रीशंकराचार्य, शंकरानंद,** व **विद्यारण्य** यांचे उपनिषदावरील **भाष्य, आत्मपुराण व अनुभूतिप्रकाश** हे ग्रंथ क्रमानें मूळ, अन्वय, अर्थ व विवरण यांसह प्रसिद्ध होतात. यांत हल्लीं बृहदारण्यकाचा भाष्यार्थ चालू आहे. मागील दोन वर्षीतील वीस प्रकरणें १० रुपयांस घेऊन तिसऱ्या वर्षी वर्गणीदार होणारास **'वैशेषिक दर्शन'** बक्षीस-

सनातन वैदिक **धर्माचें, तत्त्वज्ञानाचें** व सामाजिक विषयावें विवेचन करणारें--

### आचार्य

पाक्षिक, दर एकादशीस नियमितपणें प्रसिद्ध होतें. पृष्ठें २४ वा० व० ट० खर्चासह १ रु० ८ आणे वरील मासिक घेणारास फक्त १रु० वरील विषयांशिवाय यांत संस्कृत काव्यें, नाटकें व इतर लहान लहान ग्रंथ यांचाही परामर्श केला जातो. धर्म संबंधीं प्रश्नांची समर्पक उत्तरेंही दिलीं जातात नमुना मागवा.

पत्ता— विष्णुशास्त्री बापट.
२४१ सदाशिव पेठ पुणें.
नो० नं० ३

### अनायासें देवदर्शन.

नोटपेपर्सः— श्रीगजानन, दत्तात्रय मारुती शंकर व नरहरी या पैकीं कोणती ही एक मूर्ती रंगांत दाबून उठाव (एम्बास) छापलेले, १०० ग्रेप्रनाईट नोटपेपर्स व त्याच्या बेताचीं चैाकोनी १०० कव्हरें प्रत्येकीं किंमत ०८ व्हीपीनें ०१२ दोन्हीमिळून किंमत रु. १ व्ही. पी. रु० १०६




**सर्वत्र एजन्टस् पाहिजेत**
**पत्ता—बेंद्रे आणि कंपनी पुणेंसिटी**
नो. नं ७

### मुद्दाम अनुभवाकरितां.

दिलखुषमलम— तमाम त्वचा रोगांवर चालणारा— १ मनुष्यापुरतें औषध किं० १॥ आणा. अस्सल कर्पुरार्क— किं० २ आणे केशनाशक अप्रातिम पूड कि. २ आणे कर्णाबिंदू — कानाचा विकार १ दिवसांत गुण ३ दिवसांत फायदा होतो. किं० २ आणे मेंथालार्क किं० १ आणा.

### अनंगविलास.

गोळी. अत्यंत धातुस्तंभक व पौष्टिक १ दिवसांत गुण दाखविते, किं० २ आणे "४ गोळ्या" दंतमंजन— ३ दिवसांत गुण किं० २ आणे. विंचवावर प्रातिज्ञेचें औषध क० ८ मनुष्या पुरत्या औषधाची ३ आणे. नेत्रांजन— डोळ्याचे विकारावर— साधारण लाली, खुपरी, पाणिगळणे, आग यावर किं० २ आणे. दम्यावर— प्रातिज्ञेनें १ दिवसांत गुण देणारे व ७ दिवसांत पूर्ण फायदा देणारे औषध किं० ४ आणे. शीत पित्तामुळें आंगावर गांधी व खाज अतिशय येते त्यावर ३ दिवसांत गुण देणारे किं० २ आणे. उपदंशरिपु— प्रमेह, उपदंश यावर ३ दिवसांत फायदा व ७ दिवसांत पूर्ण गुण देणारे औषध किं० १ रुपया दिलबहार— सुपारी— १ चिमटी विड्यांत घेतांच, अजिर्ण, अमांश यांचा नाश होऊन झाडा साफ होतो, भूक खुलते किं० १ आणा, तंबाखु रंजनवटी— अत्यंत सुवासीक व कडक तंबाखुची गोळी २० किं० २ आणे. निदान ८ आण्याचा माल मागवावा. व्ही. पी. नें पाठवूं.

**मुळे एन्ड सन्स नांदुरा.**
नो० नं० ९

### विक्रीस तयार

आमचे छापखान्यांत दरखास्तीचे, वकील पत्राचे, परत भरयाचे, लिस्टफार्म पर्च्याचे व नकलेकरितां करावयाच्या अर्जाचे नमूने छापून तयार आहेत. ते आमचे छापखान्यात कोणत्याही वेळीं विकत मिळतील.

वऱ्हाडसमाचार कार्यालय, सदाशिवाश्रम, आकोलें } मॅनेजर

### नोटीस

नोटीस बेशमी बळिराम पांडुरंग झोले मु० पातूर शेखबाबू ता० बाळापूर जिल्हा आकोला.

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुमची मुलगी नामे गोदी ही माझी बायको असून तिला शांतिक येई पर्यंत माझे येथेंच होती, नंतर आपले मुलाचा शांतिकाचा प्रसंग झाला. त्यावेळीं आपल येथें त्या प्रसंगानिमित्त घेऊन गेलांत त्याला आजपर्यंत ६ महिने झाले. त्यावेळीं तिचे अंगावर पाटल्या तोळे १० गाठले तोळे १॥ एकूण सोने ११॥ साडेअकरा तोळे अंगावर होते. पुढें तो प्रसंग झाल्यावर नेण्याकरितां मनुष्य पाठविला त्यावेळीं पाठविले नाहीं; नंतर वडिलास पाठविले, तरी पाठविले नाहींत, त्यांना आपण फारच अपशब्द बोललांत हें चांगलें केलें नाहीं. आणि आपले ह्मणणें आहे कीं, निराळे राहिल्यास पाठवितो नाहींतर पाठवित नाहीं. असा जबाब दिला वरून आपणास या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, माझे आईबापापासून मी निराळा राहुं इच्छित नाहीं, जर आपणाला मुलीस पाठविण्याचे असेल तर आपणास नोटीस पावल्यापासून ८ आठ दिवसाचे आंत ह्मटलेल्या देषाचा निकाल करून मुलीला डागिन्यासमेत स्वतः घेऊन यावे. तसें न केल्यास आपले मुलीचा अन्नवस्त्राबद्दल व कर्जवगैरे काढल्यास कोणतेही प्रकारचा हक्क राहणार नाहीं. व दागीने परत न दिल्यास कायद्याप्रमाणें व्यवस्था केली जाईल. व मी दुसरें लग्न करण्यास मोकळा होईन. कळावें. ता० २७।६।१५

सही
देविदास लक्ष्मण भट रा० पातूर
द० खु०
नो० नं० २६१

## नोटीसीचें उत्तर

नोटिस बेशमी लक्ष्मी मर्द किसन वाघमारे राहणार हात तो बाळापूर.

इजला:—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं मजला वऱ्हाडसमाचार पत्रांतून ता० ३ माहे मे सन १९१५ च्या अंकातून जाहीरात दिली ती अगदीं खोटी आहे. ऋतु प्राप्त झाल्यावर तुझ्या ह्मणण्या प्रमाणें ६ महिनेच माझे येथें राहिली नसून अंदाज ४–५ वर्षें पर्यंत तू सुखानें व अत्यंत संसार दक्षतेनें, व कोणतेही प्रकारची तक्रार न करितां वागत होती. पुढें दिपवाळीस नेण्याकरितां तुझ्या माहेरचे मूळ आल्यामुळें तुला मी खुषीनेंच रवाना केले व तुही खुषीनेंच गेली. परंतु तूं माहेरी गेल्यावर निंद्य लोकांच्या सांगण्या प्रमाणें वागून आह्मी ज्यावेळीं (दिपवाळी झाल्यानंतर लवकरच) तुला मूळ आलों त्यावेळीं तूं येण्याचें नाकारलें व पुढें दरसाल पुष्कळ वेळां आह्मी मूळ येत असून तूं विनाकारण आली नाहीं. माझा आजपर्यंतचा सुखदायक होगारा संसार विनाकारण दुखःप्रद केला. हें तूं माझें किती नुकसान केलेंस याचा विचार न करितां उलट तूंच नुकसान भरून माग-तेस? अशा मागणीनें तुला खावटी खर्च मिळण्यास मुळींच आधार नाहीं. फारकत देण्याची मी मुळींच इच्छा दर्शविली नाहीं. व अजूनही नाहीं. अखेर तूं मला कळ-विल्या तारखेस मी मुळ आलों असतां विनाकारण मी गुन्हेगार नसून पंच जम-वून तूं पंचाईतं भरविली व मला कांहीं पंच अटी कबूल करविण्यास लावून आपण मात्र पंच अटी नाकारल्या. तेव्हा त्या वेळींही तूंच गुन्हेगार झालीस. तुझी इच्छा विनाकारण मला त्रास देऊन फार-कत मिळविण्याची आहे. परंतु कोणत्याही प्रकारें फारकत देण्यास मी तयार होणार नाहीं तरी तुझी नांदणुकीची इच्छा अस-ल्यास मी मागील सर्व उपमर्द विसरून वागविण्यास अजून तयार आहे. तरी ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचें आंत सर्व दागिन्यासह निघून यावें व कोणतेही प्रकारची कुरकुर न करितां उत्तम नांद-णूक दाखवावी. व तशी तुझी इच्छा नसल्यास मी फारकत देण्यास मुळींच तयार नाहीं. मात्र तुझ्या अशा निंद्य वागणूकीनें माझें आजपर्यंतचे व पुढें होणारें नुकसान भरून घेण्यास कोर्टांत दावा दाखल करावा लागेल. व त्या बद्दलचा सर्व खर्च व या नोटीशीसुद्धां सर्व खर्च भरून घेतला जाईल. कळावें. ता. १२।५।१५ इ.

दस्तुर भदु सुकदेव पाटील रोहोडे. मु० दानापूर.

सही.

किसन वा। सखाराम वाघमारे
कुणबी राहणार दानापूर
निशाणी हातची रेघ.

नो० नं० २६२

## नोटीस.

नोटीस बेशमी बाबनराव वा। रामु पा० राहणार कजवे पिंपळगांवकाळे प्रगणे व तालुके जळगांव जिल्हा बुलढाणा

यांस:—

नोटीस देणार यमुनाबाई हल्लीं वस्ती मौजे माकनेर प्रगणे व तालुके मलकापूर जिल्हा बुलढाणे नोटीस देते ऐसीजे कीं तुमचा माझा विवाह होऊन आज सरासरी १६ वर्षें झालीं. परंतु तुमचा आमचा संसार होण्याचा मुळींच संभव दिसत नाहीं. सबब पुनर्विवाह लावण्यास मोकळे करून फरोक्त चिठ्ठी द्यावी. असे मी पुष्कळदां ह्मटलें व माझे भावाकडून पंचा समक्ष ही सांगितले व पत्र द्वारें नोटिसी दिल्या. तरी तुह्मी अजून कांहींच निकाल लावला नाहीं सबब विनंती कीं ही नोटीस पावल्यापासून १५ दिवसाचे आंत तुह्मी फरोक्त चिठ्ठी न दिली तर हीच फरोक्त चिठ्ठी समजून मी माझा पुनर्विवाह दुसऱ्याशीं लाऊन संसार करीन, मग मी तुमची कोणत्या प्रकारची अडचण अगर हरकत ऐकणार नाहीं. कळावें. ता०

सही
यमुनाबाई निशानी हातची बांगडी
दस्तुर नारायण व्यंकटेश जोशी
राहणार माकनेर
नो० नं० २६३

## नोटीस

सर्वत्र लोकांस माहित होणें करितां जाहीर करण्यांत येते कीं आकोले येथील खानसाहेब आमानखा यानीं त्यांचे शेतांतील बंगल्या समोरची सिव्हील स्टेशन मधील ३८०७८ स्केअर फूट जागा कंपाउंड घालून बगिच्या करणें करितां मिळणें बद्दल अर्ज दिला आहे. आणि ती जागा ता० १८.७.१५ रोजीं सकाळीं ७ वाजतां ठिकाणावर हरास केली जाईल. कौलपट्टा ३० वर्षां करितां घेतला जाईल. पट्टेदा-रांस सदहू जमीनीचा उपयोग वर निर्दिष्ट केलेल्या कामाशिवाय इतर कामाकडे डे० क० सा० ब० आकोले यांचे लेखी पर-वानगी शिवाय करता येणार नाहीं. पट्टे-दारांस कौल पट्याच्या ठरलेल्या नमुन्यांतील शर्ती कबूल असल्या पाहिजेत. कळावें. ता० २२-६-१९१५.

Jay-Narain
E. A. C. Akola.

नो. नं. २६४

## जाहीर नोटीस

जाहीर नोटीस देणार कृष्णाजी हरी कुळकर्णी लाखनवाडा बु॥ ता० बाळापूर जिल्हा आकोला कळविण्यांत येते कीं, माझी वडिलोपार्जित व स्वसंपादित अस-लेली जंगम स्थावर जिनगी मौजे आकोली ता० खामगाव जिल्हा बुलढाणा येथील शेती व मौजे लाखनवाडा बु॥ ता बाळापूर जिल्हा आकोला येथील शेती व राहते घर व बैलाची पाग व मायवाडा असे असून मजला एक मुलगा सदाशीव हा मी एक वर्षाचे वया पासुन वीस वर्षे त्याचें लालन पालन मी केलें. असे अस-तां वरील माझा मुलगा सदाशीव कृष्ण हा फार बिघडून गैरचालीस लागला. असून हारहमेस माझ्याशीं घरांत फार तंटे करून त्रास देणें सुरू केला आहे. यामुळें मी फार त्रासून गेलों. सबब या जग जाहीर नोटिशीनें असें कळवितो कीं, माझा मुलगा फार बिघडला आहे. सबब माझे संमती वांचून त्याशी कोणी कोणते-च प्रकारची देव घेव किंवा जहीरी गहाण करूं नये. व त्यानींही करून देऊं नये. जर कोणी करून घेतल्यास कायद्याप्रमाणें रद्द केले जाईल. क० ता० २४ ६-१५

सही
कृष्णाजी हरी कुळकर्णी द० खु०
नो० नं० २६५

## पत्रव्यवहार

## वऱ्हाडांतील आईल इंजनां-वर चालणारे कारखाने

### पहिल आईल एंजीन

अंक १७ वरून पुढें चालू.

यामुळें इंजन पुरी शक्ती उत्पन्न करीत नाहीं व तेलाचा खर्च अमर्याद वाढतो. याप्रमाणें तेलाचा खर्च ज्यांत फार आहे अशीं इंजनें वऱ्हाडांत पुष्कळ आहेत.

कारखानदारांच्या अज्ञानामुळें कार-खाना नुकसानांत कसा येतो याची आणखी कांहीं उदाहरणें पुढें दिलीं आहेत. कांहीं कारखानदारांना असें वाटतें कीं आपल्या गांवांतील लोकांनाच शिकवून तयार करून कारखान्यांत ठेवावे ह्मणजे मजुरी फार पडत नाहीं. परंतु आपल्या कारखान्यांतच शिकवून तयार झालेले लोक एकंदरींत फारच महाग पडतात. या लोकांना फिटींग मुळींच येत नसतें असें ह्मणण्यास हरकत नाहीं. या लोकांच्या हातून पट्या-चे जोड बरोबर होत नाहींत व यांना पट्टे चढवितां येत नाहींत. यामुळें पट्याचा खर्च फारच जास्त होऊन नुकसान होतें. या लोकांना (ल्युब्रीकेटींग) वंगण किती घालावयाचें केव्हां घालावयाचें हें कांहीं सम-जत नसतें व यामुळें वंगणाचा खर्च ज्यास्त होतो. असे नवशिके लोक यंत्रें देखील फारच खराब करतात. यांना यंत्रां-तील दोषही पूर्णपणें काढून टाकतां येत नाहींत व एकंदरींत कारखान्यांतील यंत्राची हेच लोक फार नासाडी करतात. या पेक्षां पुष्कळ जास्त पगार देऊन जरी शिक-लेले लोक कामावर ठेविले तरी एकंदरींत स्वस्त पडतें.

कारखान्यास नुकसान येण्याचें आणखी एक कारण असें आहे कीं कारखान्यांतील काम करणाऱ्या लोकांचे मालकाविषयीं वाईट मत होईल अशा गोष्टी मालकांच्या हातून होतात.

केव्हां केव्हां एंजीनीअर किंवा मॅने-जर यांना न सांगतां मालक स्वतः हुकूम करून आपणच कारखान्यांतील शिस्त बिघडावितात, व आपल्या कारखान्याचें नुक-सान करितात. मजुरींत काटकसर करण्या-करितां एका कारखानदारानें दळण्याच्या यंत्रावर कामकरण्यास एकच मनुष्य नेमलेला होता. तो पुढें कदाचित जास्त पगार मागेल ह्मणून रोजच्या रोज मजुरदारांपैकीं नवीन मजूर दळण्याच्या यंत्रावर ठेवण्यास सांगितलें होतें. एंजीनीअरास ही गोष्ट पसंत नव्हती परंतु मालकापुढें त्याचें कांहीं चाललें नाहीं. व दळण्याच्या यंत्रावर रोजच्या रोज नवीन मनुष्य येऊं लागला. यामुळें रोज निम्मे दळणच होऊं लागलें व दळण्याच्या यंत्रावर ढेवरी जाऊन दगड खराब झाला. अखेरी-स दळण्याच्या यंत्रावर एकच मनुष्य मुकरर झाला.

कारखान्यांत नुकसान येण्याचें आणखी एक कारण असें आहे कीं तो कारखाना मुद्दाम नुकसानींत येण्याकरितांच काढलेला होता. अशा कारखान्यांत बहूत करून दोघे भागीदार असतात. त्यांत एकाची अक्कल व दुसऱ्याचा पैसा. परंतु कारखान्याकरितां अशी भागीदारी सुरु झाली ह्मणजे अक्कलवाल्या भागीदाराच्या ह्मणजे एंजीनीअरच्या अकलेचा पैसा होऊ लागतो. व पैसेवाल्या भागीदारा-च्या पैशाची अक्कल होऊं लागते. परंतु या उलटा पालटींत पैसेवाल्याचें जें नुकसान होतें त्याच्या चौथाईनें देखील अक्कलवाल्या भागीदाराचा फायदा होत नाहीं. वरील गोष्ट स्पष्टपणें समजण्या करितां अगदीं उघड करून सांगतों. एखादा पैसेवाला मनुष्य असला ह्मणजे त्याला कांहीं लोक कारखाना काढण्याची भर घालतात. त्यांत मुख्यत्वें करून एखादा इंजीनीअर असतो. हा एंजीनीअर कारखान्याच्या यंत्राना लागणाऱ्या किंमतीचा आकडा अगदी कमी दाखवून यंत्राची "आरडर" द्यावयास लावतो. व एकदां पैसे अडकल्यावर मालकाला पुढें जितके लागतील तितके पैसे खर्च करणें भागच पडतें. कारण दुसरा इलाज नसतो. मध्यंतरीं एंजीनीअर यंत्रावर वंगणावर पट्यावर इ० सर्व जिनसावर विचार न करितां कमीशन खात असतो. व अशा रितीनें खालेल्या पैशाला मारले किंवा हाबकले असें ह्मणतात. व एंजीनीअर लोक गोष्टी बोलतांना ज्या-वेळेस अगदीं मन मोकळें करून एकमेकांस सांगतात. त्यावेळीं, यंत्रें घ्यावयास मुंबईस गेलो होतो १५० रुपये मारले, असें मोठ्या ऐटीनें सांगतात. या बद्दल इतकेंच सांगणें पुरे आहे कीं, लोकांच्या थापांना भुलून किंवा लोकांनीं मुद्दाम भरीस घातल्यानें पुष्कळ लोक फसलेले आहेत.

या ठिकाणीं एवढेंच सांगणें जरूर आहे कीं, ज्याप्रमाणें एंजीनीअर लोक मालकांना फसवतात. त्याच प्रमाणें पुष्कळ मालक देखील एंजीनीअर लोकांस फसवतात. इतकेंच नाहीं, परंतु एखाद्या एंजीनीअरानें सद्सद्वि-वेक बुद्धी जागृत ठेऊन जर एखाद्या मालकास योग्य सल्ला दिली तरी देखील तो मालक त्याच्या शद्बावर विश्वास ठेवतोच असें नाहीं. व पुढें केव्हांना केव्हां तरी जाळ्यांत सांपडून फसतोच. किंवा निदान त्याला एंजीनीअरचा विश्वास न पटून तो आपण स्वतःच जाऊन एखादें इंजन व दळण्याचें यंत्र घेऊन येतो. वरील गोष्टीचें उदाहरण ह्मणून एक गोष्ट देतों. सुमारें चार वर्षांपूर्वी मी कांहीं दिवस (उमरावतीस) रहात होतों. त्यावेळीं एका गृहस्थानें माझ्या

एका मित्रा जवळ कारखाना काढण्याचा बेत काढला. सदरहु गृहस्थाची व माझी प्रत्यक्ष ओळख नव्हती. परंतु माझ्या मित्राची व त्याची ओळख असल्यामुळें त्यानें कारखाना काढण्याचा बेत कळवितांच माझ्या मित्रानें मला बोलावून त्याची व माझी ओळख करून दिली. सदरहु गृहस्थ सरकारी नौकरी करून पेनशन घेऊन घरीं बसले होते. व कांहीं तरी उद्योग पाहिजे ह्मणून १०००।२००० रुपये खर्च करून दळण्याचा कारखाना काढावयाचा असा त्यांचा बेत होता. मला सदर गृहस्थाची कारखाना काढण्याची कल्पना चुकीची वाटली. व मीं त्याला ह्या भानगडींत न पडण्याबद्दल स्पष्ट सांगितलें. पुढें मी एकदां (उमरावतीस) गेलों तेव्हां सदरहु गृहस्थानीं आईल एंजीन व दळण्याचें यंत्र विकत घेऊन कारखाना काढल्याचें समजलें. हा कारखाना नीट चालावयाचा नाहीं. असें मला जरी पक्कें माहीत होतें तरी मीं त्यावेळीं त्याला कांहींच बोललें नाहीं परंतु माझ्या ह्मणण्याचा प्रचीती त्याला कारखाना काढल्या पासून सहा महिन्यांत आली. व आपण कोठून कारखान्याच्या भानगडींत पडलों असें त्याला झालें.

सदरहू गृहस्थास अडचणी कोणत्या आल्या हें समजलें तर त्यापासून नवीन कारखाने काढणाऱ्या लोकांना फायदा होईल ह्मणून त्या येथें दिल्या आहेत. एक इंजन व दळण्याचें यंत्र व यांना जोडणारा एक पट्टा इतक्याला चांगला वाकबगार मनुष्य कशाला पाहिजे ह्मणून एक रेम्या डोक्या मनुष्य इंजन चालविण्यास ठेवला व हे गृहस्थ मालक होऊन चिठ्या लिहिण्यास बसले. दळण जेव्हां येई तेव्हां पुष्कळ येई व नाहीं तेव्हां मुळींच येत नसे. यामुळें केव्हां केव्हां अतीशय गर्दी होई तर केव्हां केव्हां इंजन बंद करावें लागे. इंजन चालू ठेऊन काम नसलें ह्मणजे तेलाचा खर्च उगाच होई. बंद करावें तर चालू करण्यास पुन्हा त्रास होई. व केव्हां इंजन पांच मिनीटांत सुरु होई तर केव्हां अर्धा तास लागे. तर केव्हां तास दोन तास लागत. यामुळें धड कांहींच होईना. केव्हां केव्हां इंजन दोन तीन दिवस बंद पडे. अशा वेळीं जर कोणाचें दळण अर्धवट झालेलें असलें तर तो मनुष्य खेपा घालून घालून भांडणावर यावयाचा, ज्यांचें दळण ठेऊन घेतलें असेल ते लोक कंटाळून जाऊन दळण परत मागावयाचे, परत देणें ह्मणजे नुकसान न देणें ह्मणजे भांडण अशा अडचणींत आल्यामुळें अखेरीस कारखाना बंद करून ठेऊन, विकत गेलातर कसातरी विकून टाकावयाचा निश्चय करून त्या उद्योगास लागला.

यंत्रें बिघडल्यामुळें कारखान्याचा खर्च फार वाढतो व यामुळें पुष्कळ नुकसान होतें असें वर सांगितलें आहे. परंतु यंत्रें कां बिघडतात याचें कारण सहज समजण्या सारखें नाहीं आज जें इंजन सुरळीत चाललें आहे तें इंजन आज जसें असेल तसेंच राहिलें तर आणखी १० वर्षांनीं देखील आजच्या सारखं चालेल. परंतु रोजच्या रोज इंजन चालू राहिल्यानें त्याचे कांहीं भाग झिजतात. व असे रोज झिजल्यानें कालांतरानें पुष्कळ फरक पडतो.

हा फरक काढून टाकून नवीन भाग बसवितांना अतीशय काळजी घ्यावी लागते. व हे भाग तयार करतानां मापें घेतांना थोडादेखील फरक असलेला चालत नाहीं. व नवीन केलेल्या भागांत व जुन्या भागांत जर थोडा बहुत फरक असेल तर हा नवीन भाग बसविल्यानें इंजनाचे दुसरे भाग बिघडतात. व अखेरीस इंजन बिघडतें व मग तेलाचा खर्च ही जास्त वाढतो.

## पत्र व्यवहार.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

कृ. न. वि. वि. आपल्या पत्रीं पुढील मजकुरास स्थळ द्याल अशी आशा आहे.

आपल्या पत्रांत ता० २१ जूनच्या अंकांत 'नसती उठाठेव' हा मजकूर वाचून त्यांत जेव्हां 'आह्मी मातृदिनाच्या विरुद्ध नाहीं' हें वाक्य दृष्टीस माझ्या पडलें तेव्हां आपल्या पत्रीं ह्यासंबंधानें दोन शब्द लिहून आपला व आपल्या वाचकांचा गैर समज दूर करावा असें वाटलें.

मातृदिनाची कल्पना प्रथम माझ्या डोक्यांत आली. तेव्हां मी इंदुप्रकाश, ज्ञानप्रकाश, ज्ञानोदय, जगद्वृत्त, चिकीत्सक, वगैरे पत्रांतून ही कल्पना मांडली. त्यावेळीं आयानवमीचाही उल्लेख करून सार्वजनिक रीत्या कोणता दिवस हयात माते संबंधानें पाळावा ह्मणून मी विचारलें होतें. त्याप्रमाणें बहुमतानें वैशाख वद्य ९ मी हा दिवस ठरविण्यांत आला. तो दिवस यंदा ता० ६ जून रोजीं आला आणि तो चार संस्थाकडून उत्तम प्रकारें साजराही करण्यांत आला.

उपनिषदांत 'मातृदेवो भव' अशा सारख्या आज्ञा असतांना सुद्धां मराठी भाषेंतच आईवरून शिव्या किती तरी दिल्या जातात ह्याचा अनुभव मुंबई सारख्या शहरांत पावलो पावलीं येत आहे. निदान अशा गोष्टीला तरी आळा पडणें किती इष्ट आहे हें कांहीं मी लिहिलें पाहिजे असें नाहीं. इंग्रजी भाषेंत आई वरून शिवी नाहीं हें विशेष लक्षांत धरण्यासारखें आहे.

अयानवमी ही हयात माते संबंधाची नसतां—त्यांत ढवळा ढवळ करणें योग्य नाहीं. तसें जर केलें असतें तर तेथूनही निष्कारण टिका झाल्या असत्या जुन्या चालींचा विध्वंस करण्याची व नुसती उठाठेवीची आमची इच्छा नाहीं आणि नव्या चाली समाजांत घुसडण्याची दुष्ट प्रवृत्तिही खास नाहीं. आपण माझा जर 'तुळस' यावर लोकप्रिय झालेला निबंध वाचाल (आपल्या पत्रांत प्रसिद्धी साठीं हवा असल्यास पाठवीन) तर आपली पूर्ण खात्री होऊन चुकेल कीं त्यांत कशा प्रकारचें वर्णन दिलेलें आहे.

अलिकडे आई बद्दलचा आदर कमी होत चालला आहे. अशाप्रकारची कित्येक ठिकाणीं ओरड चालू आहे. तर अशा वेळीं आपल्या भावी पिढीला चांगलें वळण लावणें हें आपलें आद्य पवित्र कर्तव्य नव्हे काय? 'वन्दे मातरम्' आपण ह्मणतानां लाजत नाहीं. तर मग ह्यात मातेची आपल्याकडून अल्पस्वल्प कां होईना सेवा घडावी अशी इच्छा जागृती करण्यासाठीं एक दिवस तरी कां देऊं नये? वैशाख महिण्यांत मुलांना सुटी असते. ते आपल्या घरीं असतात. त्या दिवशीं त्यांना मातृसेवेची जागृती देऊन वर्षांत केलेल्या मातृसेवेचा आढावा काढावयास शिकविणें योग्य नव्हे काय? आपण मातृदिनाच्या विरुद्ध नसल्यामुळें ह्या संबंधानें जास्त लिहिलें पाहिजे असें नाहीं. पण आपला व आपल्या वाचकांचा गैर समज दूर व्हावा एवढ्याच हेतूनें अगदीं त्रोटक हें पत्र लिहिलें आहे. क० लो० अ. हे वि०

मुंबई ता. २३-६-१५ } आपला. श्रीपाद केशव नाईक.

### वर्गणीदारांस आगत्याची सूचना.

**वर्गणीदारांकडे वर्गणीची मागील बाकी बरीच सांचली आहे. ती त्वरित पाठवून देण्याविषयीं टपालमार्गें विनंतिपत्रें पाठविलीं जात आहेत. कृपाकरून वर्गणीदारांनीं तगादा करण्यास अगर व्ही. पी. करण्यास भाग पाडूं नये हें त्यांस आमचें आगत्याचें सांगणें आहे. हल्लीं सर्वांस लढाईमुळें पैशाची तंगी असणें स्वाभाविक आहे हें आह्मी जाणून आहोंत परंतु त्याच कारणास्तव आह्मा वर्तमानपत्रकारांच्याही अडचणी द्विगुणित झाल्या आहेत ही गोष्ट लक्षांत घेऊन वर्गणी पाठवून देण्याविषयींच्या विनंतिपत्राचा अनादर होणार नाहीं अशी बळकट आशा आहे.**

**म्यानेजर.**

वऱ्हाडसमाचार

मित्ती ज्येष्ठ व॥ ८ शके १८३७

### हिंदी शिल्पकार.

पूर्वीच्या काळीं हिंदुस्थानामध्यें शिल्पज्ञानांत प्रवीण असे उत्तम कारागीर होते याची साक्ष जुन्या इमारती देतच आहेत. या शिल्पकारांना हल्लीं अत्यंत निकृष्टावस्था प्राप्त झाली आहे, पण याचें कारण त्यांच्या ज्ञानाची अवनति हें नसून सरकारानें त्यांची केलेली शोचनीय अपेक्षा हें वास्तविक आहे असें मि० हॅवेल सारख्या तज्ञांचें मत आहे. या मताचा उपहास पब्लिक वर्क्स खात्यांतल्या लोकांकडून व आंग्लोइंडियन पत्रकारांकडून होत असतो. पण मि. हॅवेल यांच्या मतांत बरेंच सत्य आहे हें निःपक्षपातानें विचार करणारांचे ध्यानांत आल्यावांचून राहत नाहीं. याचें ताजें उदाहरण ह्मणजे लंडन येथें ईस्ट इंडियन असोसिएशनपुढें मि० हॅवेल यांचें जें भाषण नुकतेंच झालें त्यावेळीं अध्यक्ष असलेले मि किंग यांचें भाषण होय. मि० किंग यांनीं मि० हॅवेल यांच्या विधानाच्या समर्थनार्थ सरकारी रिपोर्टांतलाच एक उतारा पुढें टाकला. ग्वालेर येथील रेसिडेंटाला राहण्यासाठीं एक भव्य इमारत बांधली जात आहे. तिच्या संबंधानें रिपोर्ट करतांना हिंदुस्थानचे कन्सल्टिंग आर्कि टेक्ट (मुख्य शिल्पशास्त्रज्ञ) यांनीं आपला रिपोर्टांत दिलेला अनुभव विचार करण्यासारखा आहे. ते लिहितात कीं सदर इमारतींचे नकाशे, नमुने वगैरे अगोदर तयार करून मग त्याप्रमाणें कारागिरांनीं इमारतीचें काम सुरू करावयाचें, पण कांहीं चुकीनें तसें न होतां देशी कारागिरांनीं एकदम कामाला सुरुवात केली. ही चूक माझे ध्यानांत आल्याबरोबर मी गोंधळून गेलों. आणि कामाचा सत्यानास झाला असेल अशा समजुतीनें तातडीनें ग्वालेरला जाऊन पोंचलों. पण आश्चर्य हें कीं देशी कारागिरांनीं अगदीं बिनचूक काम केलें होतें! देशी कारागिरांना याहून आणखी कोणतें सर्टीफिकीट पाहिजे! देशी कारागिरांना नकाशे काढतां येत नसतील, नमुने तयार करतां येत नसतील किंवा लियोडाइट सारख्या सूक्ष्म यंत्राचा उपयोग करतां येत नसेल. पण त्यांनीं बांधिलेल्या इमारती आज शेकडों वर्षें विद्युत्पात, व पर्जन्यवृष्टि यांच्याशीं टकरा देऊन अढळ उभ्या आहेत, आणि युरोपियन शिल्पशास्त्रज्ञांच्या देखरेखी खालीं पब्लिक वर्क्स खात्यामार्फत बांधल्या जाणाऱ्या इमारती पांच पंचवीस वर्षांतच लोळण घेत पडलेल्यांचीं शेकडों उदाहरणें आहेत. हा प्रत्यक्ष अनुभव असतां बिचाऱ्या देशी कारागिरांच्या अंगच्या गुणांची खरी पारख करणारा कोणी न निघाल्यामुळें ते उपासमारांत दिवस काढीत आहेत, व युरोपियन शास्त्रज्ञ लठ्ठ पगाराच्या जागा पटकावीत आहेत! यालाच 'विधि लिखित' ह्मणावयाचें, दुसरें काय?

### राधास्वामी सत्संग पंथ.

हिंदुस्थानचा विशेष हा आहे कीं त्यांत धार्मिक पंथांचे जेवढें जाळें आहे तेवढें पृथ्वीवरल्या कोणत्याही देशांत नसेल. अगोदरच असंख्य असलेल्या धर्मपंथांत अलीकडे सुशिक्षित ह्मणविणारांकडून आणखी भर पडत आहे. आर्यसमाज, ब्राह्मसमाज, प्रार्थनासमाज यांच्या मागून जे आणखी कित्येक पंथ निघाले त्यांत राधास्वामी सत्संग पंथ हा एक आहे. या पंथाची कांहीं माहिती सुबोध पत्रिकेनें नुकतीच दिली आहे. तिच्यावरून असें दिसते कीं हा पंथ पन्नास वर्षांपूर्वी तुळसीदास नांवाच्या एका गृहस्थानें काढला, व पुढें त्याला संयुक्त प्रांतांतील सुशिक्षितांचें पाठबळ मिळून तो पसरत चालला. हा वैष्णवपंथ आहे, तरी यांत विशेष महात्म्य गुरूचें आहे. हे लोक देवाचीं मंदिरें, तीर्थें, मशिदी, समाधि वगैरेंना महत्त्व देते नाहींत. फक्त गुरूची समाधि किंवा त्याची मूर्ति अथवा तसबीर हीच एक पूज्य वस्तु, बाकीच्या सार्‍या तुच्छ असें ते समजतात. संसार वीट नेटका करून या पंथाचें ध्येय—गुरूच्या प्रसादाची

प्राप्ति करून घ्यावी, ह्मणजे मग राजकीय चळवळ नको, सामाजिक सुधारणा नको, शिक्षणप्रसार नको, कांहीं नको, असें त्यांचें विचित्र मत आहे. फार काय, पण ज्याला त्याला स्वतःचा कोणताही धर्म असो, तो न सोडतां या पंथांत येतां येतें. हा पंथ जातिभेद मानीत नाहीं, स्त्रिया व पुरुष यांना परस्परामध्यें मिसळून व्यवहार करतां येतात, पण हें सगळें फ्रीमेनसरी प्रमाणें गुप्तपणें करावयास पाहिजे असें या पंथाचें मत आहे. संयुक्त प्रांताचे एके काळीं पोस्ट मास्तर जनरल असलेले राय शालिग्राम साहेब बहादुर हे या पंथांत प्रविष्ट होऊन त्या पंथाच्या गुरूच्या गादीचा ही मान त्यांना मिळाला होता असें सांगतात. आश्चर्य हें आहे कीं शिक्षणप्रसाराबरोबर खऱ्या धर्माची कल्पना स्पष्ट होत जावी, पण तसें न होतां असें नवे नवे धर्मपंथ स्थापन करण्यांत किंवा त्यांस जाऊन मिळण्यांत सुशिक्षितांचें साह्य मिळत आहे. आमच्या नागपूर प्रांतीं परांजपे बुवांनीं माजविलेलें गुरूचें खूळ व त्याचें झालेलें आविष्करण लोक अद्याप विसरले नसतीलच.

## हिंदुस्थानांतला मद्यप्रसार

मद्यपानाचे परिणाम व्यक्तीच्या प्रकृतीवर व मानसिक स्थितीवर व त्याचप्रमाणें एकंदर समाजस्थितीवर अत्यंत घातूक होतात, ही गोष्ट पाश्चात्यांच्या नजरेस अलीकडेस येऊन त्याला प्रतिबंध करण्याचे प्रयत्न इंग्लंडसारख्या देशांतून अलीकडे होऊं लागले आहेत. पण त्या प्रयत्नांना यावें तसें यश आलें नाहीं. पण जी गोष्ट या विसाव्या शतकांत पाश्चात्यांना सुद्धां अशक्य वाटूं लागली आहे तिचा पूर्ण बंदोबस्त आमच्या शास्त्रकारांनीं हजारों वर्षांपूर्वी करून टाकलेला होता, आणि शास्त्रांचीं बंधनें शिथिल झाल्यापासूनच मद्यपानाचें खूळ आमच्या लोकांत पसरूं लागलें. अलीकडे शिक्षणप्रसारानें मद्यपानाला कांहीं आळा बसला आहे असा कित्येकांचा भ्रम आहे. पण हा भ्रमच आहे हें दरवर्षीचे अबकारी खात्याचे रिपोर्टावरून स्पष्ट दिसत आहे. नागपूर व वऱ्हाड प्रांताचे गेल्या पांच सालचे रिपोर्ट घेतले तरी त्यांवरून हे अनुमान कोणालाही काढतां येईल. अबकारी खात्याचें उत्पन्न दरसाल वाढत्या प्रमाणावर आहे हें या गोष्टीचें एक प्रत्यक्ष प्रमाण आहे. पण या विरुद्ध सरकारी अधिकाऱ्यांचा असा आक्षेप असतो कीं हें वाढतें उत्पन्न दारूचा खप वाढल्यामुळें होत नसून अबकारी अधिकाऱ्यांच्या दक्षतेचा व जागरूकतेचा परिणाम आहे. ह्मणून या प्रमाणावर विशेष भर न ठेवतां प्रत्यक्ष देशी दारूचा खप वाढता आहे कीं नाहीं हें पाहिलें पाहिजे. हा वाढता आहे हें सरकारी रिपोर्टांतल्या आंकड्यांवरूनच दाखवितां येतें. १९१० १९११ सालीं या प्रांतांत देशी दारू १०३९६८८ ग्यालन खपली. १९११-१२ सालीं हें प्रमाण १०६६८८० वर गेलें. १९१२-१३ मध्यें त्यानें १२०१३४६ वर उडी मारली. या आंकड्यांवरून कोणी ही झालें तरी दुसरें काय अनुमान काढणार? लोकांत मद्यपानाला आळा बसावा ही सरकारची मनापासून इच्छा आहे याविषयीं शंका नाहीं. माजी स्टेटसेक्रेटरी लॉर्ड क्रू यांनीं मद्यपान कमी करण्यासंबंधानें सरकारी अधिकाऱ्यांना सूचना ही केलेल्या आहेत. पण त्यांचा प्रत्यक्ष परिणाम पहावा तर विपरीत होत आहे! पुण्याहून जवळच असलेल्या थोडें गांवीं लोक नको नको ह्मणत असतां सरकारी अधिकारी जबरदस्तीनें तेथें दारूचें दुकान उघडतात, अशीं ही उदाहरणें मधून मधून घडतात. या वरून सरकारला अबकारी खात्याचें दांडगें उत्पन्न बुडूं न देण्याचा पडणारा जबरदस्त मोहच मद्यपाननिषेधक चळवळीच्या आड येत आहे असें लोकांना वाटणें साहजिक नाहीं काय? धर्मशास्त्रें, मद्यपान निषेधक मंडळ्यांचे यत्न व सरकारचे सदुद्देश यांना न जुमानण्याइतकें मद्यपानाचें व्यसन दांडगें झालें आहे तें कशामुळें हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे.

## पिंवळें संकट.

प्रस्तुतच्या युरोपांत चाललेल्या युद्धाचा हिंदुस्थानवर निरनिराळ्या रीतीनें घडणारा परिणाम हा मुत्सद्यांना, व सामाजिक सुधारकांना विचार करण्या सारखा प्रश्न आहे. पैकीं सामाजिक सुधारणेवर घडणाऱ्या परिणामा विषयीं आह्मीं नुकतेंच एका अंकांत विवेचन केलें आहे, व पहिल्याच्या मानानें पाहतां हा दुसरा प्रश्न ही इतका महत्त्वाचा नाहीं. हिंदुस्थानानें या युद्धांत केवळ राजनिष्ठा व कर्तव्यनिष्ठा जाज्वल्य ठेवून ब्रिटीश साम्राज्याच्या रक्षणार्थ जें द्रव्य व द्रव्याहून ही मोलवान् असें मनुष्यप्राण यांचें समर्पण केलें त्याच्या मोबदल्यांत त्याला पुढें कोणते राजकीय हक्क ब्रिटीश सरकाराकडून देण्यांत येतील तें आज सांगतां येत नाहीं. तो भविष्यकाळचा प्रश्न आहे. पण आज अतिशय निकडीचा प्रश्न ह्मणजे हिंदुस्थानच्या पोटापाण्याचा आहे. हिंदुस्थानांतले धंदे एका मागून एक बुडत चालले आहेत. त्यांना मदत करण्याची सरकारची इच्छा आहे, व तसे प्रयत्न सरकाराकडून अंशतः होऊं ही लागल आहेत ही आनंदाची गोष्ट आहे, पण हे प्रयत्न हल्लीपेक्षां दसपट अधिक जोरानें व जल्दीनें झाले नाहींत, तर जपान हिंदुस्थानचे व्यापार धंदे अजिबात बुडवील कीं काय अशी भीती आतां दिवसेंदिवस ज्यास्त वाटूं लागली आहे. जपानी लोक धाडशी, शास्त्रज्ञानांत प्रगति करून स्वस्त माल उत्पन्न करण्यांत वाकबगार आणि त्यांना त्यांच्या सरकारचें पूर्ण पाठबळ आणि आह्मी हिंदुस्थानचे लोक पूर्णपणें नवशिके, शास्त्रज्ञानाचा गंध नसलेले, व सरकारचें पाठबळ ही बहुतेक नाहीं. अशा पूर्णपणें विसदृश स्थितींतल्या दोन राष्ट्रांच्या औद्योगीक मल्लयुद्धांत कोणत्या राष्ट्राशीं सरशी होईल हें सांगण्यास भविष्य वाद्याची किंवा फलज्योतिषज्ञाची अवश्यकता नाहीं. हिंदुस्थानचा हा कमकुवतपणा लक्षांत आणून हिंदुस्थानाचा सगळा व्यापार आपले हातांत यावा ह्मणून जपानचे आटोकाट प्रयत्न सुरू आहेत. जपानसरकारचे एजंट हिंदुस्थानांत ठिकठिकाणीं फिरून तेथें लोकांना कशाप्रकारच्या मालाची जरूरी आहे व ती कशी पुरवितां येईल या विषयींची माहिती मिळवून पाठवित आहेत. इतके दिवस जपानी आगपेट्या तेवढ्या इकडे येत असत. आतां जपानी आगपेट्यांचा खप तर वाढला आहेच पण त्याबरोबर जपानी औषधें, जपानी पेनसिलीं, जपानी खेळणीं, जपानी कांचेच्या वस्तु, (बांगड्या, बाटल्या) जपानी दांतवण, इत्यादि शेकडों वस्तूंचा खप वाढत्या प्रमाणावर होत आहे. हिंदुस्थानांत प्रस्तुतच्या युद्धामुळें जर्मन किंवां आस्ट्रियन माल येऊं शकत नाहीं. ब्रिटीश माल तयार करण्यास मजुरांचा अभाव आणि ज्यास्त भाडें या अडचणी आहेत, आणि हिंदुस्थानांत कारखाने नाहींत, या अडचणीचा फायदा घेऊन जपान आपले घोडें सपाट्यानें दामटीत चालला आहे. आजपर्यंत जर्मनीनें हिंदुस्थानची उपासमार केली, आतां जपान करूं पाहत आहे. मिळून हिंदुस्थानच्या नशिबीं उपास मारच ठेविलेली दिसते. उपासमार ती उपासमारच. मग ती सख्या आईनें केलेली असो, कीं सावत्र आईनें केलेली असो. मुलावर तिचा परिणाम सारखाच घडावयाचा तसें हिंदुस्थानचे उद्योग धंदे व व्यापार जर्मनी सारख्या शत्रुराष्ट्रानें बुडविले काय? किंवा जपानसारख्या दोस्त राष्ट्रानें बुडविले काय, हिंदुस्थानवर सारखाच अनिष्ट परिणाम त्यापासून घडणार आहे. हिंदुस्थानावर येत असलेल्या या पिंवळ्या संकटाचा प्रतिकार जितक्या लवकर करतां येईल तितक्या लवकर करणें हें आतां हिंदुस्थान सरकारचें अतिशय निकडीचें कर्तव्य आहे. जपानी लोकांना त्यांच्या सरकारची मदत ज्या कामीं फार मोठी आहे; आणि आमची स्थिति याच्या उलट आहे. ही विषमता नाहींशीं झाल्या शिवाय आणि हिंदुस्थान सरकार देशी उद्योगधंद्याला शक्य तितक्या प्रकारें मदत करण्यास पुढें झाल्या शिवाय जपानच्या स्पर्धेंत हिंदुस्थान टिकाव धरूं शकणार नाहीं हें आतां सूर्यप्रकाशा इतकें स्पष्ट आहे. हिंदुस्थान सरकारनें ही मदत कोणत्या प्रकारें करावयाची त्याची दिशा ठरविण्यासाठीं देशी व्यापारी व उद्योगधंदेवाले आणि सरकारी अधिकारी यांनीं मिळून कांहीं तरी विचार करणें अत्यंत अगत्याचें आहे. हिंदुस्थानच्या मालाला संरक्षणाचें तत्त्व लावणें, देशी कारखान्यांना भांडवलाचा पुरवठा स्वल्प व्याजानें करणें, देशी मालच वापरण्याविषयीं सरकारी अधिकाऱ्यांना ताकीद करणें हे उपाय सरकारच्या हातांतले आहेत. त्याचप्रमाणें जी बहिष्काराची चळवळ आमच्यांतल्या पुढाऱ्यांनीं थोड्या वर्षांपूर्वी अविचारानें विलायती माला संबंधानें करून पाहिली, तिचा रोख जपानाकडे वळवून जपानी मालाचा खप कृत्रिम उपायांनी बंद पडेल, निदान त्याला आळा तरी बसेल असें करणें हें लोकांच्या पुढाऱ्यांचें कर्तव्य आहे. जपानी लोक मोठे मतलबी आहेत. त्यांनीं हिंदुस्थानांतल्या मालाचे व कारागिरीचे नमुने आयते जपानी कारखानदारांच्या नजरेस पडावे ह्मणून पुढचे वर्षी जपानांत एक जंगी प्रदर्शन भरविण्याचें ठरविलें आहे. या प्रदर्शनांत हिंदुस्थानानें कोणत्या ही प्रकारें भाग न घेतां व आपला हात दाखवून अवलक्षण करून न घेतां त्यापासून अलिप्त राहवें असा कलकत्त्याचे देशी पुढाऱ्यांनीं नुकताच जो ठराव पास केला तो खरोखर आत्मसंरक्षणाच्या दृष्टीनें फार शहाणपणाचा व दूरदृष्टीचा होता. पण प्रदर्शनापासून नुसतें अलिप्त राहिल्यानें भावि संकट टळेल असें मात्र समजूं नये. हा औद्योगिक निवृत्तिमार्ग झाला त्याला स्वदेशी उद्योग धंदे वाढविण्याच्या प्रवृत्ति मार्गाची जोड मिळाल्याशिवाय कांहीं एक होणें नाहीं. हा प्रवृत्तिमार्ग ह्मणजे सरकारची मदत मिळवून व बहिष्काराचें तत्त्व अमलांत आणून देशी उद्योग धंद्याची भरभराट करणें हाच आहे. या दोन्ही मार्गांचें अवलंबन आणि तेंही शक्य तितक्या त्वरेनें केलें नाहीं, तर हिंदुस्थानच्या नशिबीं औद्योगिक बाबतींत जपानचें दास्य करणें ठेवलेलें ह्मणून समजावें.

## युद्धाची प्रगति.

आस्ट्रिया व जर्मनी या दोघांच्या संयुक्त फौजांनीं दोन महिने शिकस्तीचे प्रयत्न करून लेंबर्ग शहराचा ताबा रशियापासून एकदांचा मिळविला येथपर्यंत गेल्या आठवड्यांत युद्धाच्या पुराणाची मजल झाली होती. लेंबर्ग सोडण्यांत आणि युद्धाला तोंड न देतां मागें हटण्यांत रशियाचें वर्तन 'सर्वनाशे समुत्पन्ने अर्धं त्यजति पंडितः' या वचनाप्रमाणें झालें. कारण, शत्रूची फौज फार मोठी, त्यांचा तोफखाना उत्कृष्ट प्रतीचा; रशियाजवळ दारूगोळ्याचा तुटवडा, आणि त्यांचा आपली मुख्य फळी फोडूं द्यावयाची नाहीं या गोष्टीवर मोठा कटाक्ष, अशा स्थितींत लढाईला तोंड देण्यांत अर्थ काय होता? तरी बारीक सारीक चकमकींत रशियानें आपली विलक्षण चिकाटी दाखविली. गेल्या महिन्या दीड महिन्यांत रशियानें शत्रूचे एक लक्ष तीस हजार लोक कैद केले व ३०० मशीन तोफा व ९० साध्या तोफा हस्तगत केल्या ही कांहीं सामान्य गोष्ट नव्हे. रशियांत पोलंडच्या बाजूला रेलवेच्या सोयी नसल्यामुळें मोठ्या सैन्याच्या हालचाली करण्यास रशियाला फार अडचण पडते. ग्यालिशियामध्यें व पोलंडमध्यें रशियाला कच खावी लागते ती यामुळेंच पश्चिमेकडच्या रणक्षेत्रांत फ्रेंचांनीं आरासमध्यें जें पाऊल टाकिलें आहे तें मागें घ्यावें लागलें नाहीं. अलसेस व लोरेनमध्यें फ्रेंचांचें पाऊल सारखें पुढें पडत आहे हें पाहून जर्मनीला आपली रिझर्व फौज तिकडे न्यावी लागली आहे. तिकडे इटलीच्या बाजूला ही इटलीनें शत्रूच्या छातींत धडकी भरवायला लाविलें आहे. इटलीचा रोख ट्रिएस्ट वर आहे. आणि त्यांचा मार्ग अडविण्याइतकी ताकद आस्ट्रियाचे अंगीं नाहीं. अर्थात् जर्मनीलाच आपलें एक सैन्य तिकडे दोस्ताच्या मदतीला पाठविणें भाग आहे. जर्मनीजवळ मोठें सैन्य आहे खरें, पण त्यानें दोस्त राष्ट्रांच्या प्रबळ ओघाला अडवून धरावयाचें कीं आस्ट्रियाच्या मदतीला धावावयाचें! इटलीच्या सैन्यांत रोज भरती चालली आहे. खुद ब्रिटिशांना आज मोठी अडचण ह्मणजे

दारूगोळ्याची येऊन पडली आहे. ही नसती तर आज ब्रिटिश सैन्य खुद्द जर्मनीमध्यें जाऊन पोचलें असतें, आणि कदाचित् युद्धाचा शेवटचा निकाल ही ऐकण्यास मिळाला असता. आस्ट्रिया व जर्मनी मिळून रोज अडीच लाख कुलुपी गोळे नवे तयार करीत असतात असा मि० लाइड जार्ज यांचा अदमास आहे. ब्रिटिश लोक दारूगोळ्याचा तुटवडा भरून काढण्यासाठीं शक्य तेवढे प्रयत्न करीत आहेत. तरी आज त्यांना त्यासाठीं फ्रान्सवरच आपली मुख्य मदार ठेवणें भाग आहे. पूर्व आफ्रिकेंत पोर्ट ब्युकोबा येथील जर्मनाचा एक मजबूत किल्ला इंग्रजांनीं जमीन दोस्त केला, व कांहीं तोफा घेतल्या. जर्मनीनें लढाईत विषारी वायूचा उपयोग केला या बद्दल सारें जग त्याची छीः थूः करीत आहे, पण कित्येक जर्मनपत्रें निर्लज्जपणानें विचारीत आहेत कीं यांत जर्मनीनें काय अधर्मकृत्य केलें? हा विषारी वायू हळू हळू शत्रूकडे पसरत जातो, पण प्राणहानि फारशी करीत नाहीं— निदान हें कृत्य बेलज्यमनें खाड्यांचे बांध फोडून सगळा प्रदेश जलमय करून सोडला होता— तितकें तरी निंद्य खास नाहीं. मनुष्याची प्रवृत्ति पापाचरणाकडे एकदा झाली कीं त्याची मनोदेवता ही कशी त्याची गुलाम बनते त्याचें हें छानदार उदाहरण आहे.

---

## युद्धोपयोगी साधनांची नोंद

प्रस्तुत युद्धाचा निकाल कायमचा लागेपर्यंत चिकाटी सोडावयाची नाहीं असा इंग्लंडचा कृतनिश्चय आहे, आणि त्यासाठीं अवश्य ते कायदे व साधन सामुग्री जुळविण्याचे उपाय घडवून आणण्यांत इंग्लंडचे मुत्सद्दी गुंतले आहेत. दारूगोळा संपत आला तर तो तयार करण्यासाठीं नवे कारखाने काढण्याचा विचार चालला आहे. मजूर मिळत नाहींत तर ते ब्रिटिश वसाहती व हिंदुस्थान यांतून आणविण्याची तजवीज सुरू आहे. सैन्यांत शिपायांची भरती करण्यासाठीं सक्तीच्या लष्करी सेवेचें तत्त्व स्विकारण्यास ही हल्लींचें प्रधानमंडळ कबूल होईल, असा सुमार आहे. त्याबरोबरच युद्धोपयोगी अशीं किती माणसें ग्रेटब्रिटनमध्यें निघतील याचा अंदाज पाहण्यासाठीं अशा माणसांची नोंद खानेसुमारी सारखी करण्याविषयींचें बिल मि० वॉल्टर लांग हे या आठवड्यांत आणणार आहेत. या नोंदणीपत्रकांत प्रत्येक माणसाचें नांव, त्याचें कायमचें राहण्याचें ठिकाण, वय, प्रकृति वगैरे बद्दलची माहिती नोंदण्यांत येणार आहे. या सगळ्या गोष्टीं बरोबरच हिंदुस्थानांतल्या लोकांना व्हालंटियर ह्मणून सैन्यांत भरती होण्याची परवानगी देण्याची सूचना करण्याची कल्पना जर कोणी पार्लमेंटपुढें आणील तर ती मान्य होण्याचा संभव आहे. हिंदुस्थानचे मित्रापैकीं कोणी पार्लमेंटचे सभासद ही गोष्ट मनावर घेतील तर त्यानें ब्रिटिश राज्याला मोठें साह्य केल्याचें श्रेय मिळविल्यासारखें होईल.

---

## वऱ्हाडवृत्त.

**हवामानः**—या आठवड्यांत पावसाची उघाडी असून आकाश साभ्र होतें व मधून मधून जोराचे वारे वहात होते. पेरणीचीं कामें सुरू आहेत. हवा स्वच्छ व निरोगी आहे आणि शहरचें शरीरस्वास्थ्यही ठीक आहे.

आमच्या जिल्ह्याच्या डेप्युटी कमिशनरचे क्लार्क ऑफ् कोर्ट रा० रा० तात्यासाहेब दुर्गे व येथील टाऊन ए. व्ही. स्कूलचे हेडमास्तर रा० रा० पांडे या उभयता गृहस्थांचे चिरंजीव एम्. ए. च्या परीक्षेंत उत्तीर्ण झाले हें कळविण्यास आनंद वाटतो, व त्यांचें आह्मी अभिनंदन करतों.

यंदाच्या मॅट्रिकच्या परीक्षेस येथील हायस्कुलांतून ४८ विद्यार्थी गेले होते पैकीं २९ पसार झाले· एकंदर निकालाच्या हुषार मानानें हायस्कुलचा हा निकाल समाधानकारक आहे. आणि तो येथील येथील मेहनती व अनुभाविक हेडमास्तर यांस भूषणावह आहे. नापास झालेल्या विद्यार्थ्यांना येथील हायकूलमध्यें जागा नाहीं ह्मणून सांगण्यांत आल्यावरून आणखी एक नवीन मॅट्रिकचा वर्ग काढण्याबद्दल वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे विनंति करण्यांत आली आहे असें कळतें. खामगांवच्या हायस्कूलाला अजून मॅट्रिकचा वर्गच नाहीं, व दुसरीकडेही जागा नाहीं ह्मणून सांगण्यांत येत आल्यानें विद्यार्थ्यांचा कोंडमारा होऊन बरेंच नुकसान होतें इकडे शिक्षणखात्याच्या अधिकाऱ्यांचें लक्ष गेल्यास बऱ्याच लोकांकडून सरकारास दुवा मिळणार आहे.

**साभार स्वीकारः**— 'राधा– गोविंद' पुस्तक मालेंचे सातवें व आठवें पुस्तक अनुक्रमें 'साधुसंतांच्या गोष्टी' व 'बालमनोरंजन' अशीं आमच्याकडे आलीं त्यांचा आह्मी साभार व सप्रेम स्वीकार करतों. हीं पुस्तकें आमचे स्नेही रा० रा० वासुदेव गोविंद आपटे, बी.ए., आनंदाचे संपादक यांनीं लिहीलीं आहेत एवढें सांगितलें ह्मणजे त्यांची निराळी शिफारस करण्याचें कारणच नाहीं. पहिल्या पुस्तकांत ठळक १९ साधुंच्या गोष्टी भक्तलीलामृताच्या आधारें सांगितल्या असून आरंभीच्या दोन शब्दांत खऱ्या साधूचें लक्षण काय याचें साधारण विवरण केलेलें आहे. व रामदास, तुकाराम, तुलसीदास यांचे फोटोही दिलेले आहेत. बाल 'मनोरंजनांत' इसापनीतीतल्या गोष्टीच्या धर्तीवर पशुपक्षादिकांच्या २८ गोष्टी सांगितल्या असून प्रत्येक गोष्टीपासून काय शिकावें हेंही मोठ्या ठळक अक्षरांत सांगितलें आहे. यांपासून व्यवहारांत कसें वागावें याचाही धडा मिळण्यासारखा आहे. दोन्ही पुस्तकें ल्हान मुलांना समजेल अशा अगदीं सोप्या व सरळ भाषेंत लिहिलीं आहेत आणि तीं ल्हान मुलांच्या हातीं डोळे झांकून देण्यासारखीं आहेत एवढेंच नाहीं तर तीं मुद्दाम त्यांचें कडून वाचून घेऊन त्यांचा अभ्यास करवून घेण्यालायक त्यांच्या आजपर्यंतच्या इतर पुस्तकांप्रमाणेंच आहेत यांत शंका नाहीं. दोहोंची किंमत अगदीं अल्प ह्मणजे अनुक्रमें पांच व दोन आणे असल्याने बहिण भावंडांनीं एकमेकांस प्रेमाची खूण ह्मणून नजर पाठविण्यासारखीं आहेत.

---

## नोटीस

रायजी मर्द तुकाराम भुरे महार राहणार बोरगांवमंजू तालुका आकोला.

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं माझी लग्नाची बायको असून तू सरासरी माझ्या घरीं शाहाणी झाल्यावर १ वर्षभर राहिलीस मग पुढें तुझ्या आई बापानें दिवाळी करितां निरोप पाठविल्यावरून तू आणि मी दोघेही बरोबर दिवाळी करितां गेलो दिवाळी झाल्यावर तुझ्या आई बापानें माझ्या बरोबर तुला पाठविले नाहीं. मग पुन्हा तुला आणण्याकरितां २–३ वेळा आलो परंतु तुझ्या आई बापानें पाठविले नाहीं. ह्मणून तू आपल्या आई बापाचे ऐकून त्यांच्या नादी लागलीस हे चांगले नाहीं. तुझा माझा बेबनाव मुळींच नव्हता तरी आतां तुझ्या आंगावर डाग आहेत ते येणेंप्रमाणें १ सोन्याची नथ ६ मासे १ कोपरवाळ्याचा जोड २· तोळे चांदीचा १ सरी ७ तोळ्याची हे घेऊन माझ्या घरीं १५ दिवसाचे आंत येऊन राहावे. मी नांदविण्यास तयार आहे. न आल्यास कोर्टमार्फत फिर्याद करावी लागेल ता. २९।६ १९ इ. रोजीं.

द० शामा बकशी वानखडे. रा. आकोला सही.

तुकाराम वा॥ राजा महार भुरे
राहणार खुर्द पिंपरी तालुका
मंगरुळपीर जिल्हा आकोला
निशाणी हातची.

नो० नं० २६६

---

## नोटीस

नोटीस बेशमी परशराम वा॥ रावजी बढे जात कुणबी रा० पळसो बु॥ ता. आकोला.

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून या नोटिसीनें तुह्मांस कळविण्यांत येते कीं नोकरनाम्याचे माझे पैसे वसूल करून मजला मिळावेत ह्मणून मी तुह्मास माझें तर्फे कुलमुखत्यारपत्र देऊन तारीख ९।३-१९१४ रोजीं नोंदून दिलें आहे. व ज्या ज्या नोकरनाम्यावरून पैसे वसूल करण्याचे ते नोकरनामे तुमचे स्वाधीन केले असून आजपावेतो तुह्मी पैसे वसूल करून आणून दिले नाहींत. सबब या नोटिसीनें वरील तारखेस तुह्मांस दिलेले कुलमुखत्यारपत्र रद्द केले आहे. तरी आठ दिवसाचे आत माझे मालकीचे नोकर नाम्याचे कागद व वसूल केलेला नोकर नाम्याचे पैसे असें मजला देऊन माझी पावती घ्यावी व माझे नांवावर कोणतेही प्रकारचा व्यवहार करूनयें केल्यास मी अगर माझी इस्टेट जबाबदार राहणार नाहीं. त्याबद्दल तुह्मी जबाबदार आहात ही नोटीस दिली मुकाम आकोला ता० २९।६।१९१९ इ.

दस्तुर यशवंत माधव पतारकर रा० आकोला द. खु. सही.

१ धनाजी वा॥ मुकाजी बढे
धनगर रा० पळसो बु॥
याचे हाताची निशानी
आंगठा डावा.

नो० नं० २६७

---

## नोटीस

नोटीस कलम ११ एक्ट ८ सन १८९० प्रमाणें किरकोळ दिवाणी मुकद्दमा नंबर २८ सन १९१९ इ.

विद्यमान डि० जज्ज साहेब बहादुर यांचें कोर्ट मुकाम आकोला

नांव आनंदा

बापाचें नांव सदाशिव

जात आर्यन राहणार एकलारा

तहसील चिखली जिल्हा बुलडाणा

ह्या अल्पवयी संपत आणि त्रिंबक बळवंत आर्य उमर वर्षे १०–४

राहणार एकलारे ता. चिखली तहसीलीचे [१] शरीर व इस्टेट रक्षणा साठीं पालन कर्ता (१। नेमला जाण्या विषयींच्या अर्जा संबंधीं सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं सदर्हू अर्जदारानें सदर्हू अल्पवयीचें २० शरीर व इस्टेट रक्षणा साठीं पालन कर्ता

४ नेमला जाण्याविषयीं अर्ज केल्या वरून सदर्हु अर्जाची सुनावणी व चौकशीची तारीख २१ माहे आगष्ट

सन १९१९ इ. रोजीं नेमिली आहे. त्यावरून अशी नोटीस देण्यांत येत आहे कीं, सदर्हू अर्जदाराच्या अर्जाबद्दल जर कोणास कांहीं तक्रार असेल तर त्यास जातीनें किंवा कोर्टानें अधिकार दिलेल्या ज्या वकीलास योग्य माहिति दिली असेल व अर्जासंबंधीं सर्व मुद्याच्या सवालांच्या जबाब देण्यास जो समर्थ असेल किंवा अशा सर्व सवालांचा जबाब देऊ शकेल असा कोणी दुसरा असामी ज्याच्या बरोबर असेल अशा प्लीडराच्या मार्फत या कोर्टांत हाजर झाले पाहिजे; आणि त्यास असें ही नोटीस देण्यांत येत आहे कीं सदरी लिहिलेल्या दिवशीं तो हाजर न झाल्यास, त्याच्या परोक्ष अर्जाची चौकशी होऊन ठराव केला जाईल. आज तारीख १९ माहे मे सन १९१९ इ. रोजीं आमच्या सहीनिशीं व कोर्टाच्या शिक्या-निशी दिली.

शिक्का

K. K. Thakur.

नो० नं० २७२ डि० जज्ज आकोला

---

## नोटीस

सर्व लोकांस माहीत होणें करितां जाहीर करण्यांत येते कीं, आकोले येथील मि० अनवरखा हाजीहुसेनखा यांनीं त्यांचे, सिव्हील स्टेशन मधील बंगल्याचे समोरील ४००+१०० फुट जागा व पश्चिमे कडील २७९+१०० फुट जागा हद्द वाढवून बगीच्या करणे करितां मिळावी ह्मणून अर्ज दिला आहे. व ती जागा ता० १८·७·१९१९ इ० रोजीं सकाळीं ७ वाजतां ठिकाणावर हरास केली जाईल. पट्टेदारांस सदर्हु जमीनीचा उपयोग वर निर्दिष्ट केलेले कामाशिवाय इतर कामाकडे डे० क० सा० ब० यांचे लेखी परवानगी. शिवाय करतां येणार नाहीं. कौलपट्टा तीस वर्षा करितां घेतला जाईल. पट्टेदारांस कौल पट्याचे ठरलेलें नमुन्यांतील शर्ती कबूल असल्या पाहिजेत. कळावें. ता० २९-६-१९

N. N. 171 Jay-Narain E. A. C. Akola.

## नोटीस

नोटीस घेणारे तोली गर्द कृष्णाजी फळके कुणबी रा० पळसोद ता० आकोट

ईस:—

नोटीस देणार निबाजी वा॥ रंभाजी कुणबी आरोडे रा० पळसोद ता. आकोट नोटीस देतो ऐसाजे ता० १६।६।१९ रोजीं तुह्मी मजजवळून प्रॉमेसरी नोट रुपये ५५० साडे पाचशें ची बन्ती किसनदास मारवाडी यांचे हस्तें लिहून घेतली. व याशिवाय साडेपांचशें रुपयाचा भरण्याची पावतीही निराळी लिहून घेतली प्रामीसरी नोट लिहिल्यावर निराळी पावती लिहून घेण्याचे कांहीं कारण नव्हतें. प्रामीसरी नोट व पावतीचे भरण्याचे रुपये १०० शेंभर फक्त तुह्मी नोट लिहिते वेळेस दिले बाकीचे रु० ४५० साडेचारशे २-४ दिवसांनीं देण्याचे कबुल केले. प्रामीसरी नोटीचे व पावतीचे रु० ४५० साडेचारशें तुह्मास मागीतले असतां देऊं ह्मणता व बेईमानाच्या गोष्टी बोलतां करून रु ४५० देण्याबद्दल संशय वाटतो. सबब नोटीस देण्यांत येते कीं रु. ४५० राहिलेले आठ दिवसाचे आंत मजला द्यावेत. कारण भरण्याचे राहिलेले रु ४५० मजला मुळींच पावले नाहींत, रुपये न दिल्यास ठगबाजी बद्दल तुमचेवर काम चालवावे लागेल. कदाचीत रुपये वसूल करण्या बद्दल तुह्मीही दावा कराल करितां भरण्याचे राहिलेले रु० ४५० मजला द्यावेत, व आपला लेख खरा करून घ्यावा यांत नीटपणा आहे. तुह्मी माझी बहीण असून असे ठकरणा करितां हें बरोबर नाहीं. ही नोटीस दिली तारीख ३० माहे जून सन १९१९ इ.

दस्तुर नारायण वामन रा. आकोला.

सही.

निबाजी वा॥ रंभाजी आरोडे कुणबी रा० पळसोद ता. आकोट नि. खु. असे.

नो० नं० २६८

## जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांस या जाहीर नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, परशराम वा॥ रावजी बढे जात कुणबी रा० पळसो बु॥ ता० आकोला. यांस:—

मी माझे मालकीचे नोकरनाम्याचे पैशे वसूल करण्या करितां नौकरनाम्याचे कागद त्याचे स्वाधीन करून त्यांस ता० ९-४ १४ इसवी रोजीं कुलमुकत्यार पत्र दिलें आहे. परंतु त्यांनीं आज पावेतो कोणत्याच नौकरनाम्याचे पैशे वसूल करून माझजवळ देऊन माझी पावती घेतली नाहीं. सबब त्याचे कुलमुकत्यार पत्र रद्द केलें आहे. तरी त्याजला आता कोणी माझे मालकीचे नोकरनाम्याचे पैशे देऊं नयेत. दिल्यास मी जबाबदार नाहीं. व माझे नांवावर त्याच्याशीं कोणते ही प्रकारचा व्यवहार करूं नेये. केल्यास मी व माझी इस्टेट जबाबदार नाहीं. कळावें. मुकाम आकोला ता० २९ ६-१९१९ इसवी दस्तुर यशवंत माधव पसारकर रा० आकोला द० खु०

सही

१ धनाजी वा॥ मुकाजी धनगर काळे रा० पळसो बु॥ याचे हातची निशीनी आंगठा डावा

नो० नं० २६९


## सचित्र कोकशास्त्र

रासिक गृहस्थहो घेण्याची त्वरा करा. हा एक मोठा ग्रंथ आहे. ज्याच्या तपासांत आपण पुष्कळ काल पर्यंत आहों व जो आतिशय पारिश्रम करून व द्रव्य खर्च करून ही न मिळण्यासारखा आहे. असा हा ग्रंथ छापून हल्लीं तयार आहे. यामध्यें स्त्री पुरूषांच्या जातीभेद लक्षणें, गर्भधारणेचे नियम, स्त्री पुरूषांच्या अनेक रोगांची औषधी चिकित्सा व त्यांचे निदान इत्यादि अनेक विषय आहेत. हा ग्रंथ अमोलिक विषयांचे एक भांडारच आहे. किंमत रू.१ ट.ख. दोन आणे. पत्ता स्पष्ट बालबोधींत लिहावा.

पी.एल. शर्मा अलीगढ.

नो. नं २७०

सतत ४२ वर्षें चाललेला कारखाना

## ए. जे. ह्मात्रे आणि सन् सुगंधी.

ठि:--पांजरा पोळचा नाका, चिमणलालमहाराजांचे मदीर भुलेश्वर — मुंबई.

एकच भाव! ओटो सुरंगी ! एकच भाव! !

### आमचेकडे मिळणारा माल

ओटो सुरंगी

अत्तरें.— गुलाब, मोतिया, दवणा, अंबर, बकूल रुपाच, हिना, पाच, वाळा, जुई चांफा, अंबा, इस्तंबोल, केशर, मदनबाण पारिजातक, मुस्काहिना, गुलहिना, रुअबझा, केवडा, रुखस, चमेली, अगर. हीं अत्तरें दर तोळ्यास १ रुपयापासून ८ रुपयेपर्यंत निरनिराळ्या भावाचीं मिळतील. २-३-४-६ रु.

तेलें.— चमेली, बेलिया, मुसुंबी, हिना, लिंबू, मेंदी, गुलाब, मसाला, नारंगी, सुगधराव, मोतिया, आवळा, नागर, कपाशी.

वरील तेलें दर रुपयास ६ तोळ्यापासून २८ तोळेपर्यंत निरनिराळ्या भावाची मिळतील. दर बाटली ४ आणे.

अष्टगंधी अरगजा १ तोळ्यास ४ आ. ६ आ. १२ आ. १ रु. १॥ रु.पर्यंत. अरगजा व फितना निरनिराळ्या सुवासाचा दर डबीस ३ आ. ४ आ. ६ आ. ८ आ. १ रु. उटणें दर डबीस १ आ. २ आ. ४ आ. ८ आ. पर्यंत. केशरी गोळी उत्तम २॥ आ. ५ आ. १० आ. १। रुपयापर्यंत. क्याटलॉग फुकट

ह्यांशिवाय कस्तुरी, केशर, गुलाबपाणी, मध, उदबत्ती, रंगीत पाट, दशावतारी गजिफे, सोंगट्या, बुद्धिबळें, आर्यवर्धक कार्डस, बिझिक, इसापिकें, हस्तीदंती फासे व फण्या, पितळी सामान, पितळी शिंगे व करणे, संच्या, सरबतें व मुरंबे, पक्या तारा, बदामाचें तेल, व वातहारक आणि केशवर्धक तेलें, सुटें व वेणीचें गगावन इत्यादि वरील पत्यावर मिळेल. व्यापाऱ्यांस सवलत.

बाहेरगांवच्या गिऱ्हाईकांस माल व्हल्युपेबलनें पाठविला जाईल. नो. नं. ३

## Oriental Government Security Life Assurance Co., Ltd.

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY. R. PATERSON BROWN MANAGER.

THE LEADING INDIAN LIFE ASSURANCE COMPANY

### FUNDS 4 CRORES.

INVESTED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BOUNDS.

### Quinquennial Record of Progress.

| Year. | No. of Polices in force. | Exisra Assunces. |
|---|---|---|
| | Rs | Rs. |
| 1888 | 8668 | 2,63,38,000 |
| 1893 | 17,657 | 4 68,36,090 |
| 1898 | 28,516 | 6 81,27,774 |
| 1903 | 40,390 | 8 47,06,108 |
| 1908 | 52,168 | 10,12,93,883 |
| 1913 | 62 097 | 12,36,79,510 |

| Year. | Annua Income. | Total Assets. |
|---|---|---|
| | Rs. | Rs. |
| 18883 | 1148,642 | 36 38,694 |
| 189[illegible] | 21,16,549 | 80 05,818 |
| 1893 | 31,36,421 | 1,40,32356 |
| 1908 | [illegible] 07,0[illegible]4 | 2,10,[illegible]5,947 |
| 1900 | 535,556 39 | 3,22,79,991 |
| 1913 | 99,4469 | 4,41,61,889 |

### RECORD BONUS.

*The Bonus declared for the last triennium constitutes a record.*

IMMEDIATE PAYMENT OF CLAIMS AFTER PROOF OF DEATH and TITLE. THE RATES ARE BASED ON ACTUAL INDIAN EXPERIDNCE AND ARE VERY LOW.

*Extract from report made npon the Company's position as at 31st December 1912, by Mr. Thomas WALLACE, Fellow of the institute of Actuaries, London*

" At each of the last three Valuations the Reserves of the Compan have been calculated on an increasingly stringent basis. On this occasion there has been a further addition to the reserves and the financial position of the Company has been further strengthened. The resouaces of the Company are now so ample that the security which they afford is undoubted and Policyholders and Shareholders alike may confidently forward to a continuation of prosperity in the future."

Do not delay in applying for Insurance—delays are dangerous. The Oriental is the leading Indian Life Assurance Company. Providing the Policy iholders with a absolute security and possessing all the important factors essentia n a first class office it commands the full confidence of the public.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. TERMS LIBERAL

Full particulars, prospectus and prosposal forms on application to:—

**M. deSOUZA,**
CHIEF AGENT,
C. P. Berar & Khandesh, NagPUr

N. N. 25

सतत ५० वर्षांच्या पूर्ण अनुभवानें उत्तमोत्तम ठरलेला
दूषित रक्त शुद्ध करणारा
आयोडाइज्ड.

## सार्सापरिला.

शरीराचा पंचप्राण ह्मणजे शुद्ध रक्त होय. तेंच एकदां बिघडलें कीं नानातऱ्हेचे रोग देहांत आपला शिरकाव करूं लागतात. भयंकर अशा उपदंशजन्य विकारांमुळे व तदनुषंगिक होणाऱ्या पक्षघातासारख्या रोगामुळें अर्धांग वायु, अवयव लुले पडणें, स्मरणशक्ति कमी होणें, शरीरावर गांधी उठणें, व्रण व काळे डाग पडणें, संधिवात व दूषित रक्तामुळें उद्भवणाऱ्या इतर सर्व रोगांवर हाच **सार्सापरिला** देणें फारच उत्तम होय. अनुभवाशिवाय गुणाची कल्पना येणार नाहीं. किंमत १ बाटलीस रु.१। टपालखर्च -।- पांच आणे. चार बाटल्यांस टपालखर्चासह रु. ४॥— उत्तम गुणास चार बाटल्या लागतात. आमचा सार्सापरिल्याचा खप पाहून बऱ्याच लोकांनीं हुबेहुब नकल केली आहे. तरी घेतांना तो आमचाच आहे अशाबद्दल खात्री करून घेणें.

**मालक—** डा. गौतमराव केशव, आणि सन्स
ठाकुरद्वार पोस्टाजवळ मुंबई नंबर २

नो. नं. २३


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd-No.N 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ४९ ] आकोला—सोमवार तारीख १२ माहे जुलै सन १९१५ ई० [ अंक २७


## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बॅंकेत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बॅंकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } J. G. Ridland. एजंट

नो. नं २

अस्सल अंगूरी.

## हींग

केवळ एक आणा तो. पवित्र केसर ।।।≈ ता. शुद्ध शिलाजीत. -।।- तो. खालिस कस्तूरी रु. २५ तो. तिबती ममीरा रु. ३ तो.

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ९
नो० नं० ८

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागले आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तावडतोब दूर होतात. किं रु. १८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

DR. H. L Batliwala. Sons & Co Ltd
N. N. 5 Dadar Bombay.

## चांदीचीं भांडीं.

### विकावयाचीं आहेत.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारची सुबक व घाटदार भांडी आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवू मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.
नो. नं. ४

### ब्रह्मविद्या ग्रंथ रत्नमाला

या मासिकाचा वर्षारंभ माघ शु० ९ तिसऱ्या वर्षापासून ७२ पानांचें मासिक. वा० व० ट० खर्चासह तीन रुपये. यांत **श्रीशंकराचार्य, शंकरानंद, व विद्यारण्य** यांचे उपनिषदावरील भाष्य, **आत्मपुराण व अनुभूतिप्रकाश** हे ग्रंथ क्रमानें मूळ, अन्वय, अर्थ व विवरण यांसह प्रसिद्ध होतात. यांत हल्लीं बृहदारण्यकाचा भाष्यार्थ चालू आहे. मागील दोन वर्षांतील वीस प्रकरणें १० रुपयांस घेऊन तिसऱ्या वर्षी वर्गणीदार होणारास '**वैशेषिक दर्शन**' बक्षीस-

सनातन वैदिक **धर्माचें, तत्त्वज्ञानाचें** व सामाजिक विषयाचें विवेचन करणारें—

### आचार्य

पाक्षिक, दर एकादशीस नियमितपणें प्रसिद्ध होतें. पृष्ठें २४ वा० व० ट० खर्चासह १ रु० ८ आणे वरील मासिक घेणारास फक्त १रु० वरील विषयांशिवाय यांत संस्कृत काव्यें, नाटकें व इतर लहान लहान ग्रंथ यांचाही परामर्श केला जातो. धर्म संबंधीं प्रश्नांची मर्मिक उत्तरेंही दिलीं जातात नमुना मागवा.

पत्ता— विष्णुशास्त्री बापट.
२४१ सदाशिव पेठ पुणें.
नो० नं० ३

### अनायासें देवदर्शन.

नोटपेपर्सः— श्रीगजानन, दत्तात्रय मारुती शंकर व नरहरी या पैकीं कोणती ही एक मूर्ती रंगांत दाबून उठाव (एम्बास) छापलेले, १०० क्रेप्रनाईट नोटपेपर्स व त्याच्या बेताचीं चौकोनी १०० कव्हरें प्रत्येकीं किंमत ८८ व्हीपीनें ८१२ दोन्हीमिळून किंमत रु. १ व्ही. पी रु० १८६




सर्वत्र एजन्टस् पाहिजेत
**पत्ता—बेंद्रे आणि कंपनी पुणेंसिटी**
नो. नं ७

### मुद्दाम अनुभवाकरिता.

दिलखुषमलम— तमाम त्वचा रोगांवर चालणारा— १ मनुष्यापुरतें औषध किं० १।। आणा. अस्सल कर्पुरार्क— किं० २ आणे केशनाशक अप्रतिम पूड कि. २ आणे कर्णाबिंदू — कानाचा विकार १ दिवसांत गुण ३ दिवसांत फायदा होतो. किं० २ आणे मेंथालार्क किं० १ आणा.

### अनंगाविलास.

गोळी. अत्यंत धातुस्तंभक व पौष्टिक १ दिवसांत गुण दाखविते, किं० २ आणे "४ गोळ्या" दंतमंजन— ३ दिवसांत गुण किं० २ आणे. विंचवावर प्रतिज्ञेचें औषध क० ८ मनुष्या पुरत्या औषधाची ३ आणे. नेत्रांजन— डोळ्याचे विकारावर— साधारण लाली, खुपरी, पाणिगळणे, आग यावर किं० २ आणे. दम्यावर— प्रतिज्ञेनें १ दिवसांत गुण देणारे व ७ दिवसांत पूर्ण फायदा देणारे औषध किं० ४ आणे. शीत पित्तामुळें आंगावर गांधी व खाज अतिशय येते त्यावर ३ दिवसांत गुण देणारे किं० २ आणे. उपदंशरिपु— प्रमेह, उपदंश यावर ३ दिवसांत फायदा व ७ दिवसांत पूर्ण गुण देणारे औषध किं० १ रुपया दिलबहार— सुपारी— १ चिमटी विड्यांत घेतांच, अजिर्ण, अमांश यांचा नाश होऊन झाडा साफ होतो, भूक खुलते किं० १ आणा, तंबाखु रंजनवटी— अत्यंत सुवासीक व कडक तंबाखुची गोळी २० किं० २ आणे निदान ८ आण्याचा माल मागवावा. व्ही पी. ने पाठवू.

मुळे एन्ड सन्स नांदुरा.
नो० नं० ९

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सूचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. यापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

### विक्रीस तयार

आमचे छापखान्यांत दरखास्तीचे, वकील पत्राचे, परत भरयाचे, लिस्टफार्म पर्च्याचे व नकलेकारितां करावयाच्या अर्जाचे नमूने छापुन तयार आहेत. ते आमचे छापखान्यांत कोणत्याही वेळीं विकत मिळतील.

वऱ्हाडसमाचार कार्यालय, सदाशिवाश्रम, आकोलें } मॅनेजर

### जाहीर नोटीस

नोटिस बेशमी रावजी वा पैकाजी (राऊत) राहणार कारंज रमजानपूर ता० बाळापूर जि० आकोला व सर्वत्र साहू सावकार लोक

यांसः—

या नोटिशीनें कळवितो कीं, तूं रावजी माझा धाकटा मुलगा असून २ वर्षा पासून तूं निराळा आहेस. तुझी संसाराची सर्व व्यवस्था मी नीट नेटकी करून दिली. माझी जिनगी मौजे बटवाडीखुर्द ता० बाळापूर आणि कारंज रमजानपूर ता. बाळापूर या दोन ठिकाणीं स्थावर व जंगम अशी आहे. कांहीं लबाड लोकांच्या नादानें अलीकडे तूं या जिनगीची अफरातफर मांडली आहेस. तरी वास्तवीक असे करणें तुला योग्य नाहीं. माझे हयाती पावेतों तुमचा या जिनगीवर कांहींच हक्क नाहीं. तरी तुला व सर्वत्र साहुसावकारांना बजावतो कीं, तूं वरील जिनगी माझे दोन्ही गांवची मुळींच अफरातफर करूं नये. ती कोणास गहाण खरीदी अगर पट्यानें देऊं नये. व तसेंच कोणी साहू सावकारांनें ती सदर गृहस्थाकडून घेऊं नये. घेतल्यास त्याची जबाबदारी मजवर अगर माझे वरील जिनगीवर न राहतां घेणारा फसेल. या करितां आगाऊ सर्वांस कळविलें आहे. क. ता. २ माहे जुलै १९१९ ई०

पैकाजी पुंनाजी पाटील रा. कारंज रमजानपूर द. खु.
चिमणाजी पुंनाजी द. पैकाजी पुंनाजी पा. द. खुद
नो० नं० २७३

## जाहिरनोटीस

सर्व शेट सावकार कास्तकार व्यापारी व इतर लोक

यांसः—

खालीं सही करणार यांनकडून जाहीर रितीनें कळविण्यांत येत आहे कीं आमचा मुलगा कृष्णा बाळकृष्ण कडवे हा हल्लीं अज्ञान आहे परंतु हा दुरव्यसनी निघाला असून अज्ञानपणांतच इस्टेटीची ढवळा ढवळ करीत आहे. त्याला दुसरे दोन लहान बंधू असून सर्व इस्टेट सामाईक असल्यामुळें त्यांचाही ईस्टेटींत हक्क संबंध आहे. त्यांचे हित संबंधाचीही यानें नासाडी करणें मांडलें आहे. त्यास कळविण्यांत येत आहे कीं त्याचे कडून कोणी कोणत्याही प्रकारचा पूर्ण इस्टेटीचा किंवा त्यापैकी कोणत्याही भागाचा लेख करून घेऊं नये. किंवा त्यानला कोणी कर्ज वगैरे देऊं नये. त्याच प्रमाणें कास्तकार लोकांनीं त्याला वायदा वगैरे देउं नये. या नोटीसीचे व्यतिरिक्त जोकोणी कोणताही व्यवहार करील त्याबद्दल आह्मी अगर आमची इस्टेट किंवा अज्ञानाची इस्टेट कोणत्याही प्रकारें जबाबदार अगर देणेदार होणार नाहीं. कास्तकार लोकांवर दिलेल्या वायद्याबद्दल नालीश करून रुपय घेतले जातील.

फकत. ता. ११-६-१९
मुकाम हिंगनघाट.
ब० रामचंद्र रावजी अर्जिनविस हिंगनघाट.

सही.

नि० लक्ष्मीबाई जवजे बाळकृष्ण कडवे इचे हातची स्वतःकारितां व अ० पुत्र बळीराम व रामा कारितां निशानीची माळ असे रा० अलीपूर ता. हिंगनघाट जि० वर्धा हल्लीं मुक्काम हिंगनघाट.

नो० नं० २७४

## नोटीस

नोटीस बेशमी हंबऱ्या वा॥ कुसना जात बंजारी रा० चिकनी पो० बोरीअरब ता० दारव्हा जि० यवतमाळ.

यांसः—

खालीं सही करणार नोटिस देते कीं सन १३२४ फसली सालांत वाहण्या करितां बटाईनें तुह्मी माझ्या मालकीचीं शेतें दोन मौजे चिकनी येथील सर्वे नं ६१ आणि सर्वे नंबर ४४ हीं वाहण्यास घेऊन बटाईखत ता० १७-३-१९ इ० रोजीं लिहून दिलें. त्यांतल्या शर्ती प्रमाणें तुह्मी हा काळ पर्यंत स. नं. ४४ किस्तकारी करून स. नं. ६१ ची केली नाहीं. तुमच्या भरंवशावर आह्मी तुह्मांस खाण्यास व इतर शेतखर्चास आजपर्यंत ५१=॥ एकावन रुपये दीडआणा दिला असून त्याबद्दल तुमची पावती आहे. आतां अली कडेस तुह्मी मला जास्तपैशाची मागणी करीत आहांत व हे पैसे न दिल्यास मी शेत परत नाहीं असें पंचासमक्ष बोलतां वरून तुह्मास कळविण्यांत येते कीं ही नोटीस पावतांच ४ दिवसांत पेरून घ्यावें. मी जास्त पैसे देण्यास कबूल नाहीं. तुह्मी असें न केल्यास मी शेताची पेरणी करीन व मग तुमचा कोणताच खर्च मी कबूल करणार नाहीं. तुमचा कोणत्याच तऱ्हेनें मग वरील शेतावर हक्क चालणार नाहीं. आणि वरील पैशा बा॥ व आमची कापसाची पेर चुकविल्या बद्दल जी आमची नुकसानी होईल ती बा॥ तुमचेवर दावा करून कोर्ट मार्फत रकम वसूल केली जाईल क० ता. ६।७।१९१९ इ.

सही.

तुळसी मर्द नथु झाले राहणार चिकनी इचे करतां भाऊ देवबा वा॥ धरमाजी झाली रा. चिकनी द. खु.

नो. नं. २७५

## नोटीस

गा० रा० मोहनसींग किसनसींग रजपुत रा० लाखपुरी ता० मुर्तिजापूर

यांस:—

खालील सह्या करणार याजकडून कळविण्यात येते कीं मी व अज्ञान असें त्रिवर्गांनीं तुह्मास कुलमुखत्यारपत्र तारीख २३।६।१९१४ इ॥ रोजी बुक नंबर ४ भाग २८-१० पान १६४-१६९ अनुक्रम नंबर २० सन १९१४ चे दिले होतें. त्याप्रमाणें आजपावेतों तुह्मीं मुखत्यारपत्राचे आधारें तुह्मीं आमचीं जीं जीं कामें आजपर्यंत करित आले आहां. परंतु हल्ली तुह्मीं आमची कामें विश्वासानें बरोबर करीत नाहीं असा आह्मांस तुमच्या विषयीं वहिम आला आहे. तरी या नोटीसीचे द्वारें तुह्मांस दिलेलें कुलमुखत्यारपत्र आज रोजीं रद्द केलें आहे. आजपासून तुह्मी आमचे संबंधानें कुलमुखत्यार या नात्यानें व्यवहार केल्यास तो आह्मांस मुळींच कबुल नाहीं. व मुखत्यारपत्र दिल्या तारखे पासुन आजपर्यंत जो अज्ञाना संबंधानें व माझे संबंधानें हिशोब झाला असेल तो सर्व या आठ ८ दिवसाचे आंत कळवावे. तसें न केल्यास कोर्ट मार्फत योग्य तजविज केली जाईल. ही नोटीस दिली ता० ५।७।१९ इ॥

दस्तुर जैवंतराव व व्यंकटराव देशमुख दे. पि. रा० आकोला.

सह्या.

गणपत व संपत वा॥ मारोती अ. पा. क. मनाजी वा॥ उदेभानजी याचे हातची नि॥ असे दस्तुर वर प्रों॥

गनाजी वा॥ उदेभानजी कोळी रा० साकरी याचे हातची नि॥ असे दस्तुर वर प्रों.

साक्ष.

कन्हैया किसनलाल रा० मुर्तिजापूर हल्लीं मु. आकोला द० खु०

नो. नं. २७६

## जाहिरात.

खालीं सही करणार यानकडून सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं, माझा भ्रतार नामे शिवरतनदासजी शिवप्रतापजी दुकान खामगांव याचे नांवाने महिदास ईश्वरदास मालक रामरतन जमनादास दुकान खामगांव यांनीं आपली इंस्टेट (स्थावर माल) बिकानेरची [ मारवाडांतील ]. खामगांव (वऱ्हाडांतील) वगैरे ठिकाणची असलेली रकम रुपये ३५००० अक्षरी पस्तीसहजारामध्ये सन १९०७ इ. रोजीं गहाण दस्तऐवज नोंदून दिला व त्यांत रिणकोने आह्मांस रकम रुपये १०००० दहाहजार वसूल दिला. बाकी आमचे दुकानचे कर्ज राहिले रुपये २५००० पंचवीसहजार आणि वरील रकमेचे व्याज असे घेणे आहेत. तरी सदरहु गहाणाचा दस्तऐवज आह्मास विकावयाचा आहे. ज्याला घेण्याची इच्छा असेल त्यानीं आमचे दुकानीं येऊन स्पष्ट खुलासा करावा कळावे ता. ४।७।१९ इ.

सही.

रंभाबाई जवजे शिवरतन द. खु

नो० नं० २७७

## नोटीसीचें उत्तर

नोटीस बेशमी देवमण वल्द गंभीरजी पाटील राहणार देऊळगांव तालुके जळगांव जिल्हा बुलडाणा.

यांसः—

खालीं सही करणार यानकडून नोटीसीचे उत्तर देण्यांत येते कीं तुमची तारीख १०।५।१९१९ ची नोटीस अकोल्याचे तारीख १७-५-१९१९ चे समाचारांत मिळाली. लिहिला मजकूर समजला. तुह्मी दिलेली नोटिसीचा मजकूर बहुतेक सर्व खोटा आहे. तुह्मास देऊळगाव येथीलें सरव्हे नंबर ११ हा आह्मी रुपये २००० दोनहजाराचे किमतीस विकत देऊन तुह्मास खरेदीखत करून दिलें व सदर्हु रकमे बद्दल गहाणखत करून घेतलें. परंतु दोन्ही दस्तऐवज तुह्मी छपविले नाहींत आह्मी रजिस्टर करून देण्यास व घेण्यास तयार होतो व आतांही तयार आहो. सदर्हु दोन्ही दस्तऐवजाची नोंदणीची मुदत निघुनगेली आहे तरी ही नोटिस पावल्यापासून ८ आठ दिवसाचे आंत दोन्ही दस्तऐवज नविन बदलुन नोंदुन द्यावे. व द्यावें नाहींतर योग्य रिती प्रमाणें तजविज करावी लागेल त्याचा सर्व खर्च तुमचेवर पडेल. तुह्मास खरेदी दिलेले वरिल सेताचा ताबा तुह्मी सोडल्यामुळें आह्मी ताब्यांत घेतला आहे. परंतु जर तुमची वरील शेताचे खरेदीखत करून घेण्याची इच्छा नसल्यास आमचे किमतीने नुकसानी बद्दल रुपये ७५० साडेसातशें व खरेदी दिल्या तारखेपासून गहाण खतांतील व्याजाचे शर्ती प्रमाणें दरमहा दरशेकडा १ एक रुपया प्रमाणें दोनहजार रुपयाचे व्याज सदर्हु शेत आह्मी तारीख १६।६।१९१९ ला ताब्यांत घेतलें त्या तारखे पर्यंत व नुकसानीचे रकमेचे व्याज दरमाहा दरशेकडा १ एक रुपया प्रमाणें रकम तुमचेकडून अदाई होई पावेतो घेतले जाईल. करितां नोटिसीनें कळविले आहे. व नोटीसींत तुह्मी देऊळगांव येथील सर्वे नंबर ७ ८-९-१२ चे बटाईचा हक्क रु. ४०० रुपयास उक्ता आह्मी विकत घेतला लिहिला. हे लिहिणें सर्व खोटे आहे. तुमचा आमचा मुळीच ठराव होण्याचे कारण नाहीं. वरील शेतें आह्मी गरीबशा मोशमशा सवदागर याजपासून खरीदी घेतली त्याच-वेळेस त्याज पासून ताबाही घेतला होता तारीख ७-७-१९१९ इ.

सही.

श्रीराम शालीगराम या दुकानचे मालक बालकिसनदास शिवलाल फत्तेलाल शालीगराम व नारायणदास सुंदरलाल आ० पा० चुलता फत्तेलाल शालीगराम दुकान शेगांव तालुके खामगांव जि० बुलडाणा तर्फे मुखत्यार शिवनारायण आत्माराम दसखत खुद

नो० नं० २७८

## नोटीस.

नोटीस बेशमी हरीश्चंद्र नारायण पटवारी राहणार सावरे ता० आकोट जि. अकोला.

यांसः—

खालीं सही करणार यांनकडून नोटीस देण्यात येते कीं, मी तुह्मास शेत सर्वे नं. ६ एकर ३ गुंठे ८ आकार रुपये ६।८ व स. नं. १ एकर ० गुंठे ३७ आकार रुपये २।८ ही दोन शेतें खरेदी दिलीं. त्यांत कवलाजी रायभान पाटील सावरे यांचा देण्याचा निकाल करण्या करितां हवाला रुपये ७०० व दस्तैवज रु० ३०० चा करून दिला. त्यांत वरील इसमाचा हवाला लिहीला आहे. एकूण रु० १००० एक हजार चा हवाला दिला असून आज पर्यंत रु० चुकते केले नाहींत. व पावती कांहीं आणली नाहीं. सबब तुह्मास कळविण्यांत येते कीं, नोटीस पावताच सदर्हु इसमाचे रु० एक हजार चुकते करून पावती आणावी. असें न केल्यास दस्तैवज रु० ३०० शें चा व खरेदीखत रद्द समजले जाईल. नोटीस देण्याचा विनाकारण त्रास दिला. सबब नोटीस खर्च तुह्मास द्यावा लागेल. कळावें. ता० २८ ६ १९१९ इ०

सही

नागोराव सदाशिव पाटील राहणार सावर द० खु०

नो० नं० २७९

## जाहीर नोटीस

नोटीस बेशमी गणपत वा॥ मारोती सातव रा० माकोडी ता० मलकापूर जि० बुलढाणा

यांसः—

मी खालीं सही करणार या नोटिशीनें कळविते कीं. तुझे व माझें लग्न झाल्यास आज पावेतो १४-१५ वर्षे झालीं. तेव्हां पासोन तुह्मी मजला सोडून कोठें गेला आहा. त्याचा आज पावेतों तपास लागत नाहीं. करितां या जाहीर नोटिशीनें सर्वत्र लोकांस कळविते कीं, वर लिहीलेला माझा नवरा गणपत वा॥ मारोती माळी हा जेथें असेल तेथून त्यानीं येऊन मजला पंधरा दिवसाचे आंत येऊन घेऊन जावें. व हल्लीं मी ५-६ वर्षांत सज्ञान झाले आहे. तसें

त्यानीं मुदतीचे आंत न केल्यास मी गंधर्वाचा दुसरा नवरा करून प्रपंच करीन. मग मात्र त्याचा माझेवरं नवरेपणाचा हक्क राहणार नाहीं. ही जाहीर नोटीस दिली. द० बापु भगुजी सातव रा० पिंपळगांवराजा ता० ७।६।१९

सही

१ रुखमाई मर्द गणपत माळी सातव रा. हल्लीं पिंपळगांवराजा नि. खु. बांगडी द. सदहुं

नो० नं० २८०

## नोटीस

नोटिस बेशमी थावऱ्या वा नाऊ जात बंजारी रा० चिकणी पो० बेरीअरब ता० दारव्हा जिल्हा यवतमाळ

यांसः—

खालीं सही करणार नोटिस देते कीं, सन १३२४ फसली सालांत वाहण्याकरितां बटाईनें तुह्मी माझ्या मालकीचे शेत सर्वे नं० ४३ मौजे चिकणी येथील वाहण्यास घेऊन बटाईखत ता० १७।३।१९१५ इ० रोजीं लिहून दिले. त्यातल्या शर्तीं प्रमाणें तुह्मी हा काळपर्यंत स. नं. ४३ ची अर्ध्याची किस्तकारी केली व अर्ध्याची केली नाहीं. तुमच्या भरवशावर आह्मी तुह्मास खाण्यास व इतर शेतखर्चास आजपर्यंत ५६।= छपन रुपये सहा आणे दिले असून तुह्मी आतां खर्चाकडेस तुह्मी मला जास्त पैशाची मागणी करीत आहांत. व हे जास्त पैसे न दिल्यास मी शेत पेरीत नाहीं. असे पंचा समक्ष बोलतां. वरून तुह्मास कळविण्यांत येते कीं, ही नोटिस पावतांच ४ दिवसांत पेरून घ्यावें. मी जास्त पैसे देण्यास तयार नाहीं. तुह्मी शेत न पेरल्यास मी शेताची पेरणी करीन. व मग तुमचा कोणताच खर्च मी कबूल करणार नाहीं. तुमचा कोणत्याच तऱ्हेनें मग वरील शेतावर हक्क चालणार नाहीं. आणि वरील पैशा बद्दल व आमची नापमाची पेर चुकविल्याबद्दल जी आमची नुकसानी होईल ती बद्दल तुमचेवर दावा करून कोर्ट मार्फत रक्कम वसूल केली जाईल. क. ता. ६-७-१९१५

सही

तुळशी मर्द नथु माळी रा चिकणी इचे करितां देवबा वा धर्माजा माळी रा. चिकणी द. खु.

नो० नं० २८१

## नोटीस

रा० रा० ताना वा भिका लोदवाड परदेशी रा. कजबे चांडोळ ता. चिखली जि. बुलढाणा

यांसः—

नोटिस खालील सही करणार यांजकडून देण्यांत येते कीं, अजमासे सरासरी आठ महिने झाले. तुह्मी आमचे मालकीचे शेत मौजे ह्मसल खु॥ ता. चिखली जि. बुल्ढाणा येथील शेत सर्वे नंबर ५२ हा रक्कम रु. १२०० यास खरेदीचा सवदा करून त्याजपैकीं इसारा बद्दल त्याचवेळीं तुह्मी आह्मास रक्कम रुपये ५०० पांचशें दिले. व बाकीचे रुपये ७०० सातशें एक महिन्यानी देऊन आमचेपासून तुह्मी आपले खर्चानें खरेदीखत करून घेण्याचा करार केला. असून त्याप्रमाणें तुह्मी केले नाहीं. व तुह्मास आह्मी रुपये आणून देऊन खरेदीखत करून घेण्याबद्दल पांच चार वेळां ह्मटले तरी तुह्मी कांहीं जबाब दिला नाहीं. व रुपये देऊन खरेदीखत करून घेत नाहीं तरी ही नोटिस पावल्या तारखे पासून पंधरा दिवसाचे आंत बाकीचे राहीलेले रु० ७०० व त्याचे व्याज आजपर्यंत आणून देऊन तुह्मी खर्चानें खरेदीखत करून घेणें तसें न केल्यास इसाराचे दिलेले रुपये ठरल्या प्रमाणें आपणास मिळणार नाहीं. व त्याचा हक्क राहणार नाहीं. व रुपये वापस मिळण्याबद्दल दावा ही चालणार नाहीं. व पुढें खरेदीखत करून देणार नाहीं. ता० २३ ६।१९१५ इ०

सही

व्यंकटराव माधवराव देशपांडे रा० चांडोळ ता० चिखली

नो० नं० २८२

## नोटिशीचें उत्तर,

नोटिस बेशमी कुंडलसा देवमणसा सावले लाड रा० मालेगांव जहागीर ता० वाशीम

यांसः—

खाला सही करणार नोटिस देतो कीं, तुह्मी वऱ्हाडसमाचार पत्रांतून अंक नं. २५ मध्यें ता० १८ जून १९१५ इ० ची नं० २५९ ची नोटिस दिली ती अजिबात खोटी आहे. धनासाचे लग्नास मी गेलों परंतु तुमच्याशीं माझ्याशीं भेटही नाहीं. मग देणें घेणें दूरच राहिले. असें असतां विनाकारण २०० दोनशें रुपयाचा आळ तुह्मी घेतला आहे. तुमचीं पत्रें मला मुळींच मिळालीं नाहत. कोणाच्या तरी सांगण्यावरून तुह्मी हा आळ घेत आहांत. तरी वरील रुपयाबद्दल मी कोणतेच प्रकारें जबाबदार नाहीं. धनासाचे लग्नास सर्व रक्कम घरून नेली होती. अशी आगळीक पुनः होऊं नये. या करितां तुह्मास कळविलें आहे. ती पुनः केल्यास तुमचा कायद्या प्रमाणें बंदोबस्त केला जाईल. व तसें करण्यास लागणारा खर्च व या नोटिशीचा खर्च तुमचे जवळून वसूल केला जाईल. क० ता० ७।७।१९१५

सह्या

१ माहादसा आनासा लाड राहणार देऊळगांवसाकरशा द० खु०

२ धनासा बालुसा लाड राहणार देउळगांवसाकरशा द० खु०

नो० नं० २८३

## नोटीस

सर्व लोकांस माहीत होणें करितां जाहीर करण्यांत येते कीं, आकोले येथील मि० अनवरखा हाजीहुसेनखा यानीं त्यांचे, सिग्नल स्टेशन मधील बंगल्याचे समोरील ४००+१०० फुट जागा व पश्चिमे कडील २७५+१०० फुट जागा हद वाढवून बगीच्या करणें करितां मिळावी ह्मणून अर्ज दिला आहे. व ती जागा ता० ·८ ७ १९१५ इ० रोजीं सकाळीं ७ वाजता ठिकाणावर हरास केली जाईल. पट्टेदारास सदर्हू जमीनीचा उपयोग वर निर्दिष्ट केलेले कामाशिवाय इतर कामाकडे डे० क० सा० ब० यांचे लेखी परवानगी शिवाय करतां येणार नाहीं. कौलपट्टा तीस वर्षां करितां घेतला जाईल. पट्टेदारांस कौल पत्र्याचे ठरलेलें नमुन्यांतील शर्तीं कबूल असल्या पाहिजेत. कळावें. ता० २९-६-१५

N. N. 271 Jay-Narain E. A. C. Akola.

## जाहिरात

सर्वत्र लोकांस माहित होणें करितां जाहीर करण्यांत येते कीं आकोले येथील खानसाहेब आमानखा यांनीं त्यांचे शेतांतील बंगल्या समोरची सिग्नल स्टेशन मधील ३८०७८ स्क्वेअर फुट जागा कंपाउंड घालून बगीच्या करणें करितां मिळणें बद्दल अर्ज दिला आहे. आणि ती जागा ता० १८ ७ १५ रोजीं सकाळीं ७ वाजतां ठिकाणावर हरास केली जाईल. कौलपट्टा ३० वर्षां करितां घेतला जाईल. पट्टेदारांस सदर्हू जमीनीचा उपयोग वर निर्दिष्ट केलेल्या कामाशिवाय इतर कामाकडे डे० क० सा० ब० आकोले यांचे लेखी परवानगी शिवाय करता येणार नाहीं. पट्टेदारास कौल पत्र्याच्या ठरलेल्या नमुन्यांतील शर्तीं कबूल असल्या पाहिजेत. कळावें. ता० २२ ६-१९१५.

JayNarain
E. A. C.
N. N. 264 Akola

## नोटीस

विद्यमान सीनीअर सब जज साहेब कोर्ट आकोला. यांचे कोर्टात जि. आकोला.

कि. मु. नं. ९ सन १९१५

भुरियाबाई जवजे फत्तेचंद पवार रा० आकोट सन रणभू ८९ चा ॲक्ट ७ प्रमाणें.

सदर्हू नोटीशीनें जाहीर करण्यांत येते कीं, सदरील वर नमूद केलेला, अर्जदार इनें कि. मु. नं. ९ सन १९१५ चा आमचे कोर्टात आपला नवरा लालचंद फत्तेचंद परवार याचे अजमासे रु. २००० चे सक्सेशन सर्टिफिकीट आपणास मिळावें ह्मणून अर्ज ता. १४।५।१५ रोजीं केला आहे. त्याची चौ० ता. ११।९।१५ रोजीं नेमली आहे. तरी या नोटीशीनें जाहीर करण्यांत येते कीं ज्या कोणास आपला हितसंबंध हरकत वगैरे दाखविणें असेल त्या माणसानें वर नमूद केलेल्या तारखेस आमचे कोर्टात येऊन योग्य तजवीज करावी. तसें न केल्यास कोणाची तकरार नाहीं असें समजून अर्जदार इजला सर्टिफिकीट देण्यांत येईल कळावें आकोला तारिख७-७ १९१५ इ.

Sd/ D. K, Kolatker.
सीनीअर सबजज आकोला.

नो. नं २८४

## सचित्र कोकशास्त्र.

रसिक गृहस्थहो घेण्याची त्वरा करा. हा एक मोठा ग्रंथ आहे. ज्याच्या तपासांत आपण पुष्कळ काल पर्यंत आहों व जो अतिशय परिश्रम करून व द्रव्य खर्च करून ही न मिळण्यासारखा आहे. असा हा ग्रंथ छापून हल्लीं तयार आहे. यामध्यें स्त्री पुरुषांच्या जातीभेद लक्षणें, गर्भधारणेचे नियम, स्त्री पुरुषांच्या अनेक रोगांची औषधी चिन्हप्रांत ३, व त्यांचे निदान इत्यादि अनेक विषय आहेत. हा ग्रंथ अमोलिक विषयांचे एक भांडारच आहे. किंमत रू.१ ट.ख. दोन आणे. पत्ता स्पष्ट बाळबोधींत लिहावा.

पी.एल. शर्मा अलीगढ.

नो. नं २७०

## वर्गणीदारांस आगत्याची सूचना.

वर्गणीदारांकड वर्गणीची मागील बाकी बरीच सांचली आहे. ती त्वरित पाठवून देण्याविषयीं टपालमार्गें विनंतिपत्रें पाठविलीं जात आहेत. कृपाकरून वर्गणीदारांनीं तगादा करण्यास अगर व्ही. पी. करण्यास भाग पाडूं नये हें त्यांस आमचें आगत्याचें सांगणें आहे. हल्लीं सर्वांस लढाईमुळें पैशाची तंगी असणें स्वाभाविक आहे हें आह्मीं जाणून आहोंत परंतु त्याच कारणास्तव आह्मा वर्तमानपत्रकारांच्याही अडचणी द्विगुणित झाल्या आहेत. ही गोष्ट लक्षांत घेऊन वर्गणी पाठवून देण्याविषयींच्या विनंतिपत्राचा अव्हेर होणार नाहीं अशी बळकट आशा आहे.

म्यानेजर.

वऱ्हाडसमाचार

मित्ती जेष्ठ व॥ ३० शके १८३७

## टिळकांचें गीतारहस्य.

मुमुक्षु जनाला मोक्षसाधनाचा मार्ग दाखविणें हा गीतेचा मुख्य उद्देश आहे, आणि तो उपदेश करीत असतां श्रीकृष्णानें अर्जुनाला मोक्षाच्या ज्या निरनिराळ्या तीन वाटा दाखविल्या त्यांतली भक्ति ही एक वाट आहे ही गोष्ट सर्वश्रुत आहे. देहांत मुरलेली सर्वभूतात्मैक्यरूपबुद्धि हीच मोक्षाचे मुळाशीं असून हें ऐक्य साधण्यास ज्ञान, भक्ति व निष्काम कर्म हीं तिन्ही साधनें आहेत. ज्याची बुद्धि जीवात्मा व परमात्मा यांच्या ऐक्याचें आकलन करण्याइतकी सूक्ष्म आणि स्थिर असेल त्यांना त्या बुद्धीच्या ह्मणजे ज्ञानाच्या योगानें मोक्ष मिळेल पण बुद्धि ही कांहीं सर्वांची सारखी नसते. अध्यात्म ज्ञानाला लागणारी तीव्र बुद्धि ज्यांचे ठायीं नसेल त्यांना मोक्ष कायमचा अंतरावा असा ईश्वराच्या घरचा न्याय संभवत नाहीं. तेव्हां अशा बुद्धीची देणगी मिळण्याइतकें महद्भाग्य ज्यांचें नसेल अशा लोकांकरितां सोपा असा भक्ति मार्ग भगवान् श्रीकृष्ण यांनीं गीतेच्या द्वारें लोकांस दाखवून दिला आहे. हा भक्ति मार्ग ह्मणजे काय तें सांगण्याचें हें स्थळ नव्हे, पण येवढी गोष्ट खरी कीं ज्ञान, भक्ति, आणि निष्कामकर्म हे तीन मार्ग सांगतांना भगवंतांनीं त्यांत उच्चनीचपणाचा भेद बिल्कुल ठेविलेला नाहीं, आणि विचाराच्या दृष्टीनें पाहिलें तरी असा तारतम्य-

भाव त्यांच्या ठायीं संभवत नाहीं. ज्ञानमार्ग व भक्तिमार्ग या दोन्ही उपासना आहेत. एक अव्यक्त परब्रह्माची उपासना, तर दुसरी व्यक्त अथवा सगुण परब्रह्माची उपासना येवढाच काय तो फरक; आणि ज्याला सगुणोपासना आपण ह्मणतों तिचें पर्यवसान ही खरोखर अव्यक्तोपासनेंतच आहे. कारण, मूर्तिपूजक जे पाषाणमूर्तींची उपासना करतात, ती तो पाषाण ह्मणून करीत नाहींत, तर अव्यक्त ब्रह्माचें व्यक्त स्वरूप ह्मणूनच करीत असतात. अर्थातच् उपासकांचें अंतःकरणांतला भाव त्या पाषाणमूर्तीला वाहिलेला नसून ती मूर्तीं ज्या ब्रह्माची प्रतिनिधी ह्मणून मांडली असते त्या मूळ शक्तीला वाहिलेला असल्यामुळें सगुणोपासना व निर्गुण उपासना हे भेद केवळ जड बुद्धीच्याच माणसाचे ठायीं संभवतात. वस्तुतः हे भेद नाहींतच. अर्थात् ज्ञानमार्ग व भक्तिमार्ग हे दोन्ही सारख्याच तोलाचे व योग्यतेचे आहेत. दोन्ही साधनेंच आहेत. असें असतां रा० टिळक हे त्यांच्यांत भेद ठेवूं पाहतात हें आश्चर्य आहे. रा० टिळक यांच्यामतें भक्ति ही गौण आहे. कारण, ती सिद्धावस्थेंतील अखेरची स्थिति अथवा निष्ठा होऊं शकत नाहीं! आह्मांला वाटतें कीं हा केवळ शब्दछल आहे. भक्तीचें पर्यावसान ज्ञानांत होऊन मग तें ज्ञान मोक्षास कारण होतें अशी जी समजूत रा० टिळक यांची झाली आहे ती त्यांना भक्तीला गौणत्व देण्यास लावीत आहे. पण ती समजूतच अगोदर आमच्या मतें चुकीची आहे. भक्त आणि ब्रह्म अथवा उपासक आणि उपास्य यांचें ऐक्य झाल्यावर ज्ञान, ज्ञाता, व ज्ञेय ही त्रिपुटीच मुळीं उरत नाहीं. मग ज्ञान कोणाला व्हावयाचें व तें ज्ञान मोक्षाला नेतें असें ह्मणण्यांत तरी काय अर्थ उरला? रा. टिळक यांच्या मतें भक्ति हा ज्ञानाचा नुसता मार्ग आहे— ह्मणजे— ज्ञानसाधन आहे, त्याचें साध्य नव्हे. आह्मांस वाटतें कीं भक्ति हें ज्ञानाचें साधन नसून ज्ञान व भक्ति हीं दोन्ही सर्वभूतात्मैक्यरूप मोक्षप्राप्तीचीं सारख्या तोलाचीं व सारख्या योग्यतेचीं साधनें आहेत. त्यांच्यांत तर व तम असा भेद ठेवतां येत नाहीं. रा० टिळक यांच्या मतें ज्ञान व कर्म हीं दोन्हीं निष्ठा ह्मणजे अखेरची स्थिति होऊं शकतात, पण भक्ति मात्र निष्ठा होऊं शकत नाहीं. खरें विचारपूर्वक पाहिलें तर कर्म निष्ठा कां व्हावें? व भक्ति कां होऊं नये? रा. टिळक ह्मणतात कीं चित्तशुद्धि होऊन ज्ञान व शांति प्राप्त झाल्यानंतर ही निष्काम कर्म करीत राहिल्यानें तें निष्ठा होऊं शकतें. पण भक्तीला तसा वाव नाहीं. ह्मणजे उपास्य व उपासक यांचें तादात्म्य झाल्यावर पुढें उपासना खुंटतेच. कारण मग कोणाची उपासना कोणी करावयाची हा प्रश्नच उरत नाहीं. ह्मणजे खरोखर पाहिलें तर भक्ति हा परब्रह्माशीं तादात्म्य पावण्याचा उर्फ मोक्षाचा अत्यंत सरळ, व प्रत्यक्ष मार्ग आहे, कर्ममार्ग हा तसा नाहीं, ह्मणून भक्तिमार्गच श्रेष्ठ ह्मटला पाहिजे. पण रा. टिळक त्याला उलट गौणत्व देऊं पाहतात हें आश्चर्य आहे.

रा. टिळक यांचा भक्तिमार्गावर निष्कारण कटाक्ष दिसतो व त्यांनीं आपल्याकडून आतिशय जपून व मनाची समतोल बुद्धि ठेवून ग्रंथ लिहिण्याचा यत्न केला आहे तरी भक्तिमार्गाविषयींचा त्यांचा दूषित ग्रह केव्हांना केव्हां तरी न कळत डोकावल्यावांचून राहत नाहीं. उदाहरणार्थ पृ. ४२२ वर त्यांनीं ह्मटलें आहे कीं सात्त्विक ज्ञानदृष्टीनें सर्व धर्मांतील ऐक्य ओळखून भक्तिमार्गांतील खोट्या 'बंडाचा' समूळ बीमोड करणारे धर्मगुरु आमच्या भारत भूमींत प्रथम झाले. या वाक्यांत भक्तिमार्गांतल्या खोट्या बंडाचा तेवढा त्यांनीं उल्लेख केला. पण अशीं खोटीं बंडे एकट्या भक्तिमार्गांतच झालीं, व ज्ञानमार्गांत किंवा रा. टिळकांच्या आवडत्या निष्कामकर्ममार्गांत झालीं नाहींत असें रा. टिळक छाती ठोकून सांगूं शकतील काय? खरें आहे त्याच्या आसपास खऱ्याचा आभास उत्पन्न करणारें खोटें बंड असावयाचेंच हा नियम सर्वत्र सारखा आहे. ज्ञान मार्ग किंवा निष्काम कर्म मार्ग ही या संकटांतून सुटलेला नाहीं हें इतिहासज्ञांस ठाऊकच आहे. तेव्हां कांचेच्या बंगल्यांत राहणारांनीं दुसऱ्याकडे खडे फेकण्यांत काय शहाणपणा आहे? बरें, भक्तिमार्गाच्या आसपास खोटीं बंडें आहेत ह्मणून विचारवंत माणसाच्या दृष्टीनें भक्तिमार्गाची योग्यता कधीं कमी होईल काय? हल्लीं अमेरिकेंत नकली हिरे होऊं लागले आहेत हा काय खऱ्या हिऱ्यांचा दोष ह्मणतां येईल? रा० टिळक याबद्दल भक्तिमार्गास दोष देतात असें ध्वनित करण्याचा आमचा हेतु नाहीं. पण त्यांनीं भक्तिमार्गाला गौणत्व देऊन पुढें लागलीच वरील विधान केलें असल्यामुळें भोळे वाचक त्या दोघांची सांगड अज्ञानानें घालूं पाहतील यासाठीं या गोष्टीचा उल्लेख येथें केला आहे.

भक्तिमार्गाचें अथवा भागवतधर्माचें ब्रह्म ह्मटलें ह्मणजे सगुण भगवानच होय, हें टिळकांचें विधान ही थोडेंसें आक्षेपार्ह आहे. भक्तिमार्गी लोकांची दृष्टि सगुण भगवाना पलीकडे निर्गुण ब्रह्माकडे केव्हांच जात नाहीं असा ध्वनि या वाक्यांतून निघतो. पण तो खरा नाहीं. मूर्तीची पूजा करीत असतां भक्तांची दृष्टि मूर्तीच्या पलीकडे सगुण भगवानाकडे जाते व तेथें थोडासा मुकाम करून तीच दृष्टि अखेरच्या मुकामावर ह्मणजे निर्गुण ब्रह्माचे ठायीं स्थिर होते असा खरा प्रकार आहे. ह्मणजे सगुण भगवान् ही मधली तात्पुरत्या मुकामाची पायरी, अखेरचें विश्रामस्थान नव्हे. भक्तीच्या द्वारें ब्रह्मप्राप्ति करून घेतल्यावर ही भक्तांना निष्काम कर्म करण्याची अवश्यकता आहे हें दाखविण्यासाठीं भक्तिमार्गाच्या ध्येयांत रा० टिळक यांनीं जी थोडीशी ही धरसोड केली आहे ती करण्याचें वस्तुतः कांहीं कारण नाहीं. कारण, सर्व भूतांचे ठायीं एकच तत्त्व ज्यांनीं पाहिलें ते त्या भूतांतल्या कोणत्याही एकाद्या व्यक्तीवर आपत्ति आलेली पाहत असतां निष्क्रिय बसतील हें संभवनीयच नाहीं. माणसाचें डोकें दगडावर आपटलें ह्मणजे तो डोकें चोळल्यावांचून जसा राहत नाहीं, किंवा पायांत कांटा मोडला तर तो काढण्यासाठीं त्याचे हात चटकन् तिकडे वळावयाचेच, त्याप्रमाणें भूतसृष्टींतल्या कोणाही व्यक्तीस दुःख पाहतांच भक्तांचें हृदय कळवळून तें दुःख जणू काय स्वतःसच झालें आहे अशा बुद्धीनें ते दुःख निवारण्याच्या उद्योगास लागावयाचे हा भक्तांचा प्रकृतिसिद्ध धर्मच आहे. भागवत धर्मी लोक ऊर्फ संताळ्यांतले लोक नुसते टाळ कुटीत राहून जगाच्या उपयोगीं पडत नाहींत असें जे कोणी ह्मणतात, त्यांना खऱ्या भक्तिमार्गाचें ज्ञानच झालेलें नसतें, किंवा खऱ्या भक्ताच्या चारित्र्याचें त्यांनीं अवलोकनच केलें नसतें. तुकारामबोवा किंवा नामदेव यांनीं लोकांकडून होणारी विटंबना व छळ सोसून ही लोकांना ताळ्यावर आणण्यासाठीं सामान्य काय पण बुद्धिमान माणसाची सुद्धां छाती दडपून जाईल अशा तऱ्हेची अभंगरचना केली, व कीर्तन द्वारें उपदेश केला त्यांतलें मर्म हेंच आहे. ते कर्मनिष्ठ नसते तर येवढी कामगिरी त्यांनीं केली असती काय? तुकारामबोवांना किंवा नामदेवाला अभंगरचना करण्याबद्दल एखाद्या प्रकाशकानें द्रव्याची लालूच दाखविली नव्हती, किंवा कीर्तिलोभ त्यांना नव्हता. ते स्वतः मुक्त होते, तरी इतर जनांना प्रपंचांत घोटाळतांना पाहून त्यांचें हृदय कळवळल्यामुळेंच त्यांनीं निष्काम बुद्धीनें आपल्या अभंगवाणीनें देशाची अमूल्य सेवा केली. हें त्यांचें निष्काम कर्म नाहीं तर काय ह्मणावयाचें? सारांश काय तर रा. टिळक यांनीं ज्ञानमार्ग व भक्तिमार्ग यांच्या उच्चनीचत्वाचा जो सूक्ष्म भेद काढला आहे तो सर्वथैव निराधार आहे. ज्ञानमार्ग आणि भक्तिमार्ग यांच्या ध्येयांत फरक नाहीं; दोघांचें ध्येय एकच आहे. असें असतां एकाला निष्ठा ह्मणणें व दुसऱ्याला केवळ मार्ग किंवा साधन असें विशेषण लावणें हा केवळ शब्दछळ आहे, भक्त जरी स्वतः मुक्त असला, तरी तो निष्काम कर्माचा त्याग करतो असें नाहीं, लोकसंग्रह शब्दाचा जो खरा अर्थ आहे त्या अर्थानें तो आपल्या चारित्र्यानें व उपदेशानें निष्काम कर्म आचरीतच असतो व भक्तांचें ध्येय ह्मणजे केवळ सगुण भगवान् यापलीकडे शुद्ध, बुद्ध, निर्गुण परब्रह्मापर्यंत त्याची दृष्टि जात नाहीं असें समजणें हा निवळ भ्रम आहे. याप्रमाणें रा. टिळक व आह्मी यांमध्यें भक्तिमार्गापुरता जो मतभेद आहे तो या लेखांत सांगितला. आतां पुढल्या खेपेस दुसऱ्या विषयाकडे वळूं.

## धर्मश्रद्धेचा उपहास.

मनुष्याच्या अंतःकरणांत धर्माविषयींची अढळश्रद्धा ही जी मनोवृत्ति आहे ती बहुमोल आहे. शिक्षणानें तिच्यावर संस्कार घडून तिचें उज्ज्वल स्वरूप झालें तर तें हवेंच आहे; पण तसें जरी झालें नाहीं, तरी जोंपर्यंत या श्रद्धेनें कोणत्याही नीतितत्त्वाचा अतिक्रम केला नाहीं तोंपर्यंत त्या श्रद्धेनें प्रेरित झालेल्या माणसाकडून व्यवहारदृष्ट्या जरी एखादी चूक झाली तरी ती श्रद्धेसारख्या उच्च भावनेच्या प्रेरणेनें झाली असल्यामुळें तिचा उपहास करणें हा उपहसकर्त्याच्या मनाचा क्षुद्रपणा आहे. हल्लींचें मनुष्यजातीचा संहार करणारें युद्ध थांबावें ह्मणून मुंबईचे कांहीं धार्मिक व्यापारी एक महायज्ञ लवकरच करणार आहेत. या महायज्ञाप्रीत्यर्थ लागणारा एक लक्ष रुपयांचा खर्च दुसऱ्यावर ओझें न घालतां ही व्यापारी मंडळी वर्गणी जमवून पार पाडणार आहेत. वस्तुतः मनुष्यजातीविषयीं दयालुत्व, ईश्वराविषयींची निष्ठा व शांतताप्रियता व त्यांसाठीं आत्मसमर्पण करण्याची बुद्धि इ० प्रशंसनीय गोष्टी या यज्ञाच्या मुळाशीं आहेत. या गोष्टी देशकालपरत्वें देशहिताच्या नाहींत असें कित्येकांचें मत असेल, कोणाला हा यज्ञ ह्मणजे तूप व साखर यांचा दुरुपयोग वाटत असेल, हा लक्ष रुपयांचा फंड नूतन मराठी विद्यालयासारख्या संस्था काढण्याच्या किंवा चालविण्याच्या कामीं दिल्यास त्यांत अधिक पुण्य व देशहित आहे असें कित्येकांचें मत असेल. पण हा महायज्ञ करणारांना यज्ञाच्या सफलतेविषयीं जोंपर्यंत विश्वास आहे, व असा यज्ञ करणें हें कोणत्याही नीतितत्त्वास सोडून नाहीं, तोंपर्यंत शेटजींनीं आपल्या श्रद्धेप्रमाणें मानवजातीच्या हितार्थ तो यज्ञ करण्याचा विचार कायम ठेवल्यास त्याचा उपहास करणें हें धर्मविचाराचें ब्रीद धारण करणाऱ्या पत्रिकेसारख्यास तरी शोभत नाहीं. पत्रिकेच्या संपादकास धर्मश्रद्धेचें मोलच कळत नाहीं असें ह्मटलें पाहिजे. यज्ञकर्त्याची धर्मश्रद्धा असंस्कृत असेल, तिचें धोरण प्रार्थनासमाजाच्या धोरणाहून निराळें असेल, पण तेवढ्यावरून तें उपहासाला पात्र ठरविणें हें मानसिक दुर्बलतेचें लक्षण ह्मटलें पाहिजे. तूपसाखरेचा अपव्यय यज्ञाचे कामीं जसा होतो, तसा 'प्रीतिभोजन' या भपकेदार नांवाखालीं दरसाल होणाऱ्या समारंभांत ही होत असतो हें आह्मांस ही ठाऊक आहे. प्रीतिभोजनानें समाजिस्टांत खरोखर प्रीतीचा अंकुर कितीसा वाढतो तें दिसतेंच आहे. अशा स्थितीत सद्धेतुप्रेरित व स्वार्थत्यागमूलक पण नीतितत्त्वाला अविरुद्ध अशा श्रद्धापूर्वक करण्यास योजलेल्या गोष्टीचा उपहास करणें हा केवळ मूर्खपणा आहे.

## अमीराची समदृष्टि

दिल्लीचा मोंगल बादशाहा अकबर हा हिंदु व मुसलमान या दोघांना ही समदृष्टीनें पाहत असे. त्याच्या पदरीं हिंदु तसे मुसलमान मुत्सद्दी थोर पदवीस चढलेले होते. ईदसारख्या मुसलमानांच्या सणाच्या दिवशीं गोवध करण्याची जी मुसलमानांमध्यें चाल आहे ती मुसलमानी धर्मशास्त्रानें विधि ह्मणून मानलेली नसल्यामुळें हिंदूंच्या मनोवृत्तीकडे लक्ष देऊन ती त्यानें निशिद्ध ठरविली होती, व हिंदूंना आपल्या सैन्यांत मोठाल्या हुद्याच्या जागा दिल्या होत्या, वगैरे गोष्टी आपणांस इतिहासावरून विदित झाल्या आहेत. पण आज अकबर बादशाहासारखा समदृष्टि बादशाहा हिंदुस्थानांत जरी नसला तरी या देशाच्या अगदीं शेजारीं आहे ही गोष्ट फारथोड्यांना अवगत असेल. कांहीं वर्षांपूर्वी अफगाणिस्थानचे हल्लींचे अमीर हिंदुस्थानांत आले असतां दिल्ली येथें त्यांना ईदचा सण पडला. तेव्हां या दिवशीं

गोवध होऊं नये अशी इच्छा हिंदूच्या मनोवृत्तीकडे लक्ष देऊन त्यांनीं प्रदर्शित केली होती व त्याप्रमाणें तो सण गोवध न करतां पाळण्यांत आला असें वर्तमानपत्रद्वारा खबर आली होती. याच अमीरासंबंधानें अलीकडे त्यांच्या मनौदार्याची साक्ष ह्मणून दोन गोष्टी प्रसिद्ध झाल्या आहेत. पहिली गोष्ट अशी आहे कीं गेल्या कुंभस्नानाचे वेळीं अफगाणिस्थानांतले हिंदुलोक एका तीर्थावर स्नानास गेले असतां अमीर साहेबाची स्वारी तेथें मुद्दाम गेली व त्यांनीं हिंदु पुढाऱ्यांस भेटून तुह्मांला आपल्या धर्माचरणांत कांहीं व्यत्यय येत नाहीं ना? असा प्रश्न करून कुशल प्रश्न विचारले, आणि आपल्या राज्यांतील हिंदुप्रजा संतुष्ट असावी अशी आपली इच्छा प्रदर्शित केली. हिंदुप्रजेच्या मनांत या गोष्टीनें अमीराविषयींची राजनिष्ठा द्विगुणित झाली असली पाहिजे यांत शंका नाहीं. दुसरी गोष्ट अशी आहे कीं या अमीर साहेबांनीं आपल्या सैन्यांतली कर्नलसारख्या मोठ्या हुद्याची जागा दिवाण निरंजनदास नांवाच्या एका हिंदुला दिली आहे. खरी लायकी ही सन्मानार्ह आहे, तेथें वर्णाचा भेदाभेद ठेवणें रास्त नाहीं हें धोरण अमीर साहेबांच्या मनांत पूर्णपणें ठसलेलें दिसत आहे. अमीर साहेबांच्या या दोन गोष्टी वाचून हिंदुस्थानांतल्या हिंदुप्रजेच्या मनांत ही त्यांच्या विषयीं पूज्यभाव उत्पन्न झाल्याशिवाय राहणार नाहीं. राज्यकर्त्यांच्या ठायीं अशी समदृष्टी व मनौदार्य असल्यावर प्रजेच्या मनांत ही क्षुद्र विचारांना जागा मिळत नसते, हें इतिहासानें अनुभवलेलें मनुष्यस्वभावांतलें तत्त्व विचारणीय आहे.

---

## यशाचे किल्ले.

सरकारी साप्ताहिक युद्धवृत्ताच्या ३० व्या लेखांकांत आजपर्यंतची स्थिती फार मार्मिकपणानें प्रकाशित केलेली आहे. वर्तमान काळीं लढणारी राष्ट्रें कोणत्या पद्धतीनें आपले यशाचे किल्ले सर करीत आहेत यांचें चित्र खालील अवतरणा वरून लोकांच्या डोळ्यापुढें उभें राहण्यासारखें आहे:—

साम्राज्यांतील प्रत्येक भागांतील लोकांनीं लढाईवर जाण्याची इच्छा दर्शविली. व त्यामुळें मनुष्यबळाची तजवीज झाली. देशांतील उद्योगधंद्यांची हळूं हळूं पुनर्घटना करण्यांत येत आहे. हल्लीं लढाईवर गेलेल्या लोकांच्या पूर्वीच्या जागांवर लढाईवर जाण्या इतक्या वयाचे नाहींत असे फार तरुण किंवा वृद्ध लोक आज काम करित आहेत. ब्रिटिश उद्योगधंद्याचें नुकसान न व्हावें ह्मणून कित्येक ठिकाणीं पुरुषांचीं कामें स्त्रिया व मुली करित आहेत. हें तर असोच, पण आपलें आरमारही असें डोळ्यांत तेल घालून काम करित आहे कीं त्यानें आपला जलमार्गानें होणारा व्यापार सुरक्षित राखला आहे इतकेंच नाहीं तर तो जर्मनीचा मात्र अगदीं ठार बुडविला आहे. पृथ्वीच्या पाठीवर जेथें जेथें ह्मणून इंग्लंडचें वर्चस्व आहे तेथून तेथून इंग्लंडला द्रव्याचा पुरवठा झाला. पण लढाईवर जाण्यास सिद्ध झालेल्या इतक्या थोरल्या लोकांचे पोषणास व त्यांस पुरवावयाच्या दारूगोळ्यास लागणारा खर्च सारखा वाढतच आहे. नुकताच असा अंदाज करण्यांत आला कीं ह्या युद्धाप्रीत्यर्थ इंग्लंडला दररोज सुमारें साडेचार कोट रुपये खर्च करावे लागतील. गेल्या आगष्ट महिन्यापासून कित्येक कोटी रुपये इंग्लंडाने खर्चही केले आहेत. लोकांनीं स्वतः होऊन दिलेल्या देणग्यांचे साहाय्यानें, ग्रेटब्रिटनमध्यें कर बसवून व कर्ज काढून ब्रिटिश सरकारनें हा खर्च भागविला. सरकाराजवळ पैशाचा पुरवठा अधिक व्हावा ह्मणून ब्रिटिश चॅन्सेलेर आफ एक्सचीकर (ब्रिटिशसरकारचे मुख्य कोषाध्यक्ष) यांनीं एक मोठें युद्धाचे कर्ज उभारलें आहे. ह्या योगानें ब्रिटिश साम्राज्यांतील लोकांना चांगल्या व्याजानें सरकारास कर्ज देण्याची संधि सांपडेल. ही योजना ह्मणजे आधुनिक कालांतील अत्यंत आकर्षक अशी पैसे व्याजीं लावण्याची सोय आहे असें ह्मणतात; आणि इंग्लंडांतील पुष्कळ लोक ह्या संधीचा फायदाही घेऊं लागले आहेत. असा अंदाज आहे कीं ह्या रीतीनें सरकाराला कित्येक कोटी रुपये मिळतील आणि शत्रू पुरा चीत होईपर्यंत त्याच्याशीं युद्ध सुरूं ठेवतां येईल.

### दारू गोळ्याचा पुरवठा

दोस्त राष्ट्रांचें सध्यांचें मोठें अवजड काम ह्मटलें तर तें सैन्याला दारूगोळा पुरविण्याचें होय. युद्धाचे सुरुवातीसच जर्मनीनें सर्व प्रकारच्या दारूगोळ्याचा अगदीं भरभक्कम सांठा करून ठेवला होता. दोस्त राष्ट्रांची युद्धाची तयारी नव्हती. रशियाला अजून आपल्या सर्व सैन्याला दारूगोळ्याचा पुरेसा पुरवठा करतां आलेला नाहीं, आणि गॅलिशियांत रशियाची जी पीछेहाट झाली त्याचें कारणही हेंच होय. फ्रान्स व इंग्लंड ह्या दोन्ही राष्ट्रांनीं आपली दारूगोळ्याची पैदास अतोनात वाढविली आहे. पण ती पैदास अजून पुष्कळ जास्त प्रमाणांत झाली पाहिजे आहे.

### मि लॉइड जॉर्ज ह्यांचें म्युनिशन (दारूगोळया संबंधाचें) बिल

ही अडचण दूर व्हावी ह्मणून कांहीं दिवसांपूर्वीं मि. लॅाइड जार्ज यांस दारूगोळ्याचे मंत्री नेमण्यांत आलें. त्यांनीं आघाडीवरील सैन्यास दारूगोळ्याचा पुरवठा व्हावा ह्मणून एक दूरगामी योजना ताबडतोब तयार केली. ह्या कामासाठीं त्यांनीं हाऊस ऑफ़ कॉमन्स पुढें एक बिल नुकतें सादर केलें आहे. हाऊस ऑफ़ कॉमन्स पुढें हें बिल मांडतांना त्यांनीं असें कळविलें कीं शत्रू अतोनात दारूगोळा तयार करित आहे व आपणही तेंच केलें पाहिजे. आपलें सैन्य संख्येनें व बळानें शत्रूच्या सैन्यापेक्षां श्रेष्ठ आहेच, अर्थात, आतां आपण जर पुरेसा दारूगोळा तयार केला तर आपणास मोठा विजय मिळेल. ह्या कामाकरितां ह्या पूर्वीच इंग्लंडचे निरानिराळे विभाग पाडण्यांत आले आहेत. ह्या कामाची देखरेख करण्याकरितां प्रत्येक विभागांत ह्या कामांतील एक तज्ज्ञ, व आरमार खात्याचा आणि फौज खात्याचा एक प्रतिनिधि ह्यांची नेमणुक करण्यांत आली आहे. दारूगोळा तयार करण्यासाठीं वाकबगार मजुर मिळावे ह्मणून फार खटपट करण्यांत येत आहे व हजारों लोकांनीं तें काम करण्याचें आपखुषीनें पत्करिलेंही आहे. ह्या युद्धांत दोस्त राष्ट्रांचाच जय होणार ह्यांचें हें एक मोठेंच शुभ चिन्ह होय.

### परदेशी माल पाठविण्या संबंधानें निर्बंध.

हॉलंडमध्यें एक खास मंडळ नेमण्यांत आलें आहे व ह्या मंडळानें आमच्या मार्फत कोणताही माल पाठविल्यास तो पुढें जर्मनीमध्यें आह्मी जाऊं देणार नाहीं अशी हमी घेतली आहे व त्या मंडळामार्फत नाहीं अशा रीतीनें माल पाठविण्यांत येऊं नये ह्मणून नुकतेंच एक बिल ब्रिटिश पार्लमेंटनें पास केलें आहे. हें बिल पास होण्यापूर्वी हालंडमधील व्यापाऱ्यांनीं इंग्लंडपासून घेतलेल्या मालापैकीं पुष्कळसा माल पुढें जर्मनींत पाठविला जात असे. ह्यांत कांहीं संशय नाहीं. यापुढें मालाच्या पुरवठ्याचा हा मार्ग बंद होऊन जर्मनीचा कोंडमारा अधिक पक्का होईल.

### पश्चिम रणभूमीवर.

युद्धाच्या सांपात्तिक व औद्योगिक अंगांसंबंधाची व्यवस्था तर उत्तम होत आहे, पण प्रत्यक्ष रणभूमीवर काय हाल हवाल आहे? पश्चिम रणक्षेत्रावर बहुतेक सर्वत्र लढाई सुरू आहे, व फ्रेंच सैन्य ‘सूशेझ, चे रोखानें पुढें चाललेंच आहे. ‘लॅारेन’ मध्यें त्यांनीं ३,००० हात पर्यंत पसरलेली शत्रूची खंदकांची एक रांग सर केली आणि ‘व्होसजेस’ पर्वतांत आणि ‘आल्सेस’ मध्यें तें नेटानें पुढें सरकत आहे. बेलज्यन सैन्यानेंही एक स्थानिक जय मिळविला.

### पूर्व रणभूमीवर.

पूर्व रणभूमीवर रशियन सैन्य मागें हटतच आहे. ता० २१ व २२ जून रोजीं त्यांनीं शत्रूंशीं निकराचें युद्ध करून शत्रूची फार नासाडी केली. कांहीं वेळपर्यंत ऑस्ट्रो-जर्मन सैन्यास रशियन सैन्यानें थोपवून धरलें. तरी पण शत्रूचें सैन्य ‘लेंबर्ग’ चे उत्तरेस पुढें सरकलें आणि रशियन सैन्यानें तें शहर सोडून दिलें. तथापि अशी खबर आली आहे कीं हें शहर सोडून देण्यापूर्वीं रशियन सैन्यानें तेथें सांठवून ठेवलेला सर्व दारू गोळा व इतरसामग्री बरोबर नेली आणि त्यामुळें हें शहर सर करण्यापासून शत्रूला जो कांहीं फायदा व्हावयाचा तो बहुतेक नाहींसा झाला.

### इतालियन सैन्य.

‘आयसोंझो’ नदीच्या डाव्या कांठावर ‘प्लाव्हा’ च्या पलीकडे टेंकड्यावर चकमकी झाल्या. आस्ट्रियन ठाण्याची तटबंदी उत्तम प्रकारें केलेली होती, आणि यामुळें तें ठाणें सर करतांना इतालियन सैन्याचे पुष्कळ लोक दगावले. पण आतां ह्या टेंकड्या इतालियनांच्या स्वाधीन राहिल्यामुळें इतालियनांचें ठाणें मजबूत व महत्त्वाचें झालें आहे. तोफा व कुलपी गोळे तयार करण्याचा जो आस्ट्रियनांचा कारखाना ‘ट्रीस्टी’ येथें आहे. त्यावर इतालियनांनीं कुलपी गोळ्यांचा भडिमार केला.

### जर्मन नैर्ऋत्य आफ्रिका

वाचकांचे हें लक्ष्यांत असेलच कीं दक्षिण आफ्रिकेंतील ब्रिटिश फौजेचे सेनापति जनरल बोथा यांनीं थोड्याच दिवसांपूर्वीं जर्मनांच्या नैर्ऋत्य आफ्रिकेची राजधानी सर केली. पण पुरेसा दारूगोळा जवळ नसल्यानें त्यांना पुढें पाऊल टाकतां येईना. आतां त्यांना हवा तितका दारूगोळा पुरविण्यांत आला आहे व अशी बातमी आली आहे कीं त्यांनीं जर्मन नैर्ऋत्य आफ्रिकेंतील रेल्वेवर असलेलें ‘ओमारारू’ नांवाचें ठाणें काबीज केलें आहे. जनरल बोथा हे पुढें चाललेच आहेत.

### सारांश.

सर्वच लढायांना खर्च फार लागतो, पण ह्या लढाईस तर अतोनात खर्च लागत आहे. युद्ध करित असलेल्या सर्व राष्ट्रांना आपले लोक व पैसा हे खर्ची घालावे लागतात; इंग्लंडलाही तेंच करावें लागत आहे. लढाईसाठीं लोकही भराभर हांकेस धावून येत आहेत व पैशाचाही पुरवठा होत आहे. ब्रिटिशांची दारूगोळ्याची पैदास वाढविण्याचेही कसून प्रयत्न चालले आहेत. रणक्षेत्रांत रशियन लोक जरी ‘लेंबर्ग’ पासून मागें हटले आहेत तरी बाकीच्या दोस्त राष्ट्रांचें पाऊल पुढेंच पडत आहे. जर्मन नैर्ऋत्य आफ्रिकेंत जनरल बोथा ह्यांनीं आणखी एक जर्मन ठाणें सर केलें आहे आणि ते पुढें चाललेच आहेत.

---

## हिंदी शिपायांची बहादरी.

पश्चिमेकडील रणक्षेत्रांत गुरखे, शीख वगैरे हिंदी शिपायांनीं आपल्या धाडसी, व जिवाची पर्वा न करतां दाखविलेल्या शौर्यानें इंग्रज, फ्रेंच व जर्मन लष्करी अधिकाऱ्यांना आश्चर्यचकित करून सोडल्याची खबर वर्तमानपत्रांत वारंवार वाचण्यांत येते. पण असेच शौर्य हिंदी शिपाई मेसापोटेमीया, बसरा वगैरे युद्धाचे ठिकाणीं ही दाखवित आहेत ही अत्यंत अभिनंदनीय गोष्ट ह्मटली पाहिजे. मेसापोटेमियाकडील युद्धाचा रिपोर्ट तेथील लष्करी अधिकाऱ्याकडून नुकताच करण्यांत आला आहे त्यांत ७ वी राजपूत पलटण, ११० नी मराठा लाइट इन्फंट्री व १२० वी राजपूत इनफंट्री यांनीं तिकडे मोठें शौर्य दाखविल्याबद्दल फार प्रशंसा केली आहे. शत्रूच्या तोफेच्या भडिमारांत नदी पोहून पैलथडीला जाणें, अरबासारख्या कडव्या जातीच्या शिपायाचा यथेच्छ समाचार घेणें, समरभूमींतून पाय काढणें हें महत्पाप व देशाची मोठी विटंबना समजून धारातीर्थी देह ठेवणें, अतिशय संकटांतून जखमी झालेल्यास उचलून आणणें, वगैरे अनेक कामें फार शिताफीनें केल्याबद्दल मुसलमान, ब्राह्मण, मराठे, वगैरे हिंदी शिपायांची तारीफ झालेली पाहून आणि त्यांतल्या त्यांत लढण्याचे कामीं नेभळे समजले गेलेल्या ब्राह्मणांची संख्या या यादींत बरीच मोठी पाहून कोणा महाराष्ट्रीयाला साभिमान कौतुक वाटणार नाहीं? हा लढाईचा प्रसंग आला नसता, तर ब्राह्मणांवरचा नेभळेपणाचा निष्कारण लागलेला कलंक तसाच राहिला असता. तो धुऊन टाकण्याची संधी या युद्धप्रसंगानें आणून दिल्याबद्दल युद्धदेवतेचे उपकार मानले पाहिजेत.

---

## विश्वासूक सद्गृहस्थ.

इंडियांत हत्याराचा कायदा ह्मणजे एक महाअस्त्र आहे. त्यांचीं कलमें तर अविश्वासाचें माहेरघर होय. तथापि त्या कलमांच्या अटी ज्या गृहस्थासंबंधानें रद्द असतात त्यांस आह्मी भाग्यशाली समजतों. अशा विश्वासाला जी मंडळी सत्पात्र आहेत त्यांचा नामनिर्देश गेल्या सरकारी ग्याझिटांत आलेला आहे. ही कुशल नामावली आह्मी मोठ्या आनंदानें अधीक जाहिर करितोंः—

रा. रा. मीर तुराबअल्ली जहागीरदार, उमरावती रा. दत्तात्रय कृष्ण जहागीरदार, पारवा यवतमाळ रा. नारायणराव बाबूराव देशमूख, हैसांग रा. नारायण रामचंद्र देशपांडे बाळापूर रा. उत्तमराव यशवंतराव नाईक, राजूरा. रा. माणिकराव बळवंतराव देशमुख माटरगांव रा. सीताराम रूपचंद पाटील पिंपळगांव (काळ्याचे)

रा. रा. सदाशिव विनायक वसंतगडकर बी. ए. असिस्टंट मास्तर हायस्कूल, आकोला यांस उमरावतीस डेप्युटी इन्स्पेक्टर नेमण्यांत आलें. येथील हायस्कूलांतील विद्यार्थी यांस फार चाहतात. ही त्यांच्या विद्यादानाची व सुजनतेची प्रंशसनीय खूण होय.

रा. रा. शिवराम हरी गोखले एम्. ए. प्रिन्सिपाल ट्रेनिंग कॉलेज उमरावती यांस नागपूर येथील नार्मलस्कूलचे प्रिन्सिपालचे जागीं बदलल्याचा हुकूम आला आहे. हे गृहस्थ आज सतरा अठरा वर्षें वऱ्हाडच्या शाळा खात्यांत मोठ्या लौकिकांस चढलेले आहेत. यांची शिकवण्याची सरणी सर्वजण फार वाखाणतात. यांचा विनय आणि प्रेमळ पण मितस्वभाव ही यांच्या विद्वत्तेला व स्वतंत्र विचाराला शोभा आणतात. कस्तूरीचा आमोद जितका दूरवर फैलावेल तितका त्याचा आह्मांला अधिकच गौरव वाटतो.

रा. रा. गणपत प्रल्हाद मुनशी हेडमास्तर पेठ ए. व्ही. स्कूल आकोला यांची बदली तळेगांव दशसहस्राच्या शाळेवर झाल्या मुळें ते तिकडे पूर्वीच दाखल झाले आहेत. या गृहस्थांचा लौकीक नावाजलेल्या शिक्षकांमध्यें आहे हें आह्मी नमूद करतांना तळेगांवच्या शाळेचें या चांगल्या लाभा बद्दल अभिनंदन करितों.

यंदाच्या मॅट्रीक्युलेशनच्या परीक्षेंत उमरावतीच्या हिंदु हायस्कूलांतून ५९ विद्यार्थी पसार झाले असून त्या पैकीं एक पहिल्या वर्गांत आणि निम्याहून अधिक विद्यार्थी दुसऱ्या वर्गांत उत्तीर्ण झालेले आहेत हें त्या संस्थेच्या अध्यापकांस विशेष श्रेयस्कर होय. उमरावतीच्या मुसलमानी हायस्कूलांतून ९ जण पास झालेले आहेत.

यवतमाळच्या हायस्कूलाचा निकालही त्या शाळेला अभिनंदन करण्या सारखा असून सोळा यशस्वी विद्यार्थ्यांमध्यें कुमारी श्रीमती द्वारकाबाई (रा० रा० गोविंद भालचंद्र यांची कन्या) यांचें आह्मी विशेष अभिनंदन करितों आणि यवतमाळ हायस्कूलानें आमच्या प्रांतांतील इतर हायस्कूलांवर ही मोठी सरशी केली असा आह्मी धन्यवाद गातो

## दिवाणी फिर्यादी.

### (हक्क नोंदणी निमित्त दिवाणी कायद्यांत सुधारणा)

जेथें जेथें हक्कनोंदणी अमलांत आलेली आहे आणि शेतीच्या कबजेदारांच्या याद्या प्रसिद्ध झालेल्या आहेत तेथें तेथें शेती संबंधाचा दावा ज्या कोणाला करावयाचा असेल त्यानें आपल्या फिर्याद अर्जासोबत हक्क नोंदणीचा दाखला जोडला पाहिजे अशी नवीन वहिवाट पडत चालली आहे. पण तिला कायद्याचा असावा तितका जोर नाहीं ह्मणून नामदार हायकोर्टाकडून अशी सुधारणा करण्याचे घाटत आहे कीं जर फिर्याद अर्जाला हक्क नोंदणीचा दाखला जोडला नसेल तर ती फिर्याद परत करण्यांत येईल; आणि जेव्हां जेव्हां हुकूमनाम्याअन्वयें हक्क नोंदणीमध्यें फेरबदल करणें जरूर पडेल तेव्हां त्या हुकूमनाम्याची नक्कल त्या त्या शेतीच्या गांवाच्या डेपुटी कमिशनराकडे योग्य तजविजीसाठीं धाडण्यांत येईल. दिवाणी कायद्यांत होणाऱ्या या घडामोडी संबंधानें जर कोणास कांहीं सूचना करावयाची असेल तर त्यानें ती १९ आगष्टच्या आंत करावी.

## वऱ्हाडवृत्त.

**हवामानः—** या सप्तकांत पावसाची पूर्ण उघाडी होती. क्वचित् अभ्रें येत आणि हवा कुंद होऊन मनस्वी गुदमरे. पावसाकडे पुनः दृष्टी लागली आहे. खरीपाच्या पेरण्या संपत आल्या आहेत. रोगराई ऋतुमानाप्रमाणेंच आहे.

जाहिर विनंतिः— मध्यप्रांत आणि वऱ्हाड मिळून एक विश्वविद्यालय काढण्याचा आमच्या प्रांतिक सरकाचा स्तुत्य विचार आहे. हें विश्वविद्यालय कशा धर्तीवर असावें आणि त्याखालीं कॉलेजें कोठें कोठें काढावीं वगैरे बद्दल विचार करण्यासाठीं प्रमुख गृहस्थांची एक कमिटी नेमण्यांत आली होती. त्या कमिटीचा साग्र रिपोर्ट बाहेर पडला असून तो आमचेकडे आलेला आहे. या महत्त्वाच्या बाबतींत कांहीं लिहिण्यापूर्वी आमच्या वऱ्हाडवासीयांकडून कांहीं उपयुक्त सूचना आल्यास बरें होईल.

रा० रा० बी० इनामती शामराव, डिव्हिजनल फॉरेस्ट ऑफिसर, आकोला, यांनीं आपल्या कामाचा चार्ज घेतला ह्मणजे रा० रा० पांडुरग नारायण, एक्स्ट्रा असिस्टंट कॉन्सरवेटर ऑफ फॉरेस्ट, यांस मेळघाट येथें बदललें.

रा० रा० इ० डब्ल्यू० पाई, आय० सी. एस्., असिस्टंट कमिशनर, उमरावती, यांस हुशंगाबाद येथें नेमिलें.

रा० रा० विश्वनाथराव दिग्रसकर, एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर, यांस ते रजेवरून परत आल्यावर यवतमाळ येथें नेमण्यांत आलें.

स्तुत्य औदार्यः— आमच्या तालुक्यांतील भोड गांवचे रा० रा० भिकाजी परशराम देशमूख यांनीं सुमारें १४०० रुपये खर्चून ४७ विद्यार्थ्यांच्या सोयीची शाळा बांधून दिली. ही गोष्ट त्यांस भूषणास्पद होय. आणि अलिशान नामदार चीफ कमिशनरांनीं या देणगीचा स्वीकार करितांना आपली मान्यता गौरवपूर्वक व्यक्त केली आहे. विद्येची पाणपोई स्थापण्यासारखें दुसरें मोठें पुण्य तें कोणतें!


सतत ४२ वर्षें चाललेला कारखाना

**ए. जे. झात्रे आणि सन् सुगंधी.**

ठिः--पांजरा पोळचा नाका, चिमणलालमहाराजांचे मदार मुलेश्वर — मुंबई.

एकच माव! ओटो मुरंगी! एकच माव!!

**आमचेकडे मिळणारा माल**

**ओटो मुरंगी**

**अत्तरें.**— गुलाब, मोतिया, दवणा, अंबर, बकूल रुपाच, हिना, पाच, वाळा, जुई चांफा, अंबा, इस्तंबोल, केशर, मदनबाण पारिजातक, मुस्काहिना, गुलहिना, रुअबझा, केवडा, रुखस, चमेली, अगर. हीं अत्तरें दर तोळ्यास १ रुपयापासून ८ रुपयेपर्यंत निरनिराळ्या भावाचीं मिळतील. २-३-४-६ रु.

**तेलें.**— चमेली, बेलिया, मुसुंबी, हिना, लिंबू, मेंदी, गुलाब, मसाला, नारंगी, सुगधराव, मोतिया, आवळा, नागर, कपाशी.

वरील तेलें दर रुपयास ६ तोळ्यापासून २८ तोळेपर्यंत निरनिराळ्या भावाची मिळतात. दर बाटली ४ आणे.

**अष्टगंधी अरगजा** १ तोळ्यास ४ आ. ६ आ. १२ आ. १ रु. १॥ रु.पर्यंत. अरगजा व फितना निरनिराळ्या सुवासाचा दर डबीस ३ आ. ४ आ. ६ आ. ८ आ. १ रु. उटणें दर डबीस १ आ. २ आ. ४ आ. ८ आ. पर्यंत. केशरी गोळी उत्तम २॥ आ. ५ आ. १० आ. १। रुपयापर्यंत. क्याटलॉग फुकट

ह्याशिवाय कस्तुरी, केशर, गुलाबपाणी, मध, उदबत्ती, रंगीत पाट, दशावतारी गंजिफे, सोंगट्या, बुद्धिबळें, आर्यवर्धक कार्डस, बिझिक, इसापिकें, हस्तीदंती फासे व फण्या, पितळी सामान, पितळी शिंगे व करणे, चंब्या, सरबतें व मुरंबे, पक्या तारा, बदामाचें तेल, व वातहारक आणि केशवर्धक तेलें, सुटें व वेणीचें गंगावन इत्यादि वरील पत्त्यावर मिळेल. व्यापाऱ्यांस सवलत.

बाहेरगावच्या गिऱ्हाईकांस माल व्हल्युपेबलनें पाठविला जाईल. नो. नं. १



# Oriental Government Security Life Assurance Co., Ltd.

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY. R. PATERSON BROWN MANAGER.

## FUNDS almost 5 CRORES.

INVESTED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BONDS.

*Claims paid* $4\frac{1}{2}$ CRORES

## A Decennial Record of Progress.

| Year. | No. of Polices in force. | Existing Assurances. |
|---|---|---|
| 1884 | 4.823 | 1,59,25,200 |
| 1894 | 20,110 | 5 26,08,850 |
| 1904 | 43,356 | 8 88,02,223 |
| 1914 | 65,269 | 12 37,10,910 |

| Year. | Total Income. | Total Assets. |
|---|---|---|
| 1884 | 6,77,552 | 14,41,429 |
| 1894 | 25,49,607 | 94,49,971 |
| 1904 | 43,64,808 | 2,47,18,898 |
| 1914 | .72,46,043 | 4,96,86,509 |

## BONUS

The bonus for the premium ending 31 December 1912, constitutes a record for the company. The next Division of profits will be madea s at 31 December of the current year when all With Profit Policies effected prior to that date will participate—

## SPECIAL FEATURES.

Absolute Security—Low Rates—Liberal Conditions.
Forty years continuously increasing prosperity.
Ninety per cent of the entire Profits, after providing for the Reserve Fund,
divided among the Policyholders every 3 years.
Native Lives are accepted at the same rates as Europeans
Loans granted to policyholders at reasonable rates.
Prompt Payment of Claims.

:0:

Full particulars, prospectus and proposal forms on application to:—

Influential and energetic Agents wanted-Terms liberal.

**M. deSOUZA,**
CHIEF AGENT,
*C. P. Berar & Khandesh*
NAGPUR.

N. N. 25


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवअर्थमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd-No. N 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

आगष्ट १९१५

वर्ष ४९ ] आकोला---सोमवार तारीख १९ माहे जुलै सन १९१५ ई० [ अंक २८

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

---

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } S Clements, एजंट

नो. नं २

### अस्सल अंगूरी.

## हींग

केवळ एक आणा तो. पवित्र केसर ।।।= ता. शुद्ध शिलाजीत. -।।- तो. खालिस कस्तूरी रु. २५ तो. तिब्बती ममीरा रु. ३ तो.

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ५

नो० नं० ८

---

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागले आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तावडतोब दूर होतात. किं रु. १८८.

### बाटलीवाला यांचें दंतमंजन.

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

DR. H. L Batliwala. Sons & Co Ltd
N. N. 5 Dadar Bombay.

---

## चांदीचीं भांडीं.

### विकावयाचीं आहेत.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवू मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ.

**पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन**
**रविवार पेठ नाशिक सिटी.**

नो. नं. ४

### ब्रह्मविद्या ग्रंथ रत्नमाला

या मासिकाचा वर्षारंभ माघ शु० ९ तिसऱ्या वर्षापासून ७२ पानांचें मासिक. वा० व० ट० खर्चासह तीन रुपये. यांत **श्रीशंकराचार्य, शंकरानंद,** व **विद्यारण्य** यांचे उपनिषदावरील **भाष्य, आत्मपुराण** वं **अनुभूतिप्रकाश** हे ग्रंथ क्रमानें मूळ, अन्वय, अर्थ व विवरण यांसह प्रसिद्ध होतात. यांत हल्लीं बृहदारण्यकाचा भाष्यार्थ चालू आहे. मागील दोन वर्षांतील वीस प्रकरणें १० रुपयांस घेऊन तिसऱ्या वर्षी वर्गणीदार होणारास '**वैशेषिक दर्शन**' बक्षीस-

सनातन वैदिक **धर्माचें, तत्त्वज्ञानाचें** व सामाजिक विषयाचें विवेचन करणारें--

### आचार्य

पाक्षिक, दर एकादशीस नियमितपणें प्रसिद्ध होतें. पृष्ठें २४ वा० व० ट० खर्चासह १ रु० ८ आणे वरील मासिक घेणारास फक्त १रु० वरील विषयांशिवाय यांत संस्कृत काव्यें, नाटकें व इतर लहान लहान ग्रंथ यांचाही परामर्श केला जातो. धर्म संबंधीं प्रश्नांची समर्पक उत्तरेंही दिलीं जातात नमुना मागवा.

पत्ता— विष्णुशास्त्री बापट.
२४१ सदाशिव पेठ पुणें.

नो० नं० ३

### अनायासें देवदर्शन.

नोटपेपर्सः— श्रीगजानन, दत्तात्रय मारुती शंकर व नरहरी या पैकीं कोणती ही एक मूर्ती रंगांत दाबून उठाव (एम्बास) छापलेले, १०० प्रेग्रनाईट नोटपेपर्स व त्याच्या बेताचीं चौकोनी १०० कव्हरें प्रत्येकीं किंमत ८८ व्हीपीनें ८१२ दोन्हीमिळून किंमत रु. १ व्ही. पी रु० १८१




सर्वत्र एजन्टस् पाहिजेत

**पत्ता—बेंद्रे आणि कंपनी पुणेंसिटी**

नो. नं ७

### मुद्दाम अनुभवाकरितां.

दिलखुषमलम— तमाम त्वचा रोगांवर चालणारा— १ मनुष्यापुरतें औषध किं० १॥ आणा. अस्सल कर्पुरार्क — किं० २ आणे केशनाशक अप्रातिम पूड कि. २ आणे कर्णाबिंदू — कानाचा विकार १ दिवसांत गुण ३ दिवसांत फायदा होतो. किं० २ आणे मेंथालार्क किं० १ आणा.

### अनंगाविलास.

गोळी. अत्यंत धातुस्तंभक व पौष्टिक १ दिवसांत गुण दाखविते, किं० २ आणे "४ गोळ्या" दंतमंजन— ३ दिवसांत गुण किं० २ आणे. विंचवावर प्रतिज्ञेचें औषध क० ८ मनुष्या पुरत्या औषधाची ३ आणे. नेत्रांजन— डोळ्याचे विकारावर— साधारण लाली, खुपरी, पाणिगळणे, आग यावर किं० २ आणे. दम्यावर— प्रतिज्ञेनें १ दिवसांत गुण देणारे व ७ दिवसांत पूर्ण फायदा देणारे औषध किं० ४ आणे. शीत पित्तामुळें आंगावर गांधी व खाज अतिशय येत त्यावर ३ दिवसांत गुण देणारे किं० २ आणे. उपदंशरिपु— प्रमेह, उपदंश यावर ३ दिवसांत फायदा व ७ दिवसांत पूर्ण गुण देणारे औषध किं० १ रुपया दिलबहार— सुपारी— १ चिमटी विड्यांत घेतांच, अजिर्ण, अमांश यांचा नाश होऊन झाडा साफ होतो, भूक खुलते किं० १ आणा, तंबाखु रंजनवटी— अत्यंत सुवासीक व कडक तंबाखुची गोळी २० किं० २ आणे. निदान ८ आण्याचा माल मागवावा. व्ही पी. ने पाठवूं.

**मुळे एन्ड सन्स नांदुरा.**

नो० नं० ९

## नोटीशीचे दर

**दर ओळीस दीड आणा.**
**हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.**
**नोटीस सुवाच्य असली पाहिजे.**

**सूचनाः**— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. यापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

---

### विक्रीस तयार

आमचे छापखान्यांत दरखास्तीचे, वकील पत्राचे, परत भरल्याचे, लिस्टफार्म पर्च्यांचे व नकलेकारितां करावयाच्या अर्जांचे नमूने छापून तयार आहेत. ते आमचे छापखान्यांत कोणत्याही वेळीं विकत मिळतील.

वऱ्हाडसमाचार कार्यालय, सदाशिवाश्रम, आकोलें } मॅनेजर

### जाहीर नोटीस

विद्यमान सीनिअर सबजज्ज साहेब कोर्ट आकोला.

कि. दि. मु. नंबर ६ सन १९१५

अर्जदार.

नागम्मा भ्रतार नारायण स्वामी पिले क्षात्रिय रा. ताजनापेठ आकोला.

सर्व लोकांस जाहिर करण्यांत येते कीं, मय्यत नारायण स्वामी सभापती पिले, हा तारीख २०।९।१९१४ इसवी रोजीं मु. आकोला ताजनापेठ ता. व जि. आकोला येथें मयत झाला आहे. त्याची वारसीवा नात्यानें मयताची बायको अर्जदार नागम्मा हिनें वारसाचे सर्टिफिकिट मिळणेंकरितां आमचे कोर्टांत तारीख २७-४-१९१५ इसवी रोजी अर्ज दिला आहे. त्याचा चौकशीची तारीख २४-७-१९१५ इसवीची नेमली आहे. तरी त्याचे विरुद्ध ज्यांची कांहीं तक्रार असेल, त्यांनीं नेमल्या तारखेस कोर्टांत हजर व्हावे ता. १३-७-१५

Sd/ D. K, Kolatker.
सीनीअर सबजज्ज आकोला.

नो. नं २९०

### जाहीर नोटीस

रा. रा. चंद्रभान वा नरसाजी शिवरकार रा. केळी पो. केळी ता. आकोट

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून या जाहिर नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, तुह्मी मौजे केळी येथील घर धाव्याचे पुंडलीक वा भोनाजी जयसने रा. वैराट यांजपासून रक्कम रु. १०० ला विकत घेतलें. सदहु घर पुंडलीक यानें श्रावण परशराम शिवरकार यांजपासून विकत घेतले. या दोन्ही खरेदीखतांत पूर्व कडील भिंत दक्षिण उत्तर हात ३९ लांब माझे मालकीचे असून वरील दोन्ही इसमांनीं तुमचे आणि माझे मध्यें

तंटा लाऊन देण्यासाठीं जबरदस्तीनें खरेदीखत सामील केलें आहे. या साठीं तुह्मास या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, या नोटिशीचे आधारें कळवितो कीं, तुह्मी वरील भिंतीवर कांहीं इमला वगैरे करू नये. तिजवर माझा इमला असून वळचण तुमचेकडे आली आहे. जर तुह्मास असे वाटत असेल तर तुह्मी खरीदी वरून दावा करून भींत तुमचे मालकीची करून घ्यावी. ही नोटिस दिली. मुक्काम आकोला ता. १०।७।१९१५

सही

शिवराम वा। रघुजी अज्ञान पालन करणार रंजाजी वा। लक्ष्मण नि. खुद रा. पो. केळी ता० आकोट

नो. नं. २८५

## नोटीस.

जाहिर नोटिस खालीं सही करणार देविदासराव सदाशिवराव मराठे देशमुख रा. आंबोड प्र. माहूर ता. पुसद

यांचेकडून:—

जाहिर करण्यांत येते कीं, माझे तिर्थरूप सदाशिवराव आप्पाजीराव देशमूख मरठे यांचे वय साठ ६० वर्षांचे झाले असून सरासरी अडीच वर्षांपासून त्यांची बुद्धी भ्रमिष्ट होऊन ते वेडे झाले आहेत. त्यांची बुद्धी जाग्यावर नाहीं. करितां त्यांच्याशीं कोणी देव घेवीचा व्यवहार मुळींच करू नये. त्यास कोणी कर्ज देऊं नये. व त्याचेपासून कोणत्याही प्रकारचा लेख लिहून घेऊ नये. त्यास कोणी कर्ज दिले तर त्या कर्जाबद्दल आमची इस्टेट आणि वारस जबाबदार होणार नाहींत. इस्टेट आमचे ताब्यांत आहे. करितां या नोटिशीनें सर्वत्र लोकांस कळविले आहे. दस्तुर गोविंद सटवाजी अर्जनवीस पुसद

सही

देविदास सदाशिव पा. राहणार आंबोडा दस्तुर खुद

नो. नं. २८६

## नोटीस

नोटीस बेशमी विठ्या वल्द माऱ्या परधान रा० धानोर (पोलीस स्टेशनचे) प्र० कायर ता० वणी जि० यवतमाळ पो० वणी.

यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटीसीनें कळविण्यांत येते कीं मी तुमची लग्नाची बायको असून पाटाचे बायकोचे नादानें तुह्मी मला दोन तीन वेळ बेदम मारहाण केली व सन १९१४ चे शिवरात्रीचे सुमारास घरांतून काढून लाविले त्यास आज सुमारें सोळा सतरा महिने झाले. तेव्हां पासून मी आपले आई बापाचे गांवीं आहे. घरांतून काढून लाविल्या पासून तुह्मी माझे पोटा पाण्याची व चोळी बांगडीची वगैरे कांहींच व्यवस्था न केल्यामुळे मला कर्ज काढून माझे पोट पाण्याची व चोळी बांगडीची तजवीज करावी लागली व लागत आहे. मला सावकाराचे १२५ एकशेंपंचवीस रुपये कर्ज झालें आहे. मला दरमहा रुपये सात प्रमाणें खर्च लागतो. सवतीचा जाच (त्रास) होणार नाहीं अशी तुह्मी हमी घेतल्यास व तिच्या नादानें मारहाण न केल्यास मी तुमच्या घरीं नांदण्यास तयार आहे.

ही नोटीस पावल्या पासून १५ पंधरा दिवसाचे आंत माझें कर्ज रुपये १२५ ची फेड करावी व वरील शर्तीवर तुह्मी मजशीं वागण्यास तयार असल्यास मला घेऊन जावें. माझें कर्जाची फेड केल्या शिवाय मी येणार नाहीं तसें तुमचे हातून होत नसल्यास माझें कर्जाची फेड करावी व दरमहा रुपये ७ सांत प्रमाणें देण्याचें कबूल करावें याप्रमाणें न केल्यास ही नोटीस सोडचिठ्ठी समजून माझे जातीतील रिवाजा प्रमाणें मी दुसरा पाटाचा नवरा करीन मग माझेवर तुमचा कोणतेही प्रकारचा हक्क राहणार नाहीं कळावें. ता०. १३।६।१९१५ इ. दस्तुर वामन गोपाळ अर्जनवीस रा. पांढरकवडा.

सही.

सहीची नि॥ राधी उर्फ रमी मर्द विठ्या जात परधान इचे हातची बांगडी असे राहणार कमळवेली प्रं० बोरी ता० वणी जि० यवतमाळ दस्तुर लिहिणार.

नो० नं० २८७

## जाहीर नोटीस

मी खालीं सही करणार इजकडून सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं, आह्मी ता २७ जून सन १९१२ इ. रोजीं आमचे तर्फे आमची सर्व प्रकारची दिवाणी फौजदारी मुलकी व इतर शेतीचे कौलपट्टे वगैरे करून घेण्यास व दुसरे रिणको लोकांचे दस्तैवज करून घेण्यास या शिवाय इतर चिल्हर कामें आमचे तर्फे करण्यास आह्मी वरील तारखेस बाजीराव गोविंद मराठे रा. रिसोड यांस कुलमुखत्यार नेमले होते. तरी कांहीं कारणास्तव सदरहु इसमाचे कुलमुखत्यारपत्र आह्मी आज तारखे पासून रद्द केले आहे. तरी आज तारखे पासून सदरहु इसमानी आमचे नांवानीं आमचे सहीचे कोणतेच प्रकारचे कागद पत्र करून दिल्यास किंवा करून घेतल्यास आह्मी कोणतेच प्रकारचे जबाबदार नाहीं. हे या नोटिशीवरून सर्वत्र लोकांस जाहीर करण्यात येत आहे. क. ता. १०।७।१९१५ इ.

सही

चंद्रभागाबाई जवजे खंडेराव देशमूख यांचे हातची नि. आंगठा दस्तुर धोंडु तुळशीराम रिसोडकर

नो. नं. २८८

## नोटीस

नोटिस बेशमी तोली मर्द कृष्णाजी फलके कुणबी रा. पळसोद ता. आकोट

ईसः—

नोटिस देणार निंबाजी वा। रंभाजी कुणबी आरोडे रा. पळसोद नोटिस देतो ऐसाजे आह्मी तुह्मास ता. ३०।६।१५ रोजीं नोटिस दिली आहे. त्यांत प्रामीसरी नोट व पावती लिहून घेतल्याची व फक्त १०० रुपये भरणा दिल्याची ता. १६।६।१५ दिली आहे. ती तारीख चुकीनें लिहीली गेली. भरण्याची व नोट पावती लिहील्याची ता. १९।६।१५ ही आहे. बाकी मजकुर पहीले नोटिशींत दर्शविला आहे, त्याप्रमाणें भरण्याचे राहिलेंले रु. ४५० आह्मास ८ दिवसांत देऊन आपला लेख खरा करून घ्यावा. ही नोटिस दिली. ता. ८।७।१५ इ. दस्तुर नारायण वामन रा. आकोला

सही

निंबाजी वा। रंभाजी आरोडे कुणबी रा. पळसोद नि. खु. असे

नो. नं. २८९

## नोटीस

कि. दि. मु नं. १० सन १९१५

विद्यमान सिनीयर सबजज साहेब बहादूर कोर्ट आकोला

अर्जदार

सिताई मर्द रावजी राहणार सावरगांव ता. आकोट

सर्वत्र लोकांस जाहिर करण्यांत येते कीं, मयत बाबुजी वा। नारायणजी हा माहे नोव्हेंबर सन १९१२ मध्यें आकोट येथें मयत झाला आहे. त्याचे वारस या नात्यानें अर्जदार सिताई इनें वारसाचे सर्टिफिकीट मिळण्या करितां आमचे कोर्टांत ता. १२ ५·१५ इ॥ रोजीं अर्ज दिला आहे. त्याची चौकशीची ता. ४-९·१५ इ॥ रोजीं नेमली आहे. तरी त्याचे विरुद्ध ज्याची कांहीं तक्रार असल्यास नेमलेल्या तारखेस कोर्टांत हजर व्हावें. कळावें. तारीख ९ ७·१५

Sd/ D. K, Kolatker.
सीनीअर सबजज आकोला.

नो. नं. २९०

## जाहीर नोटीस

खालीं सही करणार याजकडून सर्वत्र लोकांस जाहीर नोटीस देण्यांत येते कीं धनको ठाकुरदास चुनीलाल राहणार बाळापूर तालुके मजकूर जिल्हा आकोला रिणको गोपाळ सदाशीवराव जाहागीरदार मुक्काम टुनकी जाहागीर तालुके जळगांव जिल्हा बुलढाना रकम रुपये ८९१ ता. २२।६।१३ ची लिहिलेली प्रामेसरीनोट तारीख ११·७ १५ रोजीं धनकोचे खिशातून गाहाळ झाली आहे तरी सदरहू नोटीसीनें कळविण्यांत येते कीं सदरहू नोट कोणास सापडेलतर त्यांनीं बाळापूरास आणून द्यावी त्यास आह्मी बक्षीस २५ पंचवीस रुपये देऊं कळावें.

सही.

ठकुरदास चुनीलाल तर्फे झबुलाल तेजुलाल गुजराथी बाळापूर द. खुद.

नो० नं० २९१

## नोटीस

नोटीस बेशमी बक्षीराम रोडमल दु॥ आकोला मा० वहिवाटदार गजाधर रोडमल मारवाडी रा० आकोला ता। आकोला.

यांसः—

खालीं सही करणार याजकडून या नोटीसीनें तुह्मांस कळविण्यांत येते कीं दुसरे सावकार लोकांचे कर्जाचे धास्तीनें तुह्मीं माझ भरवशाचे गृहस्थ समजून व तुमचे सल्यानें व तुमचे सांगण्यावरून तुमचे नांवानें मी माझे मालकीचें जिनगीचे पोकळ खरेदीखत रकम रुपये दोनहजाराचे तारीख २५।३।१५ इसवी रोजीं लिहून त्याजवर सही करून तुमचे जवळ ठेविलें आहे व तुह्मी मजला करारनामा तुमचे मतानें लिहून दिला आहे तो माझे जवळ आहे. खरीदीखत तुमचे हातीं असल्यावर तुमचे मनांत बेमानी आली आहे तरी वरील पोकळ खरीदीखत नोंदण्याकरितां तुह्मी दखल करून दावा आखरयास मी अगर माझी जिनगी जबाबदार नाहीं. आठदिवसांचे आंत मजला वरील खरीदीखत देऊन पावती घ्यावी व करारनामा घेऊन मजला पवती द्यावी कळावें तारीख. १४·७-१९१५ इ.

सही.

१ यशवंता वा॥ वनसींग दस्तुर खुद राहणार बडद तालुक आकोला.

नो० नं० २९२

## नोटीस

नोटीस बेशमी जनार्धन बाळकृष्ण निंबारमुंडे रा० कारंजा.

यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस येते कीं तूमच कजबे काळी उर्फ कारंजा येथील शेत स. नं. १६० एकर ३ गुंठे ४ आकार रु० ६ चे ता० ६।६।१९१३ चे राजिष्टर झालेले कबुलायती वरून पांच ५ वर्ष पर्यंत माझ्या ताब्यांत आहे. परंतु मजला कांहींच माहीत न करितां परभारे विकले. हल्लीं ते शेत विकल्याबद्दल तुह्मी ता. १२।४।१५ चे वऱ्हाड-समाचारांत नोटीस दिली परंतु शेत विकण्याचे अगोदर सदरहू शेतांतील हद्दींत (मध्यभागीं) तुह्मी रामधुनी याचे थडगे बांधण्यास परवानगी दिली त्यावेळीं माझ्या पिकाचे नुकसान झालें आहे व त्या समाधी मुळें शेतांतील बरीच जमीन पडीत सोडणें भाग पडलें आहे. माझीं पांच ५ वर्षें पुरे होई पर्यंत अशी भानगड करून माझी नुकसानी करण्याचे तुह्मास कांहींच प्रयोजन नव्हते. आमच्याशीं तंटा करून थडगे बांधल्याबद्दल आह्मास फिर्याद करावी लागली. त्यास लागलेला खर्च व नुकसानी देण्याबद्दल निकाल करण्याचे कबूल केले होते व शिवाय पांच ५ वर्षांचा सारा ही देऊं नका असें आह्मांस सांगितले होते व त्या प्रमाणें मी तुमचे भरंवशांवर राहिलो हल्लीं सदरहू शेताचे खरेदीखत करून व नोटीस देऊन तुह्मी जबाबदारींतून मुक्त होऊं पहातां परंतु याबद्दलची जबाबदारी तुमचेवर आहे. याचा आपसांत लवकरच निकाल करा नाहींतर याबद्दल तुमचेवर योग्य कोर्टांत नुकसानी बद्दल लवकरच दावा लाविला जाईल. ता० २९।६।१९१५

सही.

महमद उसमान वा॥ शेकचांद झारेकर. द. खु. कारंजा

नो० नं० २९३

## वर्गणीदारांस आगत्याची सूचना.

वर्गणीदारांकडे वर्गणीची मागील बाकी बरीच सांचली आहे. ती त्वरित पाठवून देण्याविषयीं टपालमार्गें विनंतिपत्रें पाठविलीं जात आहेत. कृपाकरून वर्गणीदारांनीं तगादा करण्यास अगर व्ही. पी. करण्यास भाग पाडूं नये हें त्यांस आमचें आगत्याचें सांगणें आहे. हल्लीं सर्वांस लढाईमुळें पैशाची तंगी असणें स्वाभाविक आहे हें आह्मीं जाणून आहोंत परंतु त्याच कारणास्तव आह्मा वर्तमानपत्रकारांच्याही अडचणी द्विगुणित झाल्या आहेत. ही गोष्ट लक्षांत घेऊन वर्गणी पाठवून देण्याविषयींच्या विनंतिपत्राचा अव्हेर होणार नाहीं अशी बळकट आशा आहे.

म्यानेजर.

वऱ्हाडसमाचार

मित्ती आषाढ शु॥ ८ शके १८३७

## रंगद्रव्यें.

सध्याच्या युद्धामुळें ज्या अनेक गोष्टी संबधानें आमच्या डोळ्यांत चांगलें चरचरीत अंजन पडलें आहे त्यांतली एक मुख्य गोष्ट ह्मणजे औद्योगिक उत्कर्षास परावलंबित्वानें होणाऱ्या अडथळ्याचा अनुभव ही आहे. इतके दिवस आह्मी अशा भ्रमांत होतों कीं आमच्या देशांतल्या कापडाच्या गिरण्यांची वाढती संख्या पाहून त्यांकाशायरचे कारखानदार कितीही जागचे जागीं चरफडले किंवा त्यांनीं आमचा हा धंदा ठार मारून टाकण्यासाठीं कितीही निरनिराळ्या दिशांनीं प्रयत्न केले ह्मणून काय झालें? आह्मी जपान किंवा जर्मनी यासारख्या स्वस्त माल विकणाऱ्या राष्ट्रांकडून आमच्या कारखान्यांस लागणारीं यंत्रें किंवा द्रव्यें आणून म्यांचेस्टरवाल्याशीं टक्कर देत राहूं. पण हा भ्रमाचा भोपळा सांप्रतच्या युद्धानें चांगला फोडला आहे. युद्धामुळें जर्मनींतून रंगद्रव्यें येण्याचें बंद झाल्याबरोबर आमच्या इकडे रंगीत कापड काढणारे कारखान्यांवर वज्राघात होऊन ते अगदीं बसले आहेत. थोड्या फार अंशानें इतर ही पुष्कळ बाबतींत आह्मांला असाच अनुभव आला आहे. उदाहरणार्थ स्टेशनरीपैकीं जो माल केवळ जर्मनी किंवा आस्ट्रिया यांच्याकडूनच पुरविला जात असे, तो आतां बाजारांत मिळत नाहीं, किंवा मिळालाच तर फार महाग विकतो. आमच्या देशांतल्या कित्येक कागदाच्या गिरण्या इकडे स्वस्त कागद काढतां यावा ह्मणून आस्ट्रियांतून कागदाचा लगदा आणून त्याचा कागद काढून तो स्वदेशी कागद या नांवाखालीं विकीत असत. तो त्यांचा धंदा आतां अजीबात बसला आहे. रबर, शिसपेनासिली, साखर, वगैरे बाबतींत हच कडु अनुभव आलेला आहे. सारांश, आमची दोहीकडून फजीती आहे. पूर्वींच्या आमच्या लोकांच्या जुन्या पद्धती आह्मी विसरून गेलों आहों, आणि ज्याच्या भरंवशावर आह्मी आमच्या जुन्या पद्धती सोडल्या, त्यांनीं ही आह्मांस यावेळीं दगा दिला. कापड रंगविण्याच्याचें संबंधाचें उदाहरण घ्याना? पूर्वीं आमच्या देशाची उत्कृष्ट रंग तयार करण्याविषयींची ख्याति होती. आमच्या इकडचे रंग उत्तम भपकेदार असून पक्के असत. पण नकली कच्च्या रंगांनीं आमचा सगळा बाजार पादाक्रांत करून लोकांची रुचि बिघडवून टाकिल्यामुळें आमचे रंगारी सर्वस्वी जर्मनीहून येणाऱ्या रंगावर अवलंबून राहूं लागले. पूर्वीं आमच्या देशांत कोणत्या द्रव्यापासून कोणते रंग कोणत्या पद्धतीनें काढीत असत याचें ज्ञान ही त्यांना राहिलें नाहीं. तें राहिलें असतें तर सध्याच्या काळीं जर्मन रंगाच्या दुर्भिक्षतेमुळें आमच्या कारखान्यावर ओढवलेला प्रसंग अजिबात टळला नसता, तरी थोड्या फार अंशानें तरी आह्मी वर मान काढून चाललों असतों. आपल्या देशांत रंगद्रव्यें नाहींत असें नाहीं. तीं हव्या त्या प्रांतांत मुबलग मिळणारीं आहेत. मात्र त्याच्यापासून रंग काढण्याच्या अनुभवसिद्ध पद्धतीची ओळख आमचे लोक विसरले आहेत. अशावेळीं आमच्यांतले जे कोणी अनुभवी वृद्ध लोक पूर्वींच्या पद्धतीशीं परिचित असलेले विद्यमान असतील त्यांचें हें कर्तव्य आहे कीं त्यांनीं या वेळीं पुढें येऊन आपल्या ज्ञानाचा फायदा आपल्या बुडत्या देशबांधवांस देऊन त्यांचा उद्धार करावा.

आपल्या देशांतलीं ठळक रंगद्रव्यें ह्मणजे हळद, पळसाचीं फुलें, कुसुंबा, हिरडा, नीळ वगैरे होत. यांच्या संबंधाची अगदींच त्रोटक अशी थोडीशी माहिती ह्मैसूरच्या एकॉनामिक जर्नल नांवाच्या मासिकानें मेच्या अंकांत दिली आहे. ती समयोचित आहे; पण याहून अधिक विस्तृत अनुभवसिद्ध माहिती पुढें येणें अवश्य आहे. ह्मैसूरच्या मासिकांत दिलेली माहिती सामान्यतः अशी आहे. हळदीचा रंग पक्का करण्यास कांहीं दुसऱ्या पदार्थाची मध्यस्थी लागत नाहीं. तो स्वतः सिद्ध पक्का असतो. उकळत्या पाण्यापेक्षां कोमट पाण्यांत केलेला हळदीचा रंग अधिक झळकदार व टिकाऊ असतो. मात्र तो करतेवेळीं त्यांत थोडी तुरटी घालावी लागते. कुसुंब्यांत एक पिंवळें व एक तांबडें अशीं दोन रंगद्रव्यें असतात. पैकीं दुसरें खरें रंगद्रव्य असतें. कुसुंब्याचीं फुलें प्रथम थंडपाण्यांत चांगलीं धुवावीं लागतात. धुतल्यानंतर हीं फुलें आल्कलाईन मिश्रित पाण्यांत उकळलीं ह्मणजे तांबडा रंग निघून येतो. ज्या कपड्यावर रंग चढविणें असेल तो प्रथम या रंगांत कांहीं वेळ बुडवून ठेवून नंतर काढावा, आणि मग या रंगांत थोडें टार्टारिक आसिड घालून त्यांत पुन्हा तो कपडा बुचकळावा ह्मणजे झळकदार असा रंग कपड्यावर चढतो. हिरड्यांत टानिन आसिड असतें. हें रंगाचे कामीं फार उपयोगी आहे. छिंटें रंगविण्याच्या कामीं हिरड्यापासून तयार केलेला रंग फार उत्तम व सोयीचा ठरला आहे. पळसाच्या पानांचा रंग अल्प श्रमानें व अल्प खर्चानें तयार होणारा आहे. सह्याद्रीच्या घाटांत पळसाचीं फुलें विपुल आहेत. तीं वेचून आणण्याचे कामीं डोंगरांत वस्ती करून राहणारे लोकांना लाविलें तर त्यांचें पोट भरून रंगाच्या कारखान्याची ही चांगली सोय होईल. फणसाच्या झाडाचे खोडापासून पिंवळा रंग प्रथम तयार होतो. पण तेंच खोड कापल्यानंतर कांहीं दिवस तसेंच राहूं दिलें तर त्यापासून तांबडा रंग निघतो. लाख हें एक चांगलें रंगद्रव्य आहे. लोकरीचें किंवा रेशमी कापड रंगविण्यास या द्रव्याचा चांगला उपयोग होतो. पूर्वींच्या काळीं चंदनाचे खोडापासून ही तांबडा रंग काढीत असत अशी माहिती मिळते. सारांश काय. तर शोधक बुद्धीनें काम करणारास अजून ही पुष्कळ माहिती मिळं शकेल.

ही माहिती मिळविण्याचीं उत्कृष्ट साधनें आमच्या देशी संस्थानिकांपाशीं आहेत. त्यांनीं जागजागच्या आपल्या स्थानिक कामदारांस सक्युलरें पाठवून रंगद्रव्यांबद्दलची व रंग करण्याच्या कृताची माहिती जुन्या रहिवाशांकडून मिळविण्याविषयीं हुकुम सोडले पाहिजेत; व ही माहिती गोळा करून तिच्यांत निवड करण्याचें तिच्या सत्यत्वाबद्दल खात्री करून घेण्याचें व त्यामाहिती प्रमाणें प्रयोग करून पाहण्याचें काम एक दोन हुशार कामदाराकडे सोपविलें पाहिजे. ह्मणजे वर्षा— सहा महिन्यांत हवी तेवढी माहिती उपलब्ध होईल. पण आमचे संस्थानिक बहुधा स्वतःच्या चैनीखातर महाबळेश्वर, माथेरान, नीलगिरि वगैरे ठिकाणीं पडलेले असावयाचे; आणि तेथें ही साहेबांच्या नाचाला बेळेवर हजर राहणें हें जणूं काय आपलें आद्यकर्तव्य, प्रजाहित हें मुख्य कर्तव्य नव्हे, अशा तऱ्हेचें वर्तन ठेवणारे संस्थानिकच फार. ब्रिटिशसरकारनें ग्याझिटियर तयार करतांना कसकशी माहिती मिळविली त्या पद्धतीचें अनुकरण करून व कांहीं सुधारणा करून नुसत्या रंगद्रव्यासंबंधानेंच काय, पण भाषा, लोकरीती, इतिहास, उपजीविकेचीं साधनें, उद्योगधंद्यांस लागणारा कच्चा माल, वगैरे शेकडों गोष्टीं संबंधाचीं इत्थंभूत माहिती मिळविणारें एक स्वतंत्र खातेंच काढून अशी माहिती गोळा केली व ती पुढें एखाद्या उत्तम शास्त्रज्ञाकडून प्रयोगांनीं तपासून पाहून त्यावरून आपल्या संस्थानांत चालवितां येण्यासारखा उद्योगधंद्यांना उत्तेजन देण्याचा परिपाठ घातला, तर ही कामगिरी त्यांना व त्यांच्या प्रजेला केवढी श्रेयस्कर होईल? पण अशीं कामें करणारे किती संस्थानिक आमच्या देशांत आहेत? मोटारगाड्यांतून हिंडणें, चहापार्ट्या व नाचगाणें, तमासे, वगैरेंत संपत्तीचा व बहुमोल आयुष्याचा अपव्यय करणें. प्रजेनें अतिशय कष्टानें मिळविलेल्या धनराशी आपल्या प्रियपात्रांस लुटवून देणें हीं जणूं काय आमच्यांतल्या कित्येक संस्थानिकांचीं मुख्य कर्तव्यें होऊन बसलीं आहेत! या महत्वाच्या कार्यापुढें प्रजेच्या खऱ्या हिताच्या गोष्टी करण्यास त्यांना फुरसत कोठें आहे! काय ही आमची शोचनीय स्थिति!

## प्रागतिक पक्षाचा विजय.

१९०७ सालीं सुरत येथें कांग्रेसमध्यें दुफळी होऊन जहालपक्ष कांग्रेसच्या घरट्यांतून बाहेर पडला, तो दिवस कांग्रेसच्याच नव्हे तर एकंदर इतिहासांत अत्यंत महत्त्वाचा कीं त्या दुर्दैवाच्या प्रसंगाच्या नि... कांग्रेसला नियमबद्धता आली, आणि राष्ट्रीयकार्याकारितां स्वतःला नियमांनीं बांधून घेण्यास आणि शिस्तीनें वागण्यास तयार आहेत अशांचा एक स्वतंत्र व सुव्यवस्थित संघ तयार होऊन तो कसल्या ही अडचणींना न जुमानतां राष्ट्रीय कार्याच्या उद्योगाला लागला. सुरत कांग्रेसमुळें दिखाऊ एकीपेक्षां उघड बेकी झालेली बरी असें ही प्रत्ययास आलें. कारण, त्या दिवसापासूनच क्रीडवाल्या व नियमबद्ध कांग्रेसचें वजन सरकारपाशीं वाढलें व प्रागतिक पक्षाला सरकारशीं सहकारित्व ठेवून राष्ट्रीय हितसाधनाच्या कामांत यशः प्राप्ति होऊं लागली. सुरत कांग्रेसपर्यंत सरकारची कांग्रेसाविषयींची भलतीच समजूत होती. तें तिच्याकडे शंकायुक्त दृष्टीनें पाहत असे. कांग्रेस ही संस्था सर्व जातीच्या व पंथाच्या लोकांच्या प्रातिनिधींची अर्थात बहुमतानिदर्शक आहे ही गोष्ट तों पर्यंत कोणाही जबाबदार राजपुरुषानें मान्य केली नव्हती. पण कांग्रेसला सोडून कांहीं एका विशिष्ट पक्षांतली मंडळी दूर होतांच सरकारचें शंकानिरसन झालें. कांग्रेसचें ग्रहण दूर झालें. तिला राजमान्यता प्राप्त झाली. तिच्या मागण्यांचा विचार निर्विकार दृष्टीनें सरकारांत होऊं लागला. आणि प्रागतिक राष्ट्रीयपक्षाचें पाऊल त्याच्या कार्यांत पुढें पडून त्याला एकेक नवा विजय संपादतां आला. परवाच्या पुण्याच्या पंधराव्या प्रांतिकपरिषदेला तेथील खुद्द गवर्नरसाहेब व मोठे छोटे सरकारी अधिकारी हजर राहिले, व ना. गव्हर्नर साहेबांनीं लहानसें भाषण करून हिंदी लोकांची राजनिष्ठा व प्रांतिक परिषदेचें लोकप्रतिनिधित्व या दोन गोष्टी अगदीं स्पष्टपणें कबूल केल्या. आमच्या मतें प्रागतिक पक्षानें हा एक मोठा विजयच संपादला आहे. हा विजय संपादलेला पाहण्यास ना. गोखले आज हयात नाहींत. ही अत्यंत शोचनीय गोष्ट आहे. तथापि पुण्याच्या प्रांतिक परिषदेभोंवती संचार करणाऱ्या त्यांच्या आत्म्याला जर श्रवणशक्ति असेल तर ना. गव्हर्नर साहेबांची वरील उक्ति एकून त्याची खास तृप्ति झाली असेल. या प्रांतिक परिषदेचा जहाल पक्षाकडून निष्कारण नानाप्रकारें छळ झाला. क्रीडवाल्यांना लोकमताचा पाठिंबा नाहीं. तो नाहींच, पण मि० दादाभाई नौरोजी व सर फेरोजशहा मेथा यांची ही सहानुभूति नाहीं. या परिषदेला शेपंनासावर कोणी लोक जाणार नाहींत. त्यांची फजीती व्हावयाची हें निश्चित आहे, अशा खोट्या वदंता या जहालपक्षांतल्या कित्येक वर्तमानपत्रांनीं अगोदर पसरून आपली कुटिलता आणि दुर्वासना यांचें प्रदर्शन केलें होतें. पण सगळा प्रकार उलटा झाला. निंदकांचे दांत पडले. आणि प्रागतिक क्रीड— पक्षाला अभिमानानें वर छाती करून चालण्याइतकें यश परिषदेच्या या अधिवेशनाला आलें. क्रीडपक्ष भयंकर दीव्यांतून यशस्वी होऊन बाहेर आल्याबद्दल कोणता खरा हिंद— पुत्र त्याचें अभिनंदन करणार नाहीं?

ची वाट ४ आणें. ... आत ३ बंगाल ३३, संयुक्तप्रांत ३, ४३, व मुंबई २९. ...साच्या वर्तनांत नाहीं.

## ...रिभाऊ आपटे.

... नारायण आपटे यांच्या लेख- ... मराठी ग्रंथरचनेच्या कामीं अप्रतिम यश प्राप्त झालें असून ते आतां राजकीय भानगडींत पडल्यामुळें मराठी वाचक त्यांच्या हातच्या ओजस्वी कादंबऱ्यांना व मार्मिक वाङ्मयात्मक लेखांना अंतरत चालला आहे असें प्रामाणिकपणानें समजून हळहळणारांपैकीं आह्मी एक होतों. पण परवाच्या पुण्याच्या पंधराव्या प्रांतिक परिषदेच्या वेळचें त्यांचें स्वागतपर भाषण वाचून आह्मांस असें वाटूं लागलें आहे कीं महाराष्ट्र वाङ्मयाची हानि राजकीय पक्षाच्या मजबुतीनें बऱ्याच अंशी भरून निघेल. ना. गोखले यांच्या अकालिक मरणानंतर पुण्यास तरुण मंडळीचें नेतृत्व स्वीकारण्यास व गोखल्यांचें कार्य त्यांच्याच पाऊलवाटेनें नेटानें करण्यास कोणी तरी तरुण व उत्साही पुढारी पुढें यावयास पाहिजे होता. ही उणीव रा. हरिभाऊ आपटे आतां चांगल्या प्रकारें भरून काढतील अशी उमेद वाटते. रा. हरीभाऊंचें भाषण मर्यादशील, पण तत्वनिष्ट, आणि विवेकयुक्त आवेश यांनीं परिपूर्ण होतें. रा. हरिभाऊंची जी आह्मांस माहिती आहे तिजवरून त्यांनीं राजकीय रंगभूमीवर केलेला हा प्रथम प्रवेश त्यांच्या भावी यशप्राप्तीचें पूर्ण प्रसादचिन्ह आहे असें आह्मी समजतों, आणि त्याबद्दल त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करतों.

## यंदाच्या कांग्रेसचे अध्यक्ष.

यंदाच्या कांग्रेसला अद्याप पांच महिन्यांचा अवकाश आहे तों इतक्यांतच मुंबईच्या कांग्रेस कमिटीनें ठिकठिकाणच्या कांग्रेस कमिट्यांचीं मतें विचारून कलकत्याचे सुप्रसिद्ध ब्यारिस्टर, ॲडव्होकेट जनरल व व्हाईसराय साहेबाच्या कौंसिलाचे माजी लॉ–मेंबर सर एस. पी. सिंह यांची कांग्रेसच्या अध्यक्षाचे जागीं योजना केली व या योजनेला सर एस. पी. सिंह यांची संमति ही मिळाली अशी बातमी आली आहे. ही बातमी कितपत यथार्थ आहे व या योजनेला कांग्रेस कमिट्यांची अनुकूलता बहुमतानें मिळाली होती किंवा काय तें आह्मांस माहित नाहीं. तथापि या दोन्ही गोष्टी खऱ्या असल्या तरी ही अध्यक्षाची योजना आमच्या दृष्टीनें योग्य झाली नाहीं असें आमचें प्रांजल मत आह्मी स्पष्टपणें सांगतों. सर साहेबांच्या विद्वत्तेविषयीं, कर्तृत्त्वाविषयीं, राजमान्यतेविषयीं किंवा देशाविषयींच्या कळकळीविषयीं आह्मांस शंका नाहीं. पण त्यांनीं आपल्या अंगच्या या चारी गुणांचा फायदा आजपर्यंत आमच्या राष्ट्राला कोणत्याही प्रकारें करून दिल्याचें दिसत नाहीं. त्यांचें जें देशकार्य दिसत आहे तें प्रेस आक्टासारख्या कायद्याचें पितृत्त्व त्यांनीं आपल्याकडे घेतलें व समकालीन सिव्हिल सर्विस परीक्षेला ते विरुद्ध आहेत या दोन रूपांनीं दिसत आहे. ज्या दोन गोष्टीसंबंधानें साऱ्या हिंदुस्थानांत लोकमत इतकें क्षुब्ध झालें आहे त्या महत्त्वाच्या बाबींसंबंधानें कांग्रेसच्या मताला सर्वस्वी विरुद्ध असणाऱ्या गृहस्थाची योजना अध्यक्षाचे जागीं करण्याइतकें दारिद्र्य कांग्रेसला आज प्राप्त झालें आहे असें आह्मांस तरी वाटत नाहीं. मद्रासचे सर सुब्रह्मण्यम् आयर, किंवा पंजाबचे लाला लजपतराय यांची योग्यता सर एस. पी. सिंह यांच्याहून रतिमात्र कमी नाहीं. व कांग्रेसला अडचणीच्या प्रसंगीं योग्य सल्ला देऊन व अनेक प्रकारें साह्य करून त्यांनीं त्या संस्थेच्या अध्यक्षाच्या जागेवर आपला हक्क पूर्णपणें शाबीत केला आहे. लाला लजपतराय यांची योजना अध्यक्षाचे जागीं होण्यानें पंजाबचा सकारण रुसवा ही घालवितां आला असता. पंजाबासंबंधानें मुंबईच्या कांग्रेसच्या पुढाऱ्यांत एवढा शिथिलपणा कां असावा तें आह्मांस कळत नाहीं. राष्ट्रकार्यांत आपलाच हेका चालविण्याची मुंबईकरांस लागलेली दुष्ट संवय एकंदरींत हानिकारक आहे असें ह्मटल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं.

## विजय महोत्सव.

गेल्या आठवड्यांतली चालू युद्धासंबंधाची अत्यंत महत्वाची गोष्ट ह्मणजे आफ्रिकेंत जनरल बोथा यांनीं जर्मन लोकांवर विजय संपादून सगळी आफ्रिका पादाक्रांत केली व युनिअन राज्याला जोडली ही होय. जर्मन लोक शूर खरे, पण बोथापुढें त्यांना अखेर मान वाकवावी लागली. या प्रसंगीं २०४ जर्मन आफिसर, ३४६६ इतर लष्कर, ६६ छोट्या तोफा व २२ जड यांत्रिक तोफा इंग्रजांच्या स्वाधीन झाल्या. बोथा यांनीं शरण आलेल्या जर्मन आफिसरांचा बहुमान ठेविला. त्यांना फक्त हाजिरी देण्यापुरतें बंधन ठेवून आफ्रिकेंत वाटेल तेथें राहण्याची व शस्त्रें बाळगण्याची परवानगी दिली. इतरांना मात्र नुसती नजर कैदेखालीं आपापल्या गांवीं जाऊन राहण्याची व रायफल बंदुका बाळगण्याची मोकळीक ठेविली. मात्र त्यांना दारूगोळा बाळगण्याची परवानगी दिली नाहीं. जनरल बोथा यांचा हा जंगी विजय ब्रिटिश राज्याच्या इतिहासांत सदैव नमूद केलेला राहील. कारण, या विजयानें आजच आफ्रिकेचा नकाशा बदलून टाकिला आहे. या ब्रिटिश विजयाबद्दल आनंदित होऊन बादशहांनीं व ब्रिटिश मुत्सद्यांनीं बोथा यांचें अभिनंदन केलें आहे. हिंदुस्थानांत ही मुंबई, कलकत्ता, दिल्ली, वगैरे मोठाल्या राजधान्यांतून सरकारचें निशाण उंच चढविण्यांत आलें होतें, व बडोदें, इंदूर, त्रावणकोर, वगैरे संस्थानांतून महोत्सव करण्यांत आले.

## दोहोंचाही अर्थ एकच.

प्रस्तुत युद्ध संपणार तरी कधीं? हा प्रश्न आतांपर्यंत लक्षावधि लोकांच्या ओंठावर आलेला आहे, पण या प्रश्नाचें उत्तर समर्पक रीतीनें देण्याचें सामर्थ्य एक सर्वज्ञ परमेश्वरास किंवा स्वतःस तत्तुल्य समजणाऱ्या जर्मन केसरास मात्र आहे. पैकीं केसर बादशहानें आपलें उत्तर देऊन टाकलें आहे. तें हें कीं प्रस्तुत युद्ध कोणत्याही कारणानें येत्या आक्टोबरच्या पलीकडे जाण्याचा रंग नाहीं. ह्मणजे आक्टोबरच्या आंत सोक्ष कीं मोक्ष करून घेण्याचा जर्मन बादशहाचा निश्चय आहे असें यावरून समजण्यास हरकत नाहीं. अर्थात् आक्टोबरपर्यंतचे हे तीन चार महिने अत्यंत आणीबाणीचे आहेत. लॉर्ड किचनेर यांनीं गिल्ड हॉल येथें केलेल्या भाषणांतून ही हाच अर्थ ध्वनित दिसतो. ते ह्मणाले कीं 'सध्याचा प्रसंग अतिशय गंभीर आहे. आणि ही सुसंधि आपणास साधून घेण्याचा पराकाष्ठेचा यत्न आतांच केला पाहिजे.' सूक्ष्म दृष्टीनें पाहणारास केसर व किचनेर या दोघांच्या ही भाषणांत एकच अर्थ भरलेला दिसून येईल, आणि तो कोणता तें वर सांगितलेंच आहे.

## गनीमी कावा.

मराठे लोक युद्धाचे वेळीं गनीमी कावा करीत ह्मणून कित्येक इंग्रज इतिहासकार त्यांना नामर्द ह्मणतात, पण हा गनीमी कावा आतां रशियासारख्या युरोपियन राष्ट्रांना युद्धाचे वेळीं फार उपयोगीं पडत आहे व रशिया या काव्यानें शत्रूला जेरीस आणीत आहे, ह्मणून अनेक लष्करी इंग्रज अंमलदार रशियाची पाठ थोपटीत आहेत. अलीकडे कित्येक वेळां रशिया मागें पाऊल घेत असल्याच्या तारा येतात यांतले इंगित या काव्यांतच आहे. जर्मनीच्या हल्यापुढें हार खाल्यासारखें दाखवून पळ काढावयाचा आणि ग्यालिशियामधील दलदलीचा आश्रय करून कांहीं वेळ राहावयाचें आणि जर्मन फौज दिखाऊ विजयानें शेफारून पाठलाग करीत अडचणीच्या जागीं आली ह्मणजे त्यांच्यावर तुटून पडून त्यांचा निःपात करावयाचा हें सध्यांचें रशियाचें लष्करी धोरण आहे. हें धोरण लक्षांत घेतलें ह्मणजे रशियाचें पाऊल अलीकडे कित्येक वेळां मागें पडल्याचें वर्तमान ऐकून वाचकांच्या मनाला जी उद्विग्नता कित्येक वेळां आलेली दिसते ती येण्याचें खरोखर कांहीं कारण नाहीं असें दिसून येईल.

---

दार्दानेल्सकडील युद्धाचा रंग सर्वथैव दोस्त राष्ट्रांना अनुकूळ असाच आहे. तुर्कलोक शौर्यानें लढत आहेत खरे, पण लढतांना आपण बाजू हरत आहों ही भावना तुर्क लोकांच्या मनांत सदा जागृत असते. कान्स्टांटिनोपल येथें तर लोकांचा असा ग्रह झालेला दिसतो कीं डाव बहुतेक संपल्यासारखाच आहे, व लवकरच लढणाऱ्या राष्ट्राकडून परस्पर घेणीं देणीं संबंधाच्या गोष्टी सुरू होतील. पश्चिमेकडील युद्धक्षेत्रांत जर्मनी डोळ्यापुढें दिसत असलेल्या भावी अधःपाताच्या चित्रानें कावराबावरा होऊन युक्तायुक्ततेचा विचार न करतां जिवावर उदार होऊन लढत असलेला दिसत आहे. विषारी वायूपासून आपला बचाव करण्याचीं साधनें दोस्त राष्ट्रांच्या फौजांनीं अमलांत आणून आपल्या युक्तीस निःसत्त्व करून टाकलेलें पाहून पूर्वीं पेक्षांही ज्यास्त विषारी व बचावाच्या साधनांस दाद न देणाऱ्या नवीन वायूचा प्रयोग जर्मन करूं लागले आहेत. ह्मणजे भौतिक शास्त्रीय ज्ञानाचा अधिकाधिक दुरुपयोग करून जर्मनी आपली विद्वत्ता, सुधारणा व माणुसकी यांना समाधि देण्याची अधिकाधिक तयारी करीत आहे. तरी बुडत्याचा पाय खोलांत अशी त्याची अवस्था आहे. इकडे आस्ट्रियाला इटलीनें पुरेपुरे करून सोडलें आहे. इटलीची युद्धाची तयारी इतकी जय्यत असेल अशी या पूर्वीं कोणास ही कल्पना झाली नसेल. जर्मनीचा अमेरिकेशीं जो पत्रव्यवहार चालला आहे तो पाहिला ह्मणजे जर्मनीच्या मुर्खपणाची व उद्धटपणाची तारीफ करावी कीं जर्मनीच्या सोशिकपणाची अधिक प्रशंसा करावी तेंच कळत नाहीं. अमेरिकन लोकांची स्वाभिमानाबद्दल जगांत प्रसिद्धि आहे. पण सध्याच्या पत्रव्यवहाराच्या स्वरूपावरून व मंद गतीवरून तो स्वाभिमान लुप्तप्राय झाल्यासारखाच दिसत आहे.

## शिवाजी उत्सवाचें अपत्य.

पुण्यास नुकताच जो श्रीशिवराज्याभिषेकोत्सव झाला त्यासंबंधाचें ता. ३ जुलैच्या 'इंदुप्रकाशांतलें' पुण्याच्या बातमीदाराचें पत्र विचार करण्यासारखें आहे. पुण्यास भारतेतिहास संशोधक मंडळी ह्मणून जी एक उत्तम संस्था अलीकडे स्थापित झाली आहे व जिनें उपयुक्त कार्यास प्रारंभ केल्यामुळें सर्व महाराष्ट्रीयांत तिच्या विषयीं आदर व सहानुभूति उत्पन्न होऊं लागली आहे तें शिवाजी–उत्सवाचेंच एक अपत्य आहे असें विधान रा. टिळक यांनीं या उत्सवाचें वेळीं केलें होतें. हें कितपत खरें आहे याचा खुलासा त्या संस्थेचे सेक्रेटरी सरदार मेहेंदळे यांनीं करणें अवश्य आहे. कारण कीं या विधानाला राजकीय महत्त्व आहे. संशोधक मंडळांत अनेक सरकारी नोकर व शिवाजीउत्सव ज्या रीतीनें आजपर्यंत साजरा होत आला तिच्याविषयीं अमान्यता बाळगणारे सभासद आहेत. हे मंडळ शिवाजी— उत्सवाचें अपत्य आहे ही गोष्ट खरी असेल तर त्यांना या संस्थेशीं आपला संबंध ठेवणें कदाचित् इष्ट वाटणार नाहीं, व तो चालू ठेवणें कदाचित् त्यांच्या व्यावहारिक हिताला बाधक ही होईल. वस्तुतः संशोधक मंडळासारख्या संस्था निर्लेप असणेंच श्रेयस्कर आहे. ह्मणून रा. टिळकांच्या या विधानांत कितीसें सत्य आहे, आणि मंडळाचा उत्सव कमिटीशीं कोणत्या प्रकारचा संबंध आहे याचा खुलासा सेक्रेटरी साहेब करतील तर बरें होईल.

## बिचारे विद्यार्थी !

गरीब बिचाऱ्या हिंदी विद्यार्थ्यांना वाईट ग्रहदशा आलेली दिसते. जिकडे पाहावें तिकडे शाळा व कॉलेजें यांतली संख्या मर्यादित केलेली. यामुळें या शिक्षणसंस्थांत प्रवेश होण्याचीच मुष्कील. प्रवेश एकदांचा झाल्यावर वारंवार बदलणारीं पुस्तकें व अभ्यासक्रम यांमुळें विद्यार्थी भांबावून जातात. नियतकालीक परीक्षेंत नापास झाल्यास शाळेंतून काढले जाण्याची किंवा खालच्या वर्गांत ढकलले जाण्याची भीती ! अभ्यास चांगला केला तरी म्याट्रिक परीक्षेंत परीक्षकांच्या लहरीला बळी पडण्याचें भय सुटत नाहीं ! सार्वजनिक सभांना जाण्याची व वर्तमानपत्रें वाचण्याची बंदी, क्रिकेट वगैरे खेळांचा नाद लागला तर परीक्षेंत नापास होण्याची धास्ती, बरें न खेळले तर धरकोंबड्या विद्यार्थ्यांवरचा कटाक्ष चुकतच नाहीं. अशा सर्वप्रकारें अडचणींत सांपडलेल्या विद्यार्थ्यांची कींव करावी तेवढी थोडी आहे ! या बिचाऱ्यांची जी यंदा म्याट्रिक वगैरे परीक्षांतून कत्तल झाली, तिजबद्दल युनिव्हर्सिटीकडे दाद

मागण्याची खटपट मात्र कोणी करीत नाहीं. मद्रासकडे मिसेस आनी बिझांट सारख्या परक्या बाईचें मन विद्यार्थ्यांची ही शोचनीय स्थिति पाहून कळवळावें, व तिनें हा विषय हातीं घेऊन लोकांना अधीर निरेतून जागे करण्याचा यत्न करावा, आणि मुलांच्या पालकांनीं स्वतः कांहीं एक हालचाल करूं नये हें किती शोचनीय आहे!

---

### लढाईच्या बातम्या.

पश्चिमेकडच्या रणक्षेत्रांत फ्रेंच लोक बरेच पुढें सरकले आहेत. इंग्रजांच्या हातीं लागलेले खंदक परत घेण्याचा प्रयत्न जर्मनीनें अनेक वेळां केला, पण निष्फळ होऊन येप्रर कालव्यापाशीं जर्मनांना हटावें लागलें. लेंबर्गिन जवळ रशियानें ही पुढें चाल करून शत्रूला हटण्यास लाविलें. आरासवर जर्मन पुनः पुनः हल्ले करीत आहेत, व विषारी वायूचा उपयोग करीत आहेत. वोव्हरे येथें जर्मन चाल करून गेले, पण अपयश घेऊन परतले. सूचेझ येथील इंग्रजांच्या खंदकावर जर्मनीनें धातुकी कुलपी गोळ्यांचा वर्षाव केला; पण तो निष्फळ झाला. सारांश, जर्मन लोक अलीकडे अधिक चळवळ करूं लागले आहेत. रशियांत वार्सा शहरावर त्यांचा तीव्र कटाक्ष आहे. पण त्यावर हल्ला करण्याचे त्यांचे आतांपर्यंतचे प्रयत्न फसल्यामुळें आतां ते कदाचित् पश्चिमेच्या बाजूनें त्यावर हल्ला करतील असा रंग दिसतो. आस्ट्रियांतलें महत्वाचें शहर ट्रिएस्ट सर करण्याचा इटलीचा बेत आहे. इटालियन जनरल त्या शहरांच्या अगदीं जवळ जाऊन पोचला आहे. पण प्रथम त्या शहराचे रक्षण करणारी कार्सो पर्वताची रांग हस्तगत करण्याची खटपट चालली आहे. जर्मनीचें जंगी क्रूझर कोनिगस्बर्ग हें इंग्रजांनीं साफ नष्ट करून टाकिलें आहे. बेलजियन लोकांच्या विपत्तीहरणार्थ मुंबईंत उभारलेला फंड दोनलक्षावर गेला आहे. बर्लिन येथें प्रसिद्ध झालेल्या तारांवरून कळतें कीं गेल्या आठवड्यांत नुसत्या सत्तावीस तासांत आस्ट्रियाचे १५००० लोक मारले गेले. ईजिप्तचे सुलतान प्रार्थनेस चालले असतां त्यांच्या गाडीवर बाँब फेकण्यांत आला, पण त्याचा स्फोट झाला नाहीं. तुर्क लोकांनीं एडनच्या बाजूस चळवळ मांडली आहे. त्यांनीं तेथें बरेंच सैन्य जमविलें आहे. ब्रिटिश फौज त्यांना तेथून घालवून देणार होती. पण त्या मुलुखांत पाण्याचा दुष्काळ असल्यामुळें ब्रिटिश सैन्य मागें फिरलें.

---

नवा डाक्टरी शोध सांगतो कीं पक्व अन्न हें त्यांच्या कच्चा स्थितीच्या मानानें मृत अन्न होय. कच्चीं फळें धान्यें व कंदमुळें हीं शरीराला पुष्टी अधीक आणितात. आणि निरोगी व अनामय स्थिति वाढविण्याला त्यांचा अधीक उपयोग होतो. हा नवा शोध सध्यां पटण्यासारखा नाहीं पण अनुभवानें त्याची प्रचिती घेऊं पाहण्यासारखें दुसरें शहाणपण कोणतेंच नाहीं.

---

# वऱ्हाडवृत्त.

**हवामानः**— आर्द्रा नक्षत्रानें वृष्टिसिंचन करून बीज रुजविण्याचें पुण्य जोडलें तर पुनर्वसु नक्षत्र कोरडें जाऊन आपल्या धारण केलेल्या प्रखरतेनें रुजलेलीं पिकें सुकविण्याचें पाप पदरीं बांधतें कीं काय अशी भीति वाटत होती. परंतु गेला बुधवार व गुरुवार मिळून सरासरी एक इंच पाऊस झाला. बुधवारीं रात्रभर झिम झिम असून गुरुवारीं सायंकाळीं बराच जोराचा पाऊस पडला. त्यामुळें पिकें आणखी कांहीं दिवस तकवा धरतील. व अद्याप बाकी राहिलेल्या पेरण्या पुऱ्या होतील. आकाश बहुतेक स्वच्छ असतें. परंतु प्रखर उष्णता व उष्मा यांवरून आणखी पावसाची आशा वाटते. रोगराई विशेष नाहीं.

साभार स्वीकारः— कै. ना. गोपाळ कृष्ण गोखले यांचें इंग्रजी भाषेंत ना. रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे, रँगलर, प्रिंसिपाल, फरग्युसन कॉलेज, पुणें, [illegible] आभारासहित स्वीकार करतों. या पुस्तकांत नामदार गोखले, न्या. रानडे, रा. साठे, ना. श्रीनिवासशास्त्री आदिकरून सात हाफटोन सुंदर फोटो दिलेले आहेत. नामदार गोखले व ना. परांजपे यांचा बराच घरोबा असल्यामुळें हें पुस्तक माहितीनें भरपूर असें आहे. विस्तृत चरित्र छापण्याचें काम जारीनें सुरूं आहेच. परंतु तें मिळेपर्यंत प्रस्तुत पुस्तकाचाही कांहीं कमी उपयोग होईल असें वाटत नाहीं. किरकोळ अशुद्धें राहिलीं आहेत तीं दुसऱ्या आवृत्तींतून निघतीलच. पुस्तकाची किंमत अत्यल्प म्हणजे अवघी ४ आणे आहे. आमच्यामतें हें सर्व संग्राह्य झालें आहे.

'वऱ्हाडचा कैवारी' लिहितात कीं कै० श्री एडवर्ड बादशहाचें स्मारक म्हणून जें कालेज निघणार आहे तें उमरावतीस न काढतां इलिचपूरच्या छावणीच्या सुंदर स्थळीं उभारण्यांत येईल तर त्यांत लोकांचा फायदा अधीक होईल. सूचना नामी आहे.

नामदार सर बेंजामिन रॉबर्टसन् के. सी. एस्. आय चीफ कमिशनर मध्यप्रांत हे लेडी व मिस् रॉबर्टसन् वगैरे वगैरे ना. जे. टी. मार्टिन चीफ सेक्रेटरी, व मिसेस मार्टिन् यांच्या स्वाऱ्या ता. १३ रोजीं मंगळवारीं नागपूर येथें मोटारनें दाखल झाल्या असून बुधवारीं सकाळीं नित्याप्रमाणें तोफांची सलामी देण्यांत आली.

रा. रा. ई. एफ्. नेस्सन्, ना. चीफ कमिशनर यांचे पर्सनल असिस्टंट यांस आकोला येथें डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंट नेमण्यांत आलें.

रा. रा. सी. ए. क्लार्क, आय्. सी. एस्. रजेवरून परत आल्यावर आपल्या कामाचा चार्ज घेतला म्हणजे रा. रा. आर. ए. विल्सन्, आय्. सी. एस्. ऑफिशिएटिंग डेप्युटीकमिशनर, नागपूर, यांस त्याच कामावर बुलडाणा येथें बदलण्यांत आलें.

रा. रा. के. एस्. जठार, यांस रजेवरून परत आल्यावर आकोला येथें डेप्युटीकमिशनर नेमण्यांत येऊन त्यांनीं आपल्या कामाचा चार्ज घेतल्यावर रा. रा. एस्. वॅाटर्स्टन्, आय्. सी. एस्. यांस इलिचपूर येथें असिस्टंट कमिशनर नेमण्यांत आलें.

स्थानिक कायदे कौन्सिलाच्या बैठकी ता० २६ आगष्ट पासून नागपूर येथें सुरुं होतील.

नापास विद्यार्थ्यांच्या सोयीसाठीं येथील हायस्कूलला म्याट्रीक्युलेशनचा निराळा वर्ग जोडण्याविषयीं मे. इनस्पेक्टरकडे विनंती करण्यांत आली आहे.

---

### नोटीस

वेशमी खुपचंद नथमल दुकान वणी ता० हिंडोली जि० नाशिक याचे मालक—

(१) खुपचंद गोकुराम.

(२) नथमल गोकुराम

उभयतां रा० वणी यांना—

खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत [illegible] पुढें त्रवण महिन्यांत २।८।१४ रोजीं मी खुद्द तुमच्या दुकानावर आलो, मालासंबंधानें तपास करून माल तयार करणाऱ्या लोकांस ॲडव्हान्स देण्यासाठीं बरोबर आणलेले २०० रुपये मी नथमलच्या हवालीं केले. आणि आणखी २०० रुपये आकोल्याहुन १९।८।१४ रोजीं मनीआर्डरीनें पाठविले. तुम्हाकडून तीन विजके रुपये १९० अंदाजा किंमतीची आलीं आणि पुढें माझी तक्रार न ऐकतां व व्ही० पी० करूं नये असें अगाऊ कळविलें असतांही तुम्ही लबाडीनें व्ही० पी० ९१॥ रुपयाचा माल पाठविला मी ती व्ही० पी० परत केली. आणि तुमची लबाडी उघडकीस आली म्हणून तुमच्याशीं व्यवहार बंद केला आणि गेल्या लग्नसराईत नुकसान सोसलें. वरील प्रकारच्या फसवणुकीनें तुम्ही माझे २९० रुपये दाबून बसला आहां. याबद्दल तुम्ही आठ दिवसांत निकाल करा नाहीं तर मी तुम्हावर दिवाणी व फौजदारीत फिर्याद करून सर्व नुकसानी नोटीशीच्या खर्चासुद्धां भरून घेईन कळावें.

ता० २९।६।१९ सही

संपत विठोबा मोरे द० खुद्द.

ता० क० या नोटीशीची एक प्रत मी आपले जवळ ठेऊन दुसरी आपणास पाठविली आहे त्याचा जबाब ८ दिवसांत द्यावा न दिल्यास ही नोटीस वर्तमानपत्रांत देऊन आपणावर एकदम फिर्याद दाखल केल्या जाईल कळावें.

सही

संपत विठोबा मोरे

नो नं २९७

---

### NOTICE

A Mahomedan matric to teach Anglo Urdu class 1 Apply sharp stating age, qualifications and the lowest salary expected to

Mungrul Pir } Lakshman Raghanath
10-7-1915 } Head master English School MangrulPir

नो० नं० २९८

---

प्लेगची वाट ४ आठवडे. प्रांत ३, बंगाल ३३, संयुक्तप्रांत ३, ४३, व मुंबई २९.

### जाहीर नोटीस.

सर्व लोकांस खालीं सहीसाठ्या वर्तनांत कडून नोटिस देण्यांत येते कीं:— हाजी याकुबखा वा आहमदखां रा० आकोला ताजनापेठ काळी मसजीद नजीक याचे जवळ वाडिलोपार्जित— स्थावर जंगम मालमत्ता आहे. त्या सर्व इस्टेटीचे भागीदार मजजवळ असलेले हाजी याकुबखाचा बंधू मयत हाजी अनवरखा याचे दोन अज्ञान पुत्र आहेत. त्यांचा पालन करणार मी आहे. अज्ञानांचा हिस्सा असलेला व याकुबखचे ताब्यांत असलेली वडीलोपार्जीत स्थावर जंगम इस्टेट याकुबखास विकण्याचा गहाण ठेवण्याचा वगैरे कांहींच हक्क नाहीं. जो कोणी इसम वर निर्दिष्ट केलेली इस्टेट खरेदी करिल, अगर गहाण ठेवील त्यास जबाबदार व्हावें लागेल. सबब ह्या नोटिशीद्वारें कळविण्यांत येते कीं, हाजी याकुबखानीं त्याचे जवळ असलेला वाडिलोपार्जीत स्थावर जंगम माल अफरातफर करूं नये. व खरेदी [illegible]

महमदखा व आहमदखा वा हाजी अनवरखा बेद अ. पा. खतीभावी मर्द हाजीअनवरखा बेद रा० आकोला ताजनापेठ नि. बां.

नो. नं. २९९

---

### नोटीस

नोटीस वेशमी गणपत वा पतानी पाथरकार रा० मनपद पो० भाबेरी ता० आकोट

यांसः—

खालीं सही करणार नोटीस देतो कीं तुमचा मुलगा नामे मोतीराम हा मी चार वर्षांपूर्वीं दत्तक घेऊन त्याबद्दलचे दत्तकपत्र ही झालें आहे. सदरहु मुलगा हल्लीं अज्ञान आहे परंतु तुम्ही त्या मुला कडून पूर्व नात्याच्या संबंधानें माझ्या स्थावर जंगम इस्टेटीचा खराबा (अफरातफर) करीत आहांत परवा गेल्या शनिवारीं तुम्ही मुलास जेवतांना ओढून नेलें. व अशाच तऱ्हेचा तुमचा त्रास नेहमी होत असून तो माझे हितसंबंधास आड येत आहे. तरी तुम्हास या नोटीशीनें कळवितो कीं तें मी पूर्वीं केलेलें दत्तक पत्र या नोटिशी अन्वयें रद्द केलें आहे. आणि म्हणून त्याअन्वये माझ्या स्थावर जंगम मिलगीवर वरील मोतीराम याचा केव्हांही कोणताच हक्क राहणार नाहीं. तुम्ही न जुमानता कांहीं माझ्या मिलगीची अतःपर अफरातफर केल्यास कोर्टमार्फत तजवीज करण्यांत येईल व सदरबंदी लागणारा खर्च तुमचेकडून वसूल केला जाईल कळावे. ता० ९-७-१९१९ इ.

सही

अमृता वा बापुजी पा. द० खु०

रा० मनपद

नो. नं ३००

…म

… नोटिशीनें जाहिर … आहे कीं मी खालीं सही … एकोबा वा धनाजी देशमूख, वरणगाव वरणगांवचा राहणारा असून या दोन्ही गांवीं माझीं घरें व अजमासे ४० तिफणची जमीन इतकी स्वसंपादित इस्टेट आहे. मला सहा मुलगे व नातू वगैरे आहेत. आम्ही सर्व एकत्र रहात आहोंत. माझ्या मुलांपैकीं एक मुलगा नामे गणपत वा। एकोबा देशमूख हा अलीकडे माझे ऐकेनासा झाला असून वाईट लोकांच्या संगतीनें बिघडला आहे. तो आताशा इस्टेट गहाण टाकण्याच्या व खरिदी लिहून देण्याच्या उघड उघड धमक्या देत आहे. तरी त्यास कोणी गहाणावर कर्ज वगैरे देऊं नये व त्याचेकडून कोणतीही खरिदी लिहून घेऊं नये. सर्व इस्टेट माझी असल्यामुळें माझ्या व इतर भावांच्या सह्याशिवाय काढलेले कर्ज किंवा खरिदी आम्हांस कबूल होणार नाहीं. त्या देण्याचा बोजा आमच्या इस्टेटीवर मुळींच रहाणार नाहीं व जबाबदारी आम्ही कबूल करणार नाहीं. जे कोणी त्याच्याशीं व्यवहार करतील त्याची जोखीम त्याचेवरच राहील. कळावें. ता० १७ माहे जुलै सन १९१९ इ.

सही

एकोबा वा। धनाजी देशमूख
रा० वरणगांव वरणगांव ता०
बाळापूर याच्या सहीची
निशानी डावे हातचा
नो०नं० २९९ आंगठा असे.

## नोटीस

नोटीस बेशमी निबाजी वा। रंभाजी भारोळे जात कुणबी रा० पळसोद ता० आकोट जि० आकोला. यांसः—

मी खालीं सही करणार तोली मर्द कृष्णाजी फलके रहाणार पळसोद ता० आकोट कळवितें कीं तुमची ता० ९ माहे जुलै १९१९ च्या वऱ्हाडसमाचारच्या अंकांत मला दिलेली नोटीस पावली. उत्तरीं या नोटिशीनें तुम्हांस कळविण्यांत येते कीं मला तुम्ही प्रामेसरी नोट रकम रुपये साडेपांचशेची ता० १९-६-१९ रोजीं लिहून दिली. नोटिशींत तुम्ही ता० १६-६-१९ लिहितां ती चूक आहे. तसेच भरण्याचे रुपये साडेपांचशे माझी मुलगी सोनाई इजपासून मी घेऊन तुम्हांस चार चौघांसमक्ष दिलेले असून तुम्ही स्वदस्तुरची पावतीही दिली आहे. आतां तुम्ही लबाड लोकांच्या नादीं लागून माझ्यावर तुफान उचलण्याच्या गोष्टी करीत आहां ही तुम्ही दिलेली नोटीस बरोबर नसून लबाडाची आहे. तुमची दानत फिरलेली दिसते. मी तुमची बहीण व तुम्ही माझे भाऊ असून मी बायकोची जात व म्हातारी आहे. मजवर असें भलतेंच कुफरांड उचलतां हें तुम्हांस उचित नाहीं. अतां ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत प्रामेसरी नोटीची सालीम रकम रुपये साडेपांचशे व्याजासुद्धां आणून द्यावे. तसें करण्यास चुकाल तर दिवाणी कोर्टांत दावा करून वसूल करून ते रु. घेतले जातील व दाव्याचा व नोटिशीचा खर्चही तुम्हांस द्यावा लागेल कळावें ता० १७-७-१९१९ इ.

सही

तोली मर्द कृष्णाजी फलके
नि० बांगडी असे

नो. नं. २९६

## सचित्र कोकशास्त्र.

रसिक गृहस्थहो घेण्याची त्वरा करा. हा एक मोठा ग्रंथ आहे. ज्याच्या तपासांत आपण पुष्कळ काल पर्यंत आहों व जो आतिशय पारिश्रम करून व द्रव्य खर्च करून ही न मिळण्यासारखा आहे. असा हा ग्रंथ छापून हल्लीं तयार आहे. यामध्यें स्त्री पुरुषांच्या जातीभेद लक्षणें, गर्भधारणेचे नियम, स्त्री पुरुषांच्या अनेक रोगांची औषधी चिकित्सा व त्यांचे निदान इत्यादि अनेक विषय आहेत. हा ग्रंथ अमोलिक विषयांचे एक भांडारच आहे. किंमत रू.१ ट.ख. दोन आणे. पत्ता स्पष्ट बालबोधींत लिहावा.

पी.एल. शर्मा अलीगढ.

नो. नं २७०

सतत ९० वर्षांच्या पूर्ण अनुभवानें उत्तमोत्तम ठरलेला
दूषित रक्त शुद्ध करणारा
आयोडाइज्ड.

**सार्सापरिला.**

शरीराचा पंचप्राण म्हणजे शुद्ध रक्त होय. तेंच एकदां बिघडलें कीं नानातऱ्हेचे रोग देहांत आपला शिरकाव करूं लागतात. भयंकर अशा उपदंशजन्य विकारांमुळे व तदनुषंगिक होणाऱ्यां पक्षघातासारख्या रोगामुळें अर्धांग वायु, अवयव लुले पडणें, स्मरणशक्ति कमी होणें, शरीरावर गांधी उठणें, व्रण व काळे डाग पडणें, संधिवात व दूषित रक्तामुळें उद्भवणाऱ्या इतर सर्व रोगांवर हाच **सार्सापरिला** देणें फारच उत्तम होय. अनुभवाशिवाय गुणाची कल्पना येणार नाहीं. किंमत १ बाटलीस रु.१।. टपालखर्च -।- पांच आणे. चार बाटल्यांस टपालखर्चासह रु. ४॥- उत्तम गुणास चार बाटल्या लागतात. आमचा सार्सापरिल्याचा खप पाहून बऱ्याच लोकांनीं हुबेहुब नकल केली आहे. तरी घेतांना तो आमचाच आहे अशाबद्दल खात्री करून घेणें.

**मालक**— डा. गौतमराव केशव, आणि सन्स
ठाकुरद्वार पोस्टाजवळ मुंबई नंबर २

नो. नं. २१

सतत ४२ वर्षें चाललेला कारखाना

ए. जे. म्हात्रे आणि सन् सुगंधी.

ठिः—पांजरा पोळचा नाका, चिमणलालमहाराजांचे मदार भुलेश्वर — मुंबई.

एकच भाव! ओटो सुरंगी! एकच भाव! !

आमचेकडे मिळणारा माल

ओटो सुरंगी

अत्तरें.— गुलाब, मोतिया, दवणा, अंबर, बकूल रुपाच, हिना, पाच, वाळा, जुई चांफा, अंबा, इस्तंबोल, केशर, मदनबाण पारिजातक, मुस्काहिना, गुलहिन, रुअबझा, केवडा, रुखस, चमेली, अगर. हीं अत्तरें दर तोळ्यास १ रुपयापासून ८ रुपयेपर्यंत निरनिराळ्या भावाचीं मिळतील. २-३-४-६ रु.

तेलें.— चमेली, बेलिया, मुसुंबी, हिना, लिंबू, मेंदी, गुलाब, मसाला, नारंगी, सुगधराव, मोतिया, आवळा, नागर, कपाशी.

वरील तेलें दर रुपयास ६ तोळ्यापासून २८ तोळेपर्यंत निरनिराळ्या भावाची मिळतील. दर बाटली ४ आणे.

अष्टगंधी अरगजा १ तोळ्यास ४ आ. ६ आ. १२ आ. १ रु. १॥ रु.पर्यंत. अरगजा व पिंजरा निरनिराळ्या सुवासाचा दर डबीस ३ आ. ४ आ. ६ आ. ८ आ. १ रु. उटणें दर डबीस १ आ. २ आ. ४ आ. ८ आ. पर्यंत. केशरी गोळी उत्तम २॥ आ. ९ आ. १० आ. १। रुपयापर्यंत. क्याटलॉग फुकट

ह्याशिवाय कस्तुरी, केशर, गुलाबपाणी, मध, उदबत्ती, रंगीत पाट, दशावतारी गंजिफे, सोंगट्या, बुद्धिबळें, आर्यवर्धक कार्डस, बिझिक, इसापिकें, हस्तीदंती फासे व फण्या, पितळी सामान, पितळी शिंगे व करणे, चंच्या, सरबतें व मुरंबे, पक्या तारा, बदामाचें तेल, व वातहारक आणि केशवर्धक तेलें, सुटें व वेणीचें गंगावन इत्यादि वरील पत्त्यावर मिळेल. व्यापाऱ्यांस सवलत.

बाहेरगावच्या गिऱ्हाईकांस माल व्हल्युपेबलनें पाठविला जाईल. नो. नं. ३

**Oriental Government Security Life Assurance Co., Ltd.**

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY. R. PATERSON BROWN MANAGER.

**FUNDS almost 5 CRORES.**

INVESTED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BONDS.

Claims paid $4\frac{1}{2}$ CRORES

**A Decennial Record of Progress.**

| Year. | No. of Polices in force. | Existing Assurances. |
|---|---|---|
| 1884 | 4.823 | 1,59,25,200 |
| 1894 | 20,110 | 5 26,08,850 |
| 1904 | 43,356 | 8 88,02,223 |
| 1914 | 65,269 | 12,37,10,910 |

| Year. | Total Income. | Total Assets. |
|---|---|---|
| 1884 | 6,77,552 | 14,41,429 |
| 1894 | 25,49,607 | 94,49,971 |
| 1904 | 43,64,808 | 2,47,18,898 |
| 1914 | 72,46,043 | 4,96,86,509 |

**BONUS**

The bonus for the premium ending 31 December 1912, constitutes a recort for the company. The next Division of profits will be madea s at 31 December of the current year when all With Profit Policies effected prior to that date will participate—

*SPECIAL FEATURES.*

Absolute Security—Low Rates—Liberal Conditions.
Forty years continuously increasing prosperity.
Ninety per cent of the entire Profits, after providing for the Reserve Fund
divided among the Policyholders every 3 years.
Native Lives are accepted at the same rates as Europeans
Loans granted to policyholders at reasonable rates.
Prompt Payment of Claims.

Full particulars, prospectus and proposal forms on application to:—

Influential and energetic Agents wanted-Terms liberal.

*M. deSOUZA,*
CHIEF AGENT,
C. P. Berar & Khandesh …
NagPUR.

N. N. 25

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd-No. N 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

१५ ६ आगष्ट १९१५

...र्गची वाट ४ आणे. ...प्रांत ३ बंगाल ३३, संयुक्तप्रांत ३, ... ४३, व मुंबई २९. ...लिसाच्या वर्तनांत ... नाहीं.

वर्ष ४९ ] आकोला—सोमवार तारीख २६ माहे जुलै सन १९१५ ई० [ अंक २९

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवी ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.



### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खाली दिलेल्या शर्तीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा ज्यास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ — S. Clements, एजंट

नो. नं २

### अस्सल अंगूरी.

## हींग

केवळ एक आणा तो. पवित्र केसर ।।।≈ ता. शुद्ध शिलाजीत. -।।- तो. खालिस कस्तूरी रु. २९ तो. तिब्बती ममीरा रु. ३ तो.

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ९

नो० नं० ८

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागले आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तावडतोब दूर होतात. किं रु. १८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानांवर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

DR. H. L Batliwala. Sons & Co Ltd
N. N. 5 Dadar Bombay.

## चांदीचीं भांडीं.

### विकावयाचीं आहेत.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारची सुबक व वाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवू मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.

नो. नं. ४

### ब्रह्मविद्या ग्रंथ रत्नमाला

या मासिकाचा वर्षारंभ माघ शु० ९ तिसऱ्या वर्षापासून ७२ पानांचें मासिक. वा० व० ट० खर्चासह तीन रुपये. यांत श्रीशंकराचार्य, शंकरानंद, व विद्यारण्य यांचे उपनिषदांवरील भाष्य, आत्मपुराण व अनुभूतिप्रकाश हे ग्रंथ क्रमानें मूळ, अन्वय, अर्थ व विवरण यांसह प्रसिद्ध होतात. यांत हल्लीं बृहदारण्यकाचा भाष्यार्थ चालू आहे. मागील दोन वर्षांतील बीस प्रकरणें १० रुपयांस घेऊन तिसऱ्या वर्षी वर्गणीदार होणारास 'वैशेषिक दर्शन' बक्षीस.

सनातन वैदिक धर्माचें, तत्त्वज्ञानाचें व सामाजिक विषयाचें विवेचन करणारें—

### आचार्य

पाक्षिक, दर एकादशीस नियमितपणें प्रसिद्ध होतें. पृष्ठें २४ वा० व० ट० खर्चासह १ रु० ८ आणे वरील मासिक घेणारास फक्त १रु० वरील विषयांशिवाय यांत संस्कृत काव्यें, नाटकें व इतर लहान लहान ग्रंथ यांचाही परामर्श केला जातो. धर्म संबंधीं प्रश्नांचीं समर्पक उत्तरेंही दिलीं जातात नमुना मागवा.

पत्ता— विष्णुशास्त्री बापट.
२४१ सदाशिव पेठ पुणें.

नो० नं० ३


### जाहीर नोटीस

या नोटिशीच्या द्वारें सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं, आमची चुलती नामे लक्ष्मी उर्फ लहानी मर्द विठू ढगे माळी ही कांहीं बारदेंड लोकांचे सांगण्यावरून आमचे इस्टेटीची अफरातफर करित आहे. व आमचे कांहीं घेणे आहे. तरी कोणी तिला देऊं नये. व तिजकडून कोणतेच प्रकारचे दस्तैवज वगैरे करून घेऊं नये. घेतल्यास आम्ही अगर आमची इस्टेट जबाबदार नाहीं. कळावें. ता.

सही

पुंडलीक वा शेकोजी अ. पा. क आई गिरजाबाई मर्द शेकोजी तर्फे मुखत्यार तुकाराम गोमाजी माळी

नो. नं. ३०१ रा. घामणी द. खु.

### जाहिरनोटीस

नोटीस बेशमी लहानु उर्फ लक्ष्मी मर्द विठूजी ढगे माळी रा. कजवे घामणी

यांसः—

खालीं सही करणारा कडून नोटीस देण्यांत येते कीं, आमचा चुलता नामे विठूजी माळी ढगे हा तीन महिन्या पूर्वी मरण पावला आहे. तेव्हां पासून तूं लबाड लोकांचे सांगण्यावरून इस्टेटीची अफरातफर करीत आहेस. तरी त्वां असे करू नये. कारण कर्ज काढण्यास कांहींच कारण नाहीं. आमचे जे लोकांकडून घेणे आहे ते त्वां मुळींच वसूल करू नये. आमचे इस्टेटींत मुळींच कोणतेच प्रकारे ढवळाढवळ करू नये. केल्यास कायदा प्रमाणें तुजवर फौजदारी करण्यांत येईल. करितां कळविले आहे. कळावें. ता. सही

पुंडलीक वा शेकोजी माळी अ. पा. क. आई गिरजाबाई मर्द शेकोजी माळी तर्फे मुखत्यार तुकाराम गोमाजी माळी रा. घामणी

नो. नं. ३०२ द. खु

### नोटीस

शेखलाल शेखगुलाब रा. दारव्हा. यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं सुमारें दोन वर्षे होऊन गेलीं मी तुम्हास कुलमुखत्यारपत्र लिहून दिले होते. आतां यापुढें तुम्हास कुलमुखत्यार ठेवण्याची माझी इच्छा नाहीं सबब सदरहु मुखत्यारपत्र मी आजपासून रद केले आहे तरी तुमचे जवळ असलेले मुखत्यारपत्र माझे हवाली करून माझी पावती घ्यावी ही नोटीस दिली सही मुक्काम दारव्हा तारीख १९।७।१९ इ.

सही.

सहीची नि॥ सेखअब्बास शेखअमीर याची असे.

नो० नं० ३०३

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल



### विक्रीस तयार

आमचे छापखान्यांत दरखास्तीचे, वकील पत्राचे, परत भरपाचे, लिष्टफार्म पर्च्याचे व नकलेकरितां करावयाच्या अर्जाचे नमूने छापून तयार आहेत. ते आमचे छापखान्यात कोणत्याही वेळीं विकत मिळतील.

वऱ्हाडसमाचार कार्यालय, सदाशिवाश्रम, आकोलें } मॅनेजर

### सचित्र कोकशास्त्र.

रसिक गृहस्थहो घेण्याची त्वरा करा. हा एक मोठा ग्रंथ आहे. ज्याच्या तपासांत आपण पुष्कळ काल पर्यंत आहों व जो अतिशय परिश्रम करून व द्रव्य खर्च करून ही न मिळण्यासारखा आहे. असा हा ग्रंथ छापून हल्लीं तयार आहे. यामध्यें स्त्री पुरुषांच्या जातीभेद लक्षणें, गर्भधारणेचे नियम, स्त्री पुरुषांच्या अनेक रोगांची औषधी चिकित्सा व त्यांचे निदान इत्यादि अनेक विषय आहेत. हा ग्रंथ अमोलिक विषयांचे एक भांडारच आहे. किंमत रु.१ ट.ख. दोन आणे. पत्ता स्पष्ट बाळबोधींत लिहावा.

पी.एल. शर्मा अलीगढ.

नो. नं २७०


### नोटीस

सुर्यमान वा भवानजी मधार मोर रा० माहोली ता० दारव्हा जि० यवतमाळ

यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं आमपावेतों तुम्ही माझे तर्फे कोर्टांत व खानगी काम पाहात होते. परंतु तुम्ही माझे कोणतेच प्रकारचे हित केलें नाहीं. उलट माझी नुकसानी करीत आहां तरी या पुढें ही नोटीस पावले दिवसापासून तुम्ही माझे तर्फे सरकारी अगर खानगी प्रकारचे कोणतेही काम करूं नये. व माझे कोणतेही कामांत हात घालूं नये. तुम्ही माझे कामांत हात घातल्यास रितीप्रमाणें योग्य तजवीज केली जाईल कळावें ता. १७ माहे जुलै स. १९१५

सही

महादु वा पुंजाजी अ. पा. क. तुकाराम वा बोराजी, कुणबी गोमाशे रा० भांडेगांव ता० दारव्हा याची नि०

नो. नं. ३०४

युद्ध अस

...देव केशव मुंडे रा. ...रांत.

यांसः--

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं, मी तुमचे मालकीचे शेत मुक्काम दापकी येथील शेत सर्वे नंबर ९९ हे शेत मी तुमचे जवळू सहा वर्षा करितां पंच्यानें करून घेतलें दरसाल रुपये ८० ऐसी प्रमाणें देण्याचे ठरलें असें कबुल करून पट्टा रजिष्टर करून घेतला. त्याप्रमाणें मी दोन वर्षांचे पैसे तुह्मास चुकते दिले. गुदस्तसालचे फक्त माझेकडे रुपये ८० राहिले ते रुपये दिवस मानाचे तंगीमुळें राहिले. ते रुपये मी देण्यास तयार असतां तुह्मी विनाकारण मला यंदा वाहु देत नाहीं करितां माझे पवढेच ह्मणणे आहे कीं, मला त्या शेताबद्दल दोनशे रुपये खर्च आला तर ते रुपये देऊन आपण आपले शेत घ्यावें. नाहीं तर मी साला प्रमाणें रुपये देण्यास तयार आहे. तरी आपण असें न केल्यास मी माझे नुकसानीबद्दल तुमचेवर दावा करीन त्याचा खर्च तुमचे जवळून घेतला जाईल. कळावे ता. २०।७ १९ इ.

सही.

सिताराम किसन कुणबी रा. दापकी पो. आकोला नि. आं.

नो० नं० ३०९

---

## नोटीस

रा० रा० श्रीनिवास देवीदास देशपांडे रा० शिरपूर ता० वासीम जि० आकोला व नारायण नागोराव उर्फ बाबापांडे माझोडकर रा० माझोड पो० व ता० इंगोली जि० परभणी इलाखा मोगलाई

यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुह्मा उभयतास मुखत्यार नेमले होते. ते मुखत्यारपत्र आकोले जिल्ह्यातील शिरपूर सब रजिष्टरचे बु. नं. ४ अ. नं. २ सन १९१२ इसवीस नोंदले. हल्लीं माझीं सर्व कामें आटोपलीं आहेत. आतां मला मुखत्याराची जरूरी नाहीं. व तुह्मी उभयताही माझे सांगण्याप्रमाणें वागत नाहीं. करितां तुह्मास या नोटिशीनें कळविते कीं आजतारखेपासून तुमचे वरील मुखत्यार पत्र रद्द केलें आहे. याबद्दल तुह्मास पूर्वीच समक्ष सांगितले व हल्लीं नोटिशीनें कळविलें. आतां यापुढें माझे नांवाचा खाजगी अगर सरकारी व्यवहार मुळींच करूं नये. केल्यास रद्द समजला जाईल कळावें तारीख १४ माहे जुलै सन १९१९ इ.

द० सीताराम जैराम पांडे राहणार शिरपूर

सही

यमुनाबाई नवजे शेषराव देशपांडे रा० शिरपूर जि० बां०

नो. नं. ३०६

---

## नोटीस.

खालीं सही करणार सर्वत्र लोकांस जाहिर नोटीस देतो कीं भगवान परशराम हा माझा दत्तक मुलगा आहे तरी स्थावर जंगम सर्व इस्टेटीची मालकी सर्वस्वी मजकडेस आहे व वहीवाटही मीच करीत असतो माझे नांवावर माझे दत्तक मुलानीं कोणतेही तऱ्हेचा व्यवहार व माझे नांवचे असलेले दस्तैवज व कागदपत्र व देणेघेणे ची वसुलात अगर दुसरे कोणतेही तऱ्हेची व्यवस्था केल्यास अगर करून घेतल्यास त्याजबद्दल मी जबाबदार नाहीं व कबुलही पण नाहीं कळावे ता. २८-६-१९

सही.

परशराम अनंत शांडिल्य दस्तुर खुद. राहणार वाशीम

नो० नं० ३०७

---

## नोटीस

नोटीस बेशमी बाल्या व तुकाराम वा॥ कृष्णाजी माळी रा० मुर्तिजापूर जि० आकोला.

यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी बाल्या यांची लग्नाची बायको आहे. लग्न होऊन वीस, बावीस वर्षे होऊन गेलीं. मी वयांत आल्यापासून मला नऊ दहा वर्षे सासरीं वागविलें. परंतु अलीकडे पांच सहा वर्षांपासून मला तुह्मी दोघेही विनाकारण मारठोक करून मला नीट वागवीनासे झाले, व मला माहेरी आणून घातलें. चार वर्षांपूर्वी मला तुमच्या गांवचे पंच यांनीं माझी समजुत करून मला तुमच्या घरीं नेलें असतां तुह्मी पंचासमक्ष पुनः मारठोक करून त्रास दिल्यावरून पचांनीं फिरून मला परत माहेरच्या गांवीं आणून घातलें. तेव्हांपासून मी सावकाराचें कर्ज काढून गुजराण करीत आहे. मी तुमच्या घरीं नांदण्यास कबूल असतांना तुह्मी मला नेत नाही आणि मी आपण होऊन आलें तर तुह्मी गांजा वगैरेचा अंमल करून मला मारहाण करून घालवून देतां. तेव्हां मला तुमचा भाऊ तुकाराम हा मारणार नाहीं. असें लेखी लिहून देऊन मला घेऊन जावें. माझे संसाराचे दिवस व्यर्थ जात आहेत. अशा स्थितींत ही नोटीस मिळाल्या तारखेपासून आठ दिवसाचे आंत मला आतांपर्यंत झालेलें सावकाराचें कर्ज रु. २०० (दोनशें) देऊन मला फारकत लिहून द्यावी, तसें न केल्यास हीच फारकत समजून मी दुसरा घरठाव करीन. मग माझेवर तुमचा नवरेपणाचा कोणत्याही प्रकारें हक्क चालणार नाहीं. आणि या नोटीशीचा खर्च व सावकाराचें देणें तुमच्या कडून कोर्ट मार्फत वसूल करून घेण्यांत येईल क. ता. २०-७-१९१९ इ.

सही.

मुक्ती मर्द बाल्या माळी इचे सहीची नि० डाव्या हातचा आंगठा.

नो० नं० ३०६

---

वऱ्हाडसमाचार

मिती आषाढ शु॥ १९ शके १८३७

---

## मध्यप्रांत व वऱ्हाडचें युनिव्हर्सिटी शिक्षण.

गेल्या सालीं आमच्या प्रांताला कायदे काउंसिल मिळालें. चालू सालीं विश्वविद्यालय मिळण्याचीं चिन्हें स्पष्ट दिसूं लागलीं आहेत. या दोन्ही गोष्टी आपापल्यापरी अतिशय महत्वाच्या आहेत. पहिली देणगी मिळाल्याबद्दल सरकारचे धन्यवाद गाण्याची सुसंधी जशी मिळाली तशीच दुसरी मिळाल्याबद्दल आमच्या सरकाराला धन्यवाद देण्याची व आमच्या प्रांतियांचें अभिनंदन करण्याचीही सुसंधि लवकरच प्राप्त होईल अशी आह्मांस पूर्ण उमेद आहे. या दोन्ही गोष्टी या प्रांताच्या इतिहासांत लाल शाईनें लिहिण्यासारख्या आहेत यांत शंका नाहीं.

अशा रीतीनें या प्रांतांचा दर्जा हलके हलके वाढत असलेला पाहून कोणास ही साभिमान आनंद होईल. इतर इलाख्याचे पंक्तीस जाऊन बसण्यास या प्रांतांना ले. गर्व्हनर व न्यायमूर्तिचें हायकोर्ट या दोनच गोष्टी कमी आहेत. त्याही लवकरच प्राप्त व्हाव्या अशी आमची मनापासून इच्छा आहे.

नागपूर येथें अगर त्याचे आसपास दुसऱ्या ठिकाणीं एक शिक्षणविषयक (निव्वळ परीक्षक नव्हे) असें विश्वविद्यालय स्थापण्याचा आमच्या सरकारचा विचार होऊन त्याच्या घटनेसंबंधानें व त्याखालीं या प्रांतांतील कोणकोणतीं कॉलेजें ध्यावीं, तीं कोठें कोठें व कशा धर्तीवर चालवावीं या संबंधानें विचार करण्यासाठीं मध्यप्रांत व वऱ्हाड या प्रांतांतील प्रमुख प्रमुख गृहस्थांची एक कमिटि प्रांतिक सरकारच्या ठराव नं. ६८२/८-७-१४ अन्वयें नेमण्यांत आली. या कमिटीतें काम करण्याचा मान ज्यांना मिळाला त्या नामावलींत एकंदर १४ सभासद असून एका नागपूरचेच ७ ह्मणजे निमे सभासद जबलपूरचे ३ व सी. पी. मधील इतर दोन आणि वऱ्हाडचे २ याप्रमाणें वाटणी झाली आहे. एकंदर सी. पी चे १२ सभासद आणि वऱ्हाड तर्फे फक्त दोनच सभासद होते. असो, या कमिटीचा सरकारी रीत्या प्रसिद्ध झालेला साग्र रिपोर्ट नुकताच आमचेकडे आला आहे. त्याबद्दल प्रांतिक सरकारचे आह्मी फार फार आभारी आहों.

सन १९१४ च्या २३ जुलै पासून १ ली आगष्ट पर्यंत सर्व साधारण तत्वांसंबंधीं प्राथमिक विचार करण्यासाठीं या कमिटीच्या आठ बैठकी होऊन शेवटीं ९ व १० सप्टेंबरला दोन सभा भरल्या आणि त्यांत या नूतन विश्वविद्यालयाची ठोकळ मानानें घटना करण्यांत आली. आणि जास्त सविस्तर बाबींचा विचार करण्याकरितां सब कमिट्या नेमण्यांत आल्या. या सब कमिट्यांच्या रिपोर्टांचा विचार करण्यासाठीं २१ ते २३ डिसेंबर पावेतों कमिटीची तिसरी बैठक होऊन शेवटच्या सभा गेल्या मार्च महिन्याच्या ८ व ९ तारखेस झाल्या आणि या सभांत कमिटीच्या शेवटच्या रिपोर्टाचा विचार करण्यांत आला. या सर्व सभा व बैठकी नागपूर येथेंच झाल्या.

युनिव्हर्सिटीच्या व बाहेरील कॉलेजच्या खर्चाचा अंदाज व घटना हिंदुस्थान सरकारपुढें सादर करतां येतील अशा रीतीनें करण्याची या कमिटीस प्रांतिक सरकारची सूचना असून, या प्रश्नाचा अखेरचा विचार येत्या नोव्हेंबर महिन्याच्या १ ल्या तारखेस नेक नामदार चीफ कमिशनर साहेब करणार असल्याचें सरकारी रीतीनें जाहिर करण्यांत आलें आहे. त्या पूर्वीं कोणास कांहीं सूचना या बाबतींत करावयाच्या असल्यास त्या सर रॉबर्टसन् साहेब यांनीं उदार दिलानें मागितल्या आहेत ही विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट असून त्या बद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच होणार आहेत.

सदर रिपोर्टांत युनिव्हर्सिटीसंबंधानें व त्याखालीं येणाऱ्या कॉलेजांसंबंधानें सर्व प्रकारच्या यथोचित सूचना केलेल्या असून त्यांच्या खर्चाबद्दल अगदीं जवळ जवळ नक्की असा अंदाज ही दिलेला आहे. प्रथमारंभीं रिपोर्टाचें प्रकरणशः पृथक्करण दिलें आहे व शेवटीं कमिटींतील कांहीं सभासदांचीं मिनिटें व नऊ परिशिष्टें दिलेलीं आहेत. सब कमिट्यांच्या सभासदांचीं नावें, कमिटीनें या बाबतींत ज्या ज्या नामांकित तज्ज्ञांची सल्ला घेतली त्यांचीं नांवें, अभ्यासाचे निरनिराळे विषय, आदा व खर्चाचें अंदाज इत्यादि गोष्टींचा समावेश परिशिष्टांत झालेला आहे. एकंदरीनें रिपोर्ट जितका मेहनतीनें व काळजीनें लिहिलेला पाहिजे तसाच तो असून माहितीनें पूर्ण भरलेला आहे.

रिपोर्ट वाचण्याकरितां हातांत घेतांच पहिली महत्वाची गोष्ट एकदम लक्षांत येते ती ही कीं हें होऊं घातलेलें नूतन विश्वविद्यालय केवळ दुसऱ्या अस्तित्वांत असलेल्या विश्वविद्यालयाप्रमाणें परीक्षांचा कारखाना होणार नसून तें उच्च शिक्षणाचें माहेरघरच बनणार आहे. अशा प्रकारची युनिव्हर्सिटी — जिच्यासंबंधानें नुकताच हिंदुस्थान सरकारचा कायदा पास झाला—फक्त हिंदु युनिव्हर्सिटीच होईल असें वाटत होतें पण तिच्या जोडीला आमच्याही प्रांतांत तशाच प्रकारची युनिव्हर्सिटी लवकर जन्म पावणार हें ऐकून कोणासही आनंदच होईल. आतां या दोहोंपैकीं प्रथम अस्तित्वांत येऊन कोणास पहिला नंबर मिळतो तें पहावयाचें आहे. एकाच कालीं तीच कल्पना दोहोंकडे उद्भवणें हा विचित्र योगायोग ह्मटला पाहिजे. असो, हिंदुस्थानांतील सर्वच विश्वविद्यालयांना या दोहोंचें अनुकरण करण्याची सुबुद्धि होईल तो सुदिन ह्मणावयाचा !

## युद्ध आणि पाश्चात्य सुधारणा.

या विषयावर जूनच्या इंडियन रिव्ह्यूंत डा. सर रामकृष्ण भांडारकर यांचा एक वाचनीय लेख प्रसिद्ध झाला आहे. या लेखाचा प्रारंभ १८९७–९८ सालच्या पाश्चात्य वाङ्मयविषयींच्या उल्लेखानें करून तेव्हांपासून आतांपर्यंत पाश्चात्य विचारांची व युद्धविषयक गोष्टीची सांगड कसकशी लागत गेली आहे तें सर साहेबांनीं दाखविलें आहे. १८५७ सालीं सर साहेब एलफिन्स्टन कॉलेजांत विद्यार्थी होते. त्यावेळचे इतिहास विषयाचे त्यांचे अध्यापक मि. सिडने ओवेन हे त्याकाळच्या वाङमयातून उतारे वाचून दाखवीत असत. त्या उताऱ्यांत जाति, वर्ण, धर्म किंवा सुधारणेची स्थिति इत्यादिकांची अपेक्षा न करतां एकंदर मनुष्यजातीविषयीं प्रेम व सहानुभूति यांनीं प्रेरित असणें हा पाश्चात्य सुधारणेचा धर्म आहे असें प्रतिपादलेलें असे. अशाच प्रकारचे विचार त्या काळीं सर साहेबांनीं खाजगी रीतीनें वाचलेल्या ग्रंथांतून ही होते. फ्रेंच राज्यक्रांति होऊन बराच काळ तेव्हां लोटला होता, तरी त्या क्रांतीनें प्रादुर्भूत केलेल्या स्वातंत्र्य, समता व बंधुता याविषयींच्या कल्पना अस्तंगत झालेल्या नव्हत्या. त्यानंतर हळू हळू इतर कल्पनांचा पगडा पाश्चात्यावर बसूं लागला. या उत्तरकालीन कल्पनांत प्रिन्स बिस्मार्क यांची प्रथम प्रशिया व नंतर एकंदर जर्मन राष्ट्र यांचें साऱ्या युरोपवर प्रभुत्व स्थापन करण्याची कल्पना ही प्रमुख होती. याच कल्पनेला पुढें केसरच्या मनांत उत्तम उत्तेजन मिळून नुसत्या युरोपवरच नव्हे तर साऱ्या जगावर प्रशियाचें प्रभुत्व स्थापित करण्याची कल्पना पल्लवित झाली. या कल्पनेचा केसरच्या मनावर इतका पगडा बसला कीं ती त्याला स्वस्थ बसूं देईना आपले आरमार वाढविण्यास तिनें त्याला प्रवृत्त केलें. इंग्लंड व जर्मनी या राष्ट्रांत आरमाराविषयींची स्पर्धा उत्पन्न झाली. इंग्लंडच्या आरमारिक शक्तीवर ताण केल्याखेरीज केसरला झोप येईनाशी झाली. ही स्पर्धाच प्रस्तुतच्या युद्धाच्या मुळाशीं आहे. कोठें एकोणीसाव्या शतकाच्या पूर्वार्धांतल्या वाङ्मयांतली भूतदया विशिष्ट सुधारणा आणि कोठें या विसाव्या शतकाच्या पूर्वार्धांतली राक्षसी महत्त्वाकांक्षा ! केवढें जमीन अस्मानाचें अंतर ! पूर्वींची भूतदया आणि मानवी जातीविषयींची समबुद्धि पार अस्तंगत होऊन अगदीं दुसऱ्या टोकाला युरोपियन राष्ट्रें गेलीं ! डाक्टर साहेबांनीं या मनोगत क्रांतीबद्दल अतिशय साश्चर्य खेद प्रदर्शित केला आहे आणि तो यथार्थ ही आहे. तरी पण त्यांच्या विचारांत अर्ध सत्य आहे हें विसरतां कामा नये. त्यांचे ह्मणणें जर्मनी पुरतें खरें असलें तरी इंग्लंड विषयीं नाहीं, तसेंच फ्रान्स, बेलज्यम आणि सर्व्हिया यांच्याविषयींही तें खरें नाहीं. बेलज्यमनें जर्मनीची राक्षसी महत्त्वाकांक्षा पूर्ण होण्याचे कामीं अडथळा करून केलेला स्वात्मयज्ञ, इंग्लंडनें बेलज्यम सारख्या उच्च भावनेनें प्रेरित झालेल्या पण अशक्त राष्ट्राचा केलेला पाठिंबा, व फ्रान्सचें प्रस्तुत युद्धांतलें निष्कलंक वर्तन या गोष्टींचा विचार केला तर निदान अर्धे युरोपखंड तरी अद्याप सर साहेबांनीं उल्लेखित केलेल्या उच्च मनोवृत्तींना सोडलें नाहीं असें ह्मणणें भाग आहे. जर्मनी जर स्वार्थबुद्धीनें प्रेरित होऊन अनन्वित कृत्यें करण्यास उद्युक्त झाला आहे, तर त्याच्या उलट उच्च भावना दृढ धरून बेलज्यम, व इंग्लंड हीं राष्ट्रें जर्मनाच्या दुष्ट मनोवृत्तींना ताळ्यावर आणण्यासाठीं तन, मन, व धन यांच्या आहुती देण्यास तयार झालीं आहेत. प्रस्तुतचें युद्ध समाप्त झाल्यावर हिंदुस्थानला ब्रिटिश राज्याच्या इतर अवयवांबरोबरीचें उच्च स्थान मिळण्याचा संभव आहे असा दृढ विश्वास बाळगणारांपैकीं सरसाहेब हे एक आहेत असें त्यांच्या लेखावरून दिसतें.

## देशाभिमानी दिवाण.

म्हैसूरच्या संस्थानाच्या प्रजेच्या हिताहिताचीं सूत्रें त्या संस्थानाच्या सध्याच्या दिवाणाच्या हातीं आहेत तों पर्यंत तरी तीं सुरक्षित आहेत असें ह्मणण्यास हरकत नाहीं. आपलें संस्थान हिंदुस्थानांत नमुनेदार संस्थान व्हावें येवढेंच त्यांचें ध्येय नसून याच्यापेक्षांही उच्च तें ध्येय आहे असें दिसतें. सध्या युरोपांतल्या ·, युद्धामुळें देशी कारखान्यांना आपला उत्कर्ष करून घेण्याची सुसंधि सुदैवानें प्राप्त झाली आहे. पण तिचा फायदा करून घेण्यास सरकारची योग्य मदत मिळाली पाहिजे. तरच देशी उद्योगधंदे वर मान करतील, हें तत्त्व सदर दिवाणांनीं मान्य केलें आहे. इतकेंच नाहीं, तर इतर कोणत्याही देशांत उद्योगधंद्यांना सरकारकडून जितकें साह्य मिळतें तितकें म्हैसूर संस्थानाकडून देण्यास आपण तयार आहों असेंही त्यांनीं बोलून दाखविलें आहे. यांतले इतर कोणत्याही देशांत हे शब्द अत्यंत महत्त्वाचे आहेत. हें साह्य कोणत्या स्वरूपाचें असणार तें ही त्यांनीं समजावून सांगितलें. उद्योगधंद्यासंबंधानें प्रयोग करणें, नवे कारखाने उभारणें, आणि ते चालवून यशस्वी झालेले दिसले कीं लोकांच्या स्वाधीन करणें, लोकांनीं कारखाने काढल्यास त्यांना ठराविक व्याज पडेल अशा संस्थानाकडून ग्यारंटी ( हमी ) देणें, तगाई देणें, सवलती देणें, उद्योगधंद्याविषयीं माहितगार माणसें आणवून त्यांच्याकडून तरुणांना शिक्षण देवविणें, त्याचा खर्च संस्थानावर घालणें, संयुक्त भांडवलाच्या कंपन्या कशा चालवाव्या त्याबद्दल माहिती देणें, सरकारला लागणारा माल सगळा या कारखान्यांतून घेणें, उद्योगधंद्याविषयींची बिनचूक माहिती प्रसिद्ध करणें, प्रदर्शनें भरविणें, चर्चा करणें, इ० गोष्टी, ज्या सरकारनेंच करावयास पाहिजेत, त्यापैकीं कांहीं जरी म्हैसूर संस्थानच्या हातून झाल्या तरी पुष्कळ कार्य होईल. म्हैसूर संस्थानानें या बाबतींत आपल्यावरची जबाबदारी ओळखली आहे येवढें तरी दिवाणसाहेबांच्या उद्गारावरून ह्मणण्यास हरकत नाहीं. यंदाचे वर्षी वरील कार्यासाठीं त्या संस्थानानें पांचलक्ष रुपयांचा मंजुरी ही दिली आहे. ही रकम नवे कारखाने काढूं इच्छिणारांस सवलतीच्या व्याजानें कर्जाऊ ह्मणून देण्यांत येणार आहे. वचनांच्या विपुलतेच्या मानानें ही रकम अगदींच क्षुद्र आहे यांत शंका नाहीं. तथापि दिवाणसाहेबांचे शब्द अगदींच फोल नाहींत. येवढें तरी तूर्त यावरून दिसत आहे. कदाचित् हा नुसता प्रारंभ असेल, औद्योगिक गंगेचा प्रचंड ओघ याच छोट्याशा गंगोत्रीपासून निघून पुढें विस्तार पावणार नाहीं कशावरून ?

## टिळकांचें गीतारहस्य.

या विषयावरच्या मागच्या लेखांत रा. टिळकांचा भक्तिमार्गावर कसा निष्कारण कटाक्ष आहे तें आह्मीं दाखविलें. आज श्रीकृष्ण व युद्धधर्म यांच्या संबंधानें त्यांनीं आपल्या ग्रंथांत कशीं परस्पर विरोधी विधानें केलीं आहेत व या दोहोंचें खरें स्वरूप लक्षांत न आल्यामुळें त्यांचा कसा घोटाळा उडाला आहे तें थोडक्यांत दाखविण्याचा विचार आहे.

देवकीपुत्र श्रीकृष्ण व अर्जुनास गीतेचा गंभीर उपदेश करणारा श्रीकृष्ण हे एकच कीं भिन्न भिन्न होत हा प्रश्न कांहीं आजकालचा नाहीं. जेव्हांपासून आमच्या लोकांत चिकित्सादृष्टीचा प्रादुर्भाव झाला, तेव्हांपासूनचा आहे. या प्रश्नाचा समाधानकारक निकाल खऱ्या तर्कशास्त्राच्या व ऐतिहासिकतेच्या दृष्टीनें पाहतां कधींच लागलेला आहे. बालपणीं अत्यंत घाणेरडीं कृत्यें करणारा व तरुणपणीं गोपींच्या संबंधानें अनीतीचें वर्तन करणारा कृष्ण हा गीतेतलें सर्वोच्च नीतितत्त्व लोकांना सांगण्यास खरोखर अधिकारी होऊंच शकत नाहीं अर्थात् या दोन व्यक्ति भिन्न असल्या पाहिजेत असा पूर्वपक्ष करण्यांत येतो, तेव्हां उत्तरपक्ष करणारे गोकुळांतल्या रासक्रीडेला अध्यात्मिक स्वरूप देऊन त्यांचा मेळ घालूं पाहतात. पण एकीकडे कृष्णाचें चरित्र ऐतिहासिक आहे असें ह्मणावयाचें, आणि दुसरीकडे आपल्या भाविकतेला (ऐतिहासिक व्यक्तीच्या चरित्रांतल्या एका विशिष्ट घटनेला ) अलंकारिक मानावयाचें ही चिकित्सा बुद्धीची निवळ थट्टा ह्मटली पाहिजे. कृष्ण दोन नाहींत, एकच व्यक्ति आहे असें ह्मणणाराचा पक्ष या प्रमाणें तर्कशुद्ध नाहीं असें उघड दाखवितां येतें. याप्रमाणें भाविकता व ऐतिहासिक विचिकित्सा यांच्यामध्यें विरोध उत्पन्न झाला ह्मणजे लोकांनीं उराशीं धरलेल्या समजुतीला धक्का लावण्यास मोठमोठे विद्वानही कचरतात. तसाच प्रकार कांहीं अंशीं रा. टिळक यांचा झाला आहे. पृ. ५३९ यावर रा. टिळक ह्मणतात कीं देवकीपुत्र कृष्ण आणि गीतेतील श्रीकृष्ण हे एकच मानण्यास कांहीं आधार नाहीं. हें विधान करतांना त्यांनीं भाषेचा संदिग्धपणा बिल्कुल ठेविला नाहीं हें त्यांच्या पांडित्याला व विचिकित्सक दृष्टीला योग्य असेंच झालें आहे. पण ह्या विधानाची शाई वाळली नाहीं तोंच त्यांच्या विचिकित्सकतेवर लोकसंग्राहकत्वाचा पगडा बसून कीं काय पृ. ५४३ वर तेच पुनः श्रीकृष्ण या पांच चार व्यक्ति नसून एकच ऐतिहासिक पुरुष होते असेंही विधान करण्यास प्रवृत्त होतात हें आश्चर्य नाहींतर काय ? गोकुळांतल्या रासक्रीडेला अध्यात्मपर मानल्याशिवाय या कथानकाचा गीतेंतल्या श्रीकृष्णाच्या उपदेशाशीं ·र्चाची वाट ४ आर्ण. ·ात ,३ महाभारत, भागव·· बंगाल ३३, संयुक्तप्रांत ३, प्राचीन ग्रंथांना अध्यात्म·· ४३, व मुंबई २९. तर रा. टिळक हे अगदीं ·लिसाच्या वर्तनांत हें ही त्यांनीं ५४३ व्या पृष्ठाव··सत नाहीं. ह्मटलें आहे. मग रासक्रीडेंतला श्रीकृष्ण ·· उपनिषदतत्त्वांचा उपदेशकर्ता श्रीकृष्ण यांच्या चरित्रांत कसा मेळ घालावयाचा हा प्रश्न उभा राहतो. पण रा. टिळक यांनीं या प्रश्नासंबंधानें मूग गिळले आहेत. सारांश, श्रीकृष्णासंबंधानें त्यांनीं जागजागीं केलेल्या विधानांतला विरोध स्पष्ट आहे व तो काढून टाकण्याचा प्रयत्न त्यांनीं केला नसल्यामुळें रा. टिळकांचें या संबंधाचें खरें मत कोणतें हें वाचकांना नीट समजत नाहीं.

बौद्धधर्माच्या विवेचनासंबंधानेंही रा. टिळक यांची अशीच तिरपिट उडाली आहे. गौतमबुद्ध हा अनात्मवादी होता अशी फार प्राचीनकाळापासून लोकांची समजूत झालेली आहे. सर्वदर्शनसंग्रहकारांनीं बौद्धदर्शनाला नास्तिकदर्शनांत ढकललें त्याच्या मुळाशीं तरी हीच समजूत आहे. ही समजूत बौद्धधर्माचे ग्रंथ काळजीपूर्वक वाचून झाली असती तर गोष्ट निराळी होती. पण तसा प्रकार झालेला नाहीं. बुद्धाचे सगळे उपदेश पालीभाषेंत झाले असल्यामुळें व बुद्धाच्या निर्वाणानंतर त्याच्या उपदेशाचें खरें मर्म विसरून त्याच्या अनेक शिष्यांनींच त्याच्या धर्मतत्त्वांचा भलताच विपर्यास करून ठेविल्यामुळें बुद्धाचें मत आत्मा, परमेश्वर, संन्यास व कर्म यांच्यासंबंधानें काय होतें, व त्याच्या शिष्यांनीं त्यांचा कसा विपर्यास केला हें पाहिल्याखेरीज कोणी ही सुज्ञ पंडित अमकेंच मत बुद्धाचें खास होतें असा ठाम अभिप्राय देऊं शकणार नाहीं. पण रा. टिळक यांनीं भ्रममूलक अशा सर्वदर्शनसंग्रहकारांच्या विधानावर भरंवसा ठेवून बुद्धाचा आत्म्याच्या अस्तित्वासंबंधानें अविश्वास होता, आत्म्याची कोणतीच कल्पना त्यास मान्य नव्हती, असें पृ. ५६३ वर स्पष्ट ह्मटलें आहे. पण पुढें लवकरच त्यांना तेविज्जसूत्राची आठवण होऊन बुद्धाचें खरें मत व 'ब्रह्म किंवा आत्मा मुळींच नाहीं असें सांगण्याचा त्याचा ( गौतमबुद्धाचा ) हेतु नाहीं हें पृ. ५७४ वर त्यांना कबूल करावें लागलें आहे. अलीकडे पालीभाषेच्या अध्ययनाला उत्तेजन मिळाल्यापासून बुद्धाच्या खऱ्या मताचा जो शोध लागत आहे त्यावरून हें दुसरें विधानच खरें आहे असें विद्वान् पंडितांनीं सप्रमाण सिद्ध केलें आहे, आणि बौद्धधर्म हा उपनिषद धर्माचीच सुधारलेली आवृत्ति होता, बुद्धाच्या मतांत आणि उपनिषदांच्या मतांत एक श्रुतिप्रामाण्य येवढा मुद्दा खेरीज करून फारसा कोठें विरोध नव्हता हें मत गेल्या दहापांच वर्षांत विद्वन्मंडळींत प्रस्थापित होऊं लागलें आहे. रा. वासुदेवराव आपटे यांनीं आपल्या बौद्धपर्व नामक अगदीं अलीकडे प्रकाशित झालेल्या पुस्तकांत याच मताचें प्रतिपादन केलें आहे. रा. टिळक यांनीं खरें बौद्धमत कोणतें असणें संभवनीय आहे याचा ऐतिहासिक दृष्ट्या विचार केला नसल्यामुळें ज्यावेळीं जें मत आपणास अनुकूळ दिसेल त्यावेळीं त्या मताचा

त्यांच्या ग्रंथांत गौतम- ...संबंधानें परस्पर विरोधी अशीं ... करण्यांत आलीं आहेत. बौद्धधर्म निवृत्तिपर होता हें त्यांचें विधान तर निखालस चुकीचें आहे. जैनधर्मासंबंधानें हें त्यांचें विधान कदाचित् खरें ठरेल, पण बौद्धधर्मासंबंधानें तें खरें नाहीं. बुद्ध हा तपश्चर्या करीत असतां त्याला बोधिवृक्षाखालीं झालेलें दिव्यज्ञान खास निवृत्तिविषयक नव्हतें. त्याच्या उपदेशांत हा निवृत्तिपर असा भाग फारसा नाहीं. तुह्मी वासनांचा क्षय करा ह्मणजे दुःखाची निवृत्ति होईल व तुह्मांस निर्वाणपद मिळेल असें त्यानें सांगितलें आहे. यांतल्या दुःखाची निवृत्ति या शद्बां-वरून जर लोकांनीं त्याच्या मताविषयीं गैरसमज करून घेतला असला तर तो त्याचा दोष खास नव्हे. सगळीं कर्मे टाकून नुसतें ध्यानमग्न व्हा असा उपदेश त्यानें कोठें ही केला नाहीं. उलट, आपल्या हातून होईल तितका परोपकार करण्यास झटा, त्यासाठीं तुह्मी मानापमान, शरीर अपेष्टा यांची फार काय पण जीवाची सुद्धां परवा करूं नका असा आपल्या शिष्यांना उपदेश केला आहे. ज्याचें मत निवृत्तिपर आहे त्याच्या तोंडून असा उपदेश निघणें शक्य आहे काय याचा विचार रा. टिळकांनीं केलेला दिसत नाहीं. ह्मणूनच बुद्धाच्या संन्यासतत्वासंबंधानें त्यांचा गैरसमज झालेला आहे असें त्यांच्या ग्रंथाच्या कांहीं भागावरून ह्मणावें लागतें. उदा. पृ. ५७१ यावर 'बौद्धधर्म मुळांत प्रवृत्तिपर नाहीं व तो केवळ संन्यासपर झाला आहे' असें ह्मटलें आहे, आणि पृ. ५७७ वर 'भूतदयेचा प्रवृत्तिपर बौद्धधर्मच सर्वत्र उपदेशिला आहे' असें ह्मटलें आहे. बौद्धधर्म हा मूळचा संन्यासपर असून पुढें महायानपंथ निघाल्यावर तो प्रवृत्तिपर बनला असें ह्मणून रा. टिळक हा विरोध नाहींसा करूं पाहत आहेत. पण हा प्रयत्न व्यर्थ आहे हें बुद्धाचे उपदेश ते मूळ पालीग्रंथांतून वाचतील तर त्यांना सहज दिसून येईल. गौतमबुद्ध व तत्कालीन तापसी यांच्या वर्तनांत व मनांत जो विरोध होता तो येथेंच. नुसतें शरीराला कष्ट देऊन व तपश्चर्या करून अथवा समाधि लावून (ह्मणजे निवृत्तिमार्गानें जाऊन) निर्वाण प्राप्त होत नाहीं. तर भूतदयेनें प्रेरित होऊन प्रत्यक्ष कार्य करण्यास झटणें, वासनांचा क्षय करून परोपकाराचीं कृत्यें करणें ह्मणजे निष्काम कर्म योग साधणें हेंच कर्तव्य बुद्धानें ही उपदेशिलें आहे. तें मूळचेंच बौद्धधर्मांत मागाहून आलेलें नाहीं.

## निवडक वर्तमानें.

पुण्यास भरलेल्या प्रांतिक सभेसाठीं कर्मवीर मि. गांधी हे पुण्यास गेले असतां त्यांच्या मार्फत जहाल पक्षाच्या मंडळीनें समेटाचा प्रयत्न करून पाहिला. मि. गांधी व रा. टिळक यांचें बराच वेळ बोलणें झाल्यावर मि. गांधी यांनीं स्पष्टपणें रा. टिळक यांस सांगितलें कीं तूर्त समेटाचें नांव काढूं नका. तो करण्याची वेळ अद्याप आली नाहीं.

युद्धामुळें विलायतेंत सर्व जिनसांचे भाव चढले आहेत. ह्मणून यापुढें होईल तितकें काटकसरीनें राहण्याबद्दल लोकांना उपदेश चालला आहे.

फ्रान्सचे हिशेबी खात्याचे मुख्य मंत्री मॉ॰ रिबट यांनीं प्रसिद्धपणें सांगितलें कीं येत्या सप्टेंबरपर्यंत युद्धाचा खर्च फ्रान्सला ९६ कोट पौंड येईल.

नॅशनल रजिष्टर बिल ह्मणजे युद्धोपयोगी अशा माणसांची खानेसुमारी करण्याविषयींचें बिल विलायतच्या पार्लमेंटांत पास झालें.

लुसिटानिया जहाज बुडविल्यानें झालेल्या अमेरिकेच्या हानीबद्दल जर्मनी व अमेरिका यांच्यामध्यें पत्रव्यवहार चालला आहे; अमेरिकन जहाजांना धक्का लागूं देणार नाहीं अशीं आश्वासनें जर्मनी देत आहे, आणि इकडे पहावें तर तीं आश्वासनें मोडण्याचा ही जर्मनीचा सपाटा त्याच्याबरोबर चाललाच आहे.

कलकत्त्याचे 'बंगाली' दैनिकपत्र इतके दिवस एक आण्यास मिळत असे. आतां त्याची किंमत अर्धा आणा झाली आहे.

इंदुरच्या सिटी हायस्कुलांत विद्यार्थ्यांची संख्या फार वाढली ह्मणून अधिक शिक्षक नेमण्याविषयींची मंजुरी तेथील शाळाखात्याचे डायरेक्टर साहेबांनीं मागितली होती, त्याला दोन वर्षें झालीं तरी ती मंजुरी मिळाली नाहीं. मध्यंतरीं वरच्या वर्गावरचे कांहीं शिक्षकांनीं नोकरी सोडल्यामुळें खालचे शिक्षक वर घेण्यांत आले. तेव्हां पहिल्या तीन इंग्रजी यत्ता शिकविण्यास शिक्षकच उरले नाहींत सबब खालच्या तीन यत्ता अजिबात काढून टाकल्या. इंदुरास दुसरें हायस्कूलही नाहीं. सबब या तीन यत्तांतले सुमारें ३०० विद्यार्थी रिकामे घरीं बसले आहेत. श्री. महाराज साहेबांची स्वारी माथेरानची हवा खात आहे.

काश्मीरच्या महाराजांनीं आपल्या राज्यांत कलावंतिणीचा नाच करूं नये अशी बंदी केली आहे.

मेडिकल रजिस्ट्रेशनचा कायदा पास झाल्यामुळें पुण्याच्या म्युनिसिपालिटीनें आज पंचवीस वर्षें ठेविलेला देशी औषधांचा दवाखाना तिला बंद करावा लागला. तो बंद न होईल अशी त्या कायद्यांत सुधारणा करण्याविषयीं सरकारास विनंती करण्याकरितां पुण्यास नागरिकांची सभा रा. हरि नारायण आपटे यांच्या अध्यक्षत्वाखालीं झाली. तींत ना. मि. परांजपे, व रा. टिळक यांचीं भाषणें झालीं. पुण्याचे मवाळ व जहाल भांडतात, कांग्रेस खेरीज करून इतर सार्वजनिक कामाचे वेळीं पुनः एक होतात, अशी अद्याप स्थिति आहे ही अभिनंदनीय गोष्ट आहे.

कटनी येथें सिमेंट तयार करण्याचा जो कारखाना निघाला आहे त्यांतलें सिमेंट विलायती सिमेंट इतकेंच चांगलें आहे असें हिंदुस्थानसरकारच्या मुख्य इंजिनियरांनीं अनुभवांतीं सार्टीफिकेट दिल्यावरून आतां याच सिमेंटाचा उपयोग सर्वत्र होऊं लागला आहे.

तळेगांवचा कांचेचा कारखाना बंद झाला अशी बातमी मध्यंतरी आली होती, पण ती खोटी आहे.

पुण्याचे डा. बेलवलकर पी. एच. डी. यांनीं शोधून तयार केलेली उत्तमरामचरित्र नाटकाची आवृत्ति अमेरिकेंतल्या हार्वर्ड युनिव्हर्सिटीमार्फत छापली जात आहे.

परलोकवासी ना. गोखले हे प्रोफेसराचें काम फार उत्तम रीतीनें करीत असत असें त्यांच्या मृत्यूलेखांत सर्वजणांनीं ह्मटलेलें फर्ग्युसन कॉलेजचे प्रिन्सिपाल ना. मि. परांजपे यांस न खपून त्यांनीं फर्ग्युसन कॉलेज म्यागझिनच्या द्वारें लोकांना असें कळविलें आहे कीं उत्तम शिक्षक ह्मणून ना. गोखले यांची जी ख्याति होती ती खरी नाहीं!

नामांकित लेखकांकडून उत्तमग्रंथ लिहवून ते स्वस्त किंमतीस देणारी 'साहित्यसंवर्धक समिति' नांवाची एक संस्था कलकत्त्यास निघाली आहे.

'लिबर्टी' नांवाच्या एका फ्रेंच वर्तमानपत्रांत त्या पत्राचा एक प्रतिनिधि व पोप महाराज यांच्यामध्यें झालेल्या संभाषणाची साग्र हकीकत दिली आहे. तिजवरून हे धर्माधिकारी जर्मन लोकांच्या खोट्या थापांना कसे भुलले आहेत व वस्तुस्थितीचें खरें स्वरूप जाणण्याचे कामीं कसे असमर्थ आहेत तें स्पष्ट होतें.

## लढाईच्या बातम्या.

प्रस्तुतच्या लढाईमुळें तुर्कस्थान अगदीं जेरीस आला आहे हें आह्मी मागेंच कळविलें आहे. आतां बल्गेरियामधील लंडनटाइम्सचा बातमीदार त्या पत्राला कळवितो कीं स्वित्झर्लंड मार्फत आपल्या पुरतें तहाचें बोलणें लावण्यासाठीं तुर्कस्थाननें कांहीं वकील स्वित्झर्लंडकडे पाठविले आहेत.

जर्मनी हालंड देशाला युद्धांत ओढण्यास पाहत आहे. त्यामुळें हालंडचे मुत्सद्दी घाबरून गेले आहेत. आपल्या तटस्थवृत्तीचा भंग करण्याची ग्रेट ब्रिटनची इच्छा आहे काय असा प्रश्न सदर मुत्सद्यांनीं केला असतां ब्रिटिश प्रधानानें त्यांना असें आश्वासन दिलें कीं तशी आमची इच्छा नाहीं. पण हालंडनें तटस्थ वृत्ति कायम ठेवल्यास जर्मनी हालंडवर स्वारी करील अशी मात्र भीती आहे. त्यावरून हालंड आपल्या संरक्षणाच्या तजविजीस लागला आहे.

गेल्या आठवड्यांत पोलंडमध्यें जर्मन लोकांनीं राशियाच्या फौजेवर फार निकराचे हल्ले करून राशियाला मागें हटविलें. आणि 'जितं मया' असा सर्वत्र विजय घोष केला. आपण थोडेसे हटलों ही गोष्ट खरी आहे, पण जर्मनीनें टिऱ्या बडविण्याइतकें त्यांत कांहीं नाहीं असें राशिया ह्मणत आहे.

पश्चिमेकडील रणभूमीवर जर्मनीची मात्रा विशेषशी चालत नाहीं. इंग्रज व फ्रेंच आपापल्या ठिकाणीं मजबुतीनें राहिले आहेत. हें पाहून जर्मनीनें चरफडत राशियाचा समाचार घेण्याचा निश्चय केला आहे असें दिसतें.

युद्ध सुरू झाल्यानंतर लवकरच जर्मनीनें आपल्या राज्यांतल्या एकंदर ब्रिटिश प्रजेला अडकावून टाकिलें. पण हिंदुस्थानसरकारनें अधिक मानसिक औदार्य दाखवून कांहीं जर्मन लोकांना हिंदुस्थानांत अद्याप मोकळे ठेविलें आहे. फार काय, पण एक जर्मन मिशनरी हिंदुस्थानांत अद्याप आनररी म्याजिस्ट्रेटचें ही काम करीत आहेत! हें पाहून सरसकट सर्व जर्मनांना सरकारानें अडकावून टाकावें अशाविषयीं इंग्रजांनीं वर्तमानपत्रांत हाकाटी केली. तिजवरून पार्लमेंटांत प्रश्न ही विचारण्यांत आले. अशा एका प्रश्नास उत्तर देतांना मि. चर्चिल यांनीं हिंदुस्थानसरकारची तार वाचून दाखविली. तींत ह्मटलें आहे कीं, आतां मात्र या मोकळ्या राहिलेल्या जर्मन लोकांसंबधानें अधिक सक्त इलाज करण्याची वेळ आली आहे.

आकोल्याचे माजी सिव्हिलसर्जन मे. रेनी साहेब हे युद्धावर गेले असतां धारातीर्थीं पतन पावल्याची शोकजनक बातमी गेल्या शुक्रवारीं आल्यावरून ते दिवशीं त्यांच्या सन्मानार्थ येथील सर्व शाळा व सरकारी कोर्टें कचेऱ्या बंद ठेवण्यांत आल्या होत्या.

# वऱ्हाडवृत्त.

**हवामानः**—गेल्या सोमवारीं रात्रीं पुनर्वसूनें जातां जातां पावसास सुरवात केली. तेव्हांपासून बहुतेक रोज रात्रीं चांगला पाऊस पडत आहे. या हंगामाचा आजपर्यंतचा पाऊस १०–११ इंच झाला आहे. जास्त पावसाचीं चिन्हें दिसत आहेत. रोगराई ऋतुमानाप्रमाणेंच काय किरकोळ असेल ती.

रा. रा. रंगनाथ गणेश उटगीकर, तहसिलदार, दर्यापूर, यांस तीन महिन्यांची हक्काची रजा देण्यांत आली असून तेथील नायब तहसिलदार रा. बाळकृष्ण दिनकर केवल यास आफिशिएटिंग तहसिलदार तेथेंच नेमिलें आहे.

**सन्मान**—येथील म्युनिसिपल मराठी शाळा नं. १ चे हेडमास्तर रा. रा. माधवराव चांदोरकर यांनीं गेल्या बुधवारपासून पेंशन घेतलें ह्मणून त्यांच्या चांगल्या कामगिरीबद्दल त्यांचें अभिनंदन करण्यासाठीं रा. ब. आण्णा साहेब महाजनी यांच्या अध्यक्षतेखालीं ता॰ २१ रोजीं थाटाचा पानसुपारी समारंभ साजरा करण्यांत आला. अशा रीतीनें योग्य शिक्षकांचा यथोचित सन्मान होत गेल्यास शिक्षकवर्गास चांगलें काम करण्यास प्रोत्साहन मिळन आपल्या कामांत त्यांचें अंतःकरण उतरत जाईल आणि तें पूर्णपणें उतरणें हें फार इष्ट आहे. कारण भावीपिढी चांगली वाईट निपजणें हें बरेंच शिक्षक वर्गाच्या चांगल्या किंवा वाईट शिक्षणावर अवलंबून असतें. रा. माधवरावजी सारखे कर्तृत्ववान शिक्षक दिवसेदिवस अधिकाधिक निपजावे अशी आमची मनापासून इच्छा आहे.

**अपघातः**—काल सकाळीं सुमारें आठ साडे आठ वाजतां दापकी रस्त्यावरील लकडगंजाजवळ असलेल्या विहिरींत नजीकच रहात असलेला एक परदेशी कांहीं भांडण तंटा होऊन मारामारीच्या गर्दींत पळत जात असतां पडून मरण पावला. पोलीस चौकशी सुरू आहे.

हेंपत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

## NOTICE

Notice under Section 11 of act V111 of 1890. This judicial case no 27of1915 In court of District Judge W. B. Dn Akola

In the matter of application of Deopuri son of Guru Shankargir caste Cosavi inhabitant of Jaulka, Tahsil Akot, Distt Akola.

For the (1)appointment of a guardian to the (2) Person and property of Bhagwangir son of Guru prasadgir caste Hindu a minor aged 11 years inhabitant of Jaulka, Tahsil Akot, District Akola To (3)

The petitioner above named having applied to be (4)appointed the guardian of the (2) person and property of the aforesaid minor, the 7th day of August 1915 has been fixed for the hearing of the application of the petitioner in this court in person or by a duly authorised pleader of the court July instructed and able to answer all material questions relating to the application. or who shall be accompanied by some person able to answer all such questions, and he is hereby repuired to take notice that in default of his appearance on the day mentioned above the application will be heard and determined in his absence.

Civen under my hand and the seal of the court this 11th day of may 1915.

Sd/ K.K.Thakur
District Judge
W. B. Dn. Akola

N. N. 307

## नोटीस

नोटीस बेशमी शिवराम गंभीरजी पाटील रा. शिरल पिंपळखुट ता. बाळापूर जि० आकोला.

यांसी:—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, मौजे शिरल येथील शेत स. नं. २ पोट हिस्सा २ याच्या खरेदीचा सवदा ता० ९।१।१९११ चा झाला किंमत रुपये ९०० ठरली. त्यापैकीं रुपये १०० दिले. आजपर्यंतचे सन १९१५ पासून पीक खाल्ले. वरील रुपयास व्याज दरमहा दर शेंकडा १॥ रु० प्रमाणें ठरले होते रुपये व्याजासुद्धां देण्याचा नक्की करार नव्हता. तरी या नोटिशीनें तुह्मास कळविण्यांत येते कीं, अजून पर्यंत तुह्मी रुपये दिले नाहींत. तुमचे मनांत सवदा मोडणें आहे असे दिसते. तरी या नोटिशीनें तुह्मास कळविण्यांत येते कीं, ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत रुपये ४०० व हिशोबानें जे व्याज निघेल ते आणून द्यावे. व खरेदीखत करून घ्यावे. असें न केल्यास तुमचा आमचा खरेदीचा सवदा अह्मी मोडला आहे, असें समजावे व आमचे शेत आह्मास परत द्यावे. व या साल्च्या पिकाचे नुकसानीची रक्कम द्यावी. तसें न केल्यास रीतशीर कोर्टांत दावा आणूं.

सही

आईदान सांगीदास सहू दुकान
शिरल द० खु०
नो० नं० ३०८

## जाहिरात.

सर्व लोकांस या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, माझा पुतण्या शेकलाल वा शेकगुलाब रा. दारव्हा यांस मी सुमारें दोन वर्षें होऊन गेले. कुलमुखत्यारपत्र दिलें होतें. परंतु या पुढें त्यांस मुखत्यार ह्मणून ठेवण्याची माझी इच्छा नाहीं. यासाठीं त्याचें मुखत्यारपत्र मी आजपासून रद्द केलें आहे. कळावें. मुक्काम दारव्हा तारीख १५-७-१५

सही

सहीची नि॥ सेखआब्बास शेखअमीर
याची रेघ असे
नो० नं० ३०९

## नोटीस

नोटीस बेशमी पांडुरंग व रामचंद्र गणेश घाईकवाड उभयतां बंधु राहणार धनोडी बाहदूरपूर ता० आर्वी जि० वर्धा.

यांस:—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं माझा भासरा नामे महादेव उर्फ बाबा धोंडबा कांडे राहणार कारंजा ता. मुर्तिजापूर जि० आकोला हा वेडगळ असून त्याला चांगलें बोलतांही येत नाहीं व तुह्मी त्याचे साक्षात भाचे असून तुह्मांस त्याला कोणते वारस आहेत ही पूर्ण माहिती आहे. असें असतां ही तुह्मी त्याजपासून मला कोणी वारस नाहीं असें सांगून फुसलाऊन ता० २०-६-१४ इ. रोजीं बक्षीसपत्र करून घेऊन नोंदुन घेतलें तें बुक नंबर १ भाग ३ पान ७७ ते ८२ अ० नंबर २३ यांत दाखल आहे तें तुह्मी ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे मुदतींत वि० डेपुटीकामिशनर साहेब बाहादूर यांचे समक्ष वारसास बोलाऊन खरे करून घ्यावें. असें जर तुमचे कडून होणार नाहीं तर करून घेतलेलें बक्षीसपत्र रद्द आहे असे समजावें. जर वरील मुदत संपतांच बक्षीसपत्रावरून जी कांहीं स्थावर जंगमची व्यवस्था केली ती सर्व रद्द समजून मी त्याची व्यवस्था वाटेल तशी करीन. जो बक्षीसपत्र.खेरीज जंगम माल व कागदपत्र व बक्षीसपत्रातील कागदपत्र हे वरील मुदतींत आणून देऊन माझी पावती घ्यावी. असें जर तुमचेकडून होणार नाहीं तर त्याची रितीप्रमाणें व्यवस्था करीन. मग तुमची कोणत्याच प्रकारची तक्रार ऐकली जाणार नाहीं. कळावें ता० २२ ७-१५ इ.

सही

सरस्वती जवजे एकनाथ तर्फे
मुखत्यार महादेव वामन
झाडगांवकर द० खु०
नो. नं. ३१०




सतत ४२ वर्षें चाललेला कारखाना

### ए. जे. ह्मात्रे आणि सन् सुगंधी.

ठि:--पांजरापोळचा नाका, चिमणलालमहाराजांचे मदीर भुलेश्वर -- मुंबई.

एकच भाव! ओटो सुरंगीं ! एकच भाव! !

### आमचेकडे मिळणारा माल

#### ओटो सुरंगी

अत्तरें.– गुलाब, मोतिया, दवणा, अंबर, बकूल रुपाच, हिना, पाच, वाळा, जुई चांफा, अंबा, इस्तंबोल, केशर, मदनबाण पारिजातक, मुस्काहिना, गुलहिना, रुअबझा, केवडा, रुखस, चमेली, अगर. हीं अत्तरें दर तोळ्यास १ रुपयापासून ८ रुपयेपर्यंत निरनिराळ्या भावाचीं मिळतील. २-३-४-६ रु.

तेलें.– चमेली, बेलिया, मुसुंबी, हिना, लिंबू, मेंदी, गुलाब, मसाला, नारंगी, सुगधराव, मोतिया, आवळा, नागर, कपाशी.

वरील तेलें दर रुपयास ६ तोळ्यापासून २८ तोळेपर्यंत निरनिराळ्या भावाची मिळ

...ची वाट ४ आणे. प्रांत ,३ १. बंगाल ३३, संयुक्तप्रांत ३, इम ४३, व मुंबई २९. अरगजा गोलिसाच्या वर्तनांत दर डबीस दिसत नाहीं. आ. १ रु. उदण... २ आ. ४ आ. ८ आ. पय गोळी उत्तम २॥ आ. ५ आ. १। रुपयापर्यंत. क्याटलॉग फुक ह्याशिवाय कस्तुरी, केशर, मध, उदबत्ती, रंगीत पाट, दश जिफे, सोंगट्या, बुद्धिबळें, आर्य डेस, बिझिक, इसापिकें, हस्तीदंती फण्या, पितळी सामान, पितळी करणे, धंद्या, सरबतें व मुरंबे, प बदामाचें तेल, व वातहारक आ वर्धक तेलें, सुटें व बेणीचें गंग त्यादि वरील दरावर मिळेल. सवलत.

बाहेरगावच्या गिऱ्हाईकास माल पाठविला जाईल. नो. नं

## Oriental Government Security Life Assurance Co., Ltd.

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY. R. PATERSON BROWN MANAGER

### FUNDS almost 5 CRORES.

INVESTED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL A PORT TRUST BONDS.

Claims paid 4½ CRORES

### A Decennial Record of Progres

| Year. | No. of Polices in force. | Existing Assurances. |
|---|---|---|
| 1884 | 4.823 | 1,59,25,200 |
| 1894 | 20,110 | 5 26,08,850 |
| 1904 | ,356 | 8 88,02,223 |
| 1914 | 269 | 12,37,10,910 |

| Year. | Total Income. | Total Assets. |
|---|---|---|
| 1884 | 6,77,552 | 14,41,429 |
| 1894 | 25,49,607 | 94,49,971 |
| 1904 | 43,64,808 | 2,47,18,898 |
| 1914 | 72,46,043 | 4,96,86,509 |

### BONUS

The bonus for the premium ending 31 December 1912. constitutes record for the company. The next Division of profits will be madea at 31 December of the current year when all With Profit Policies effecte prior to that date will participate—

### SPECIAL FEATURES.

Absolute Security—Low Rates—Liberal Conditions.
Forty years continuously increasing prosperity.
Ninety per cent of the entire Profits, after proviaing for the Reserv Fund divided among the Policyholders every 3 years.
Native Lives are accepted at the same rates as Europeans
Loans granted to policyholders at reasonable rates.
Prompt Payment of Claims.

Full particulars, prospectus and proposal forms on application to:—

Influential and energetic Agents wanted-Terms liberal.

M. deSOUZA,
CHIEF AGENT,
C. P. Berar & Khandesh
NagPUr.

N. N. 25


ही पुरवणी आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचा छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केली